| संस्थापक : | साने गुरुजी |

# साधना

शनिवार
१६ जानेवारी २०१०
मूल्य रु. १०/-

## न्यायाचे शास्त्र आणि न्यायाचा व्यवहार



सर्जनशील लेखनप्रक्रिया चालते तरी कशी,
याची झलक दाखवणारे 'साधना प्रकाशना'चे मराठी साहित्यातील आगळेवेगळे पुस्तक...

# कथा आणि कथेमागची कथा

## लेखक : राजन खान

भाग १ आणि भाग २ : प्रत्येकी ३२० पाने
दोन्ही भागांची एकूण किंमत : रु. ६००/-

**प्रकाशनपूर्व सवलतीत : रु. ३५०/-**

(पोस्टाने घरपोच : रु. ४००/-)
पुस्तकाची उपलब्धी : २० फेब्रुवारी २०१०

**कथा आणि कथेमागची कथा**

| | |
|---|---|
| बांगी | नातीखेळ |
| चांडाळ | एका रात्रीची बाई |
| सवाल | काही कळत नाही |
| एकूट समूह | पुण्याचा पिरपिऱ्या पाऊस |
| पिवळट लुगडं मळकट पिशवी | काळी आई आणि नोटा |
| दगडओठ | एका अटीचा संसार |
| असूर | असणं नसणं तीव्र असह्य |

: संपर्क :

**साधना ग्रंथप्रदर्शन आणि मीडिया सेंटर**

४३१, शनिवार पेठ, पोलिसचौकीसमोर, पुणे ४११०३०. दूरध्वनी : ०२०-२४४५९६३५.
(सकाळी १० ते सायं. ८. बुधवार बंद)

# घालीन लोटांगण...

सांस्कृतिक क्षेत्रातले अलीकडील असांस्कृतिक वातावरण कलाप्रेमी, लोकशाहीप्रेमी नागरिकांना उद्विग्न करणारे आहे. शिवसेना, मनसे, बजरंग दल, पतित पावन, वारकरी, मराठा महासंघ या संघटनांनी स्वत:ची सेन्सॉर मंडळे स्थापन केली आहेत. त्यात आता नारायण राणेपुत्रांच्या स्वाभिमान सेनेची भर पडली आहे. या मंडळींना दाखवल्याखेरीज आजकाल कोणतीही कलाकृती प्रदर्शित करता येत नाही. शासनाच्या उदासीनतेमुळे आणि कलावंतांच्या लाचार, बोटचेप्या, शरणार्थी धोरणामुळे या अनधिकृत सेन्सॉरचं बळ वाढत चाललं आहे.

'झेंडा' हा आपला चित्रपट शिवसेना, मनसेच्या काही लोकांना दाखवून 'आपण आज या लाचार, कलावंत मंडळीत जाऊन बसलो आहोत' हे अवधूत गुप्तेंच्या लक्षात आले आहे की नाही माहीत नाही. परवा आयबीएन लोकमत चॅनलवर प्रसारित झालेल्या निखिल वागळेंच्या कार्यक्रमात दिसलेले अवधूत गुप्ते सारेगमप कार्यक्रमात दिसतात तसे आनंदी-उत्साही दिसत नव्हते. निखिल वागळेंच्या आक्रमक प्रश्नांना ते शांतपणे उत्तरं देत होते; पण तरीही चेहऱ्यावरची अस्वस्थता आणि उद्वेग ते लपवू शकत नव्हते.

अवधूत गुप्तेंच्या मागे चित्रपट-नाट्यसृष्टीतल्या सर्वांनी उभे राहायला पाहिजे होते असे एकीकडे वाटते. पण शरणार्थींच्या पाठीमागे कोणी आणि कशासाठी उभे राहायचे हाही प्रश्न आहे. आनंद यादवांच्या वेळी जो प्रश्न उपस्थित झाला, तो आता अवधूत गुप्तेंच्या बाबतीतही झाला आहे. कदाचित असेही असेल, आपल्या मागे कोणी उभे राहणार नाही याची खात्री असल्यानेच आनंद यादव यांनी शरणागती स्वीकारून आपले पुस्तक मागे घेतले. त्याप्रमाणे अवधूत गुप्तेंनी आपला सिनेमा मागे घेतला. मराठी कलाविश्वात या शरणवृत्तीला फार मोठी परंपरा आहे. ज्यांच्या लढाऊ वृत्तीबद्दल खूप बोलले जाते, त्या कमलाकर सारंगसारख्या नाट्य-कलावंतानेही 'सखाराम बाईंडर'चा खास प्रयोग सेनाप्रमुखांसमोर केला होता आणि त्यांचं 'नो ऑब्जेक्शन' सर्टिफिकेट मिळवलं होतं. तेव्हा मराठी माणसांच्या बाणेदारपणाबद्दल काय आणि किती बोलावं? आपल्या बुद्धीच्या दैवताला केलेल्या प्रार्थनाही भक्तांना लोटांगण घालायला शिकवतात. शरण आलेल्यांचेच तो भले करणार.

आज 'स्वाभिमान' नावाची संघटनाच कलावंतांना स्वाभिमान गहाण ठेवायचा आग्रह धरते आहे. आपण अवधूत गुप्तेंना कोणत्याही धमक्या दिल्या नाहीत, फोनवरून काही दृश्यं काढून टाकायला सांगितले असे राणेंच्या मुलाने आयबीएन लोकमतवरच्या चर्चेत सांगितले. गुप्ते स्वत: शिवसेनेच्या मित्रवर्तुळातले. दहशतवाद्यांच्या विनंत्या या धमक्या असतात याची त्यांना कल्पना असणारच. राणेंच्या दहशतीचा अनुभव कार्यक्रमाच्या सूत्रधारांपाशीही होता. राणेपुत्रांना आपण कोणासमोर कोणते विनोद करतोय याची जाणीव असायला हवी होती. 'गुप्तेंनी आमच्याकडे यायला पाहिजे होतं, आम्ही त्यांच्या चित्रपट प्रदर्शनाला संरक्षण पुरवलं असतं' असे मुख्यमंत्री म्हणाले, तोही कार्यक्रमाच्या प्रेक्षकांना विनोदच वाटला. शासन आपली विश्वासार्हता केव्हाच गमावून बसले आहे. संभाजी ब्रिगेड प्रकरणात गृहमंत्री आर.आर. पाटील यांनी बजावलेल्या भूमिकेचा लोकांना विसर पडलेला नाही.

सेना, मनसे यांची सेन्सॉरशिप मान्य केलेल्या अवधूत गुप्तेंना स्वाभिमान सेनेची सेन्सॉरशिप मान्य करायला अडचण वाटण्याचे कारण नव्हते. अवधूत गुप्तेंनी नारायण-पुत्रांचा फोन आल्यावर लागलीच चित्रपट मागे घ्यावा, याचे म्हणूनच कोणाला आश्चर्य वाटले नाही. सर्वसामान्य मराठी कुटुंबातल्या वेगवेगळ्या सदस्यांना या चित्रपटातल्या वेगवेगळ्या गोष्टी आक्षेपार्ह वाटू शकतील. पण त्यांच्या हातांत दगड नाहीत; त्यामुळे अवधूत गुप्तेंना त्यांच्या आक्षेपांची फिकीर करायचे कारण नाही.

**स्थापण्या समता शांती ठेवुनी शुद्ध साधनां । करिती साधना त्यांना ठेवो उत्स्फूर्त साधना**


१६ जानेवारी २०१०
वर्ष ६२ / अंक २३

● संपादक : **नरेंद्र दाभोलकर**

● कार्यकारी संपादक : **विनोद शिरसाठ**

● हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक नरेंद्र दाभोलकर यांनी **ब्ल्यू बर्ड (इंडिया) लिमिटेड**, पुणे ४ येथे छापून, **साधना साप्ताहिक, ९२६ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०**, येथे प्रकाशित केले.

● दूरध्वनी : **वर्गणी, पत्ता व अंकासंबंधी, [०२०] २४४५१७२४.** संपादक : टेलिफॅक्स – २४४३२४०२.
E-mail : weeklysadhana@gmail.com ● Website : www.weeklysadhana.com

● वार्षिक वर्गणी : व्यक्तिगत रु. ४००/-, संस्थांसाठी रु. ५००/- साधना मीडिया सेंटर – २४४५९६३५.

● [अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.]

● मुखपृष्ठ व रेखाचित्रे : **गिरीश सहस्रबुद्धे** Mob. 9850150488

● सहयोगी संपादक मंडळ : **अभय टिळक** (अर्थकारण), **राजा शिरगुप्पे** (सामाजिक), **अवधूत परळकर** (सांस्कृतिक), **संजय भास्कर जोशी** (साहित्य)

आता या शरणागतीची किंमत त्यांना पैशांच्या रूपात मोजावी लागणार आहे. आज अवधूत गुप्तेंना खंत असेल तर त्याचीच असेल. त्याचीही त्यांनी काळजी करण्याचे कारण नाही. 'झेंडा' हा चित्रपट ठाकरे घराण्यातील सत्तेच्या राजकारणावर असल्याने बॉक्स-ऑफिसवर तो हीट होईल आणि गुप्तेंचे आर्थिक नुकसान भरून येईल. काळजी करायची असेल तर ती त्यांनी आपल्या प्रतिमेची करावी एवढेच त्यांना सांगता येईल.

तोडलीस मित्रा, स्वत:च्या हाताने तू स्वत:ची प्रतिमा तोडलीस. या संपूर्ण प्रकरणात तुझा जो केविलवाणा चेहरा समोर आला तो मराठी माणसांच्या नजरेतून कसा पुसला जाईल, हाच आता प्रश्न आहे.

हा मजकूर लिहिताना मराठा महासंघाने महेश मांजरेकरांच्या चित्रपटाच्या शीर्षकावर आक्षेप घेतला असल्याचे वृत्त कानावर आले. मजकूर छापखान्यात जाऊन वाचकांच्या हाती पडेपर्यंत आणखी कोणकोणत्या सिनेमावर आपल्या गावठी दहशतवादी संघटनांनी बंदी आणली असेल, सांगता येत नाही. लाचार कलावंत, निष्क्रिय शासन, उदासीन नागरिक अशी समाजव्यवस्था असेल तर दहशतवादी माजणार नाहीत तर काय? मराठी चित्रपट महामंडळ नावाची संघटना आहे ती अशावेळी नेमकं काय करते? कलाक्षेत्रातील अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरल्या हल्ल्याबाबत ती काही करू शकते की नाही? निदान याचा निषेध तरी करू शकते की नाही? की काही मूठभरांची निवडणुका लढवण्याची हौस भागवायला तिची स्थापना झाली आहे? कोणीतरी या विषयावर संशोधन केले पाहिजे.

अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरल्या हल्ल्याची आता मराठी साहित्य-कलाविश्वाला सवय झाली आहे. आता रीतसर त्याचे लहानसहान निषेध होतील. तसे ते यादव प्रकरणातही झाले होते आणि राणेंच्या माणसांनी निखिल वागळेंवर जीवघेणा हल्ला केला, तेव्हाही झाले होते. बॉम्बस्फोटानंतर मेणबत्ती मोर्चे निघावेत तसा हा प्रकार असतो.

अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरले या आधीचे हल्ले आणि झेंडा प्रकरणी अवधूत गुप्तेंवर आज झालेला हल्ला यात बराच फरक मात्र आहे. अवधूत गुप्ते स्वत: हिटलरशाही मानणाऱ्या आणि कलावंतांच्या स्वातंत्र्याची फारशी तमा न बाळगणाऱ्या संघटनेतला माणूस. कोणत्या तोंडाने तो आता आपल्यावर झालेल्या हल्ल्याबाबत तक्रार करणार? ज्या महेश मांजरेकरांना मराठा महासंघाने आज चित्रपटाचे नाव बदलायला सांगितले आहे, त्यांनी या झेंडा प्रकरणी स्वाभिमान संघटनेची बाजू घेतली आहे. 'कोणाच्या भावना दुखावणार असतील तर कलावंताने असे बदल करायला हवेत' असे या संदर्भात पत्रकार परिषदेत सांगून ते मोकळे झालेत. पण 'कोणाच्या म्हणजे कोणाच्याही नाही तर ज्यांच्यापाशी गुंडगिरी करण्याची, थिएटरची नासधूस करण्याची ताकद आहे अशा समूहाच्या' असे स्पष्ट करायला ते विसरले.

आज त्यांच्या सिनेमाचे शीर्षक बदलण्याची मागणी करणाऱ्या आणि 'तसे न केल्यास आम्ही आमची ताकद दाखवू' अशी उघड धमकी देणाऱ्या संघटनेला मांजरेकर खडसावत नाहीत; तर 'आधी सिनेमा पहा आणि मग काय त्या सूचना करा' असे सांगत आहेत. याचा अर्थ ते घटनाबाह्य सेन्सॉरच्या विरोधात नाहीत; या बाह्य सेन्सॉर मंडळाने चित्रपट पाहून बदल सुचवावेत एवढेच त्यांचे म्हणणे आहे.

अतुल-अजय हे आजचे आघाडीचे संगीतकार. नुकतेच त्यांनी मातोश्रीत जाऊन 'हम करे सो कायदा'... म्हणणाऱ्या संघटनाप्रमुखांची भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. त्यांनी कोणाची भेट घ्यावी, कोणाचे आशीर्वाद घ्यावेत हा त्यांच्या वैयक्तिक स्वातंत्र्याचा प्रश्न आहे. पण त्यांची ही भेट एक ज्येष्ठ व्यंगचित्रकार किंवा कलावंत म्हणून नव्हती तर एका सत्ताकेंद्राला सलाम ठोकणारी होती, हे शालेय मुलगाही ओळखू शकेल.

असे कलावंत, असे समूह, असे शासन जिथे आहे तिथे धमक्या-दहशतीच्या बळावर साहित्यकृती मागे घ्यायला लावायचे; नाटक-सिनेमे बंद पाडायचे प्रकार यापुढेही होत राहणार. लोकशाही मूल्यांवर श्रद्धा असलेल्या शहाण्या नागरिकांचा वर्ग अशा घटनांनंतर लहान-मोठ्या सभा घेईल आणि कायदा हाती घेणाऱ्या विघातक शक्तींचा निषेध करीत राहील; पण लोटांगण घालणाऱ्या तत्त्वशून्य कलावंतामागे तो कसा काय उभा राहील?

**अवधूत परळकर**

Mob. 9987016658

## कार्यकारी संपादक

**विनोद शिरसाठ** हा आमचा तरुण सहकारी, या अंकापासून 'साधना' साप्ताहिकाच्या कार्यकारी संपादकपदाची जबाबदारी सांभाळणार आहे. हा निर्णय, ५ जानेवारी २०१० रोजी 'साधना ट्रस्ट'च्या विश्वस्त मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

गेल्या सहा वर्षांपासून विनोद साधना साप्ताहिकाशी जोडला गेला आहे. पहिली तीन वर्षे स्तंभलेखक, अतिथी संपादक व संपादक मंडळातील सदस्य; तर गेली तीन वर्षे युवा संपादक म्हणून कार्यरत राहिलेल्या विनोदच्या नेतृत्वाखाली 'साधना'चा आलेख वाढता राहील असा आम्हांला विश्वास वाटतो, त्यासाठी त्याला मन:पूर्वक शुभेच्छा!

**– नरेंद्र दाभोलकर**

संपादक, साधना

विश्वस्त सचिव, साधना ट्रस्ट

अशोक चौसाळकर

# तेलंगणाचा तिढा

तेलंगणा स्थापन करणे सरकार फार दिवस लांबवू शकत नाही व नवा राज्य पुनर्रचना आयोग हे त्यास उत्तर नाही; कारण त्यातून अनेक नवे प्रश्न निर्माण होतील. तेलंगणातील लोकांच्या मनाविरुद्ध त्यांना आंध्रात ठेवता येणार नाही, ही गोष्ट आंध्रातील लोकांना समजावून सांगितली पाहिजे. आंध्र एकात्म ठेवायचा असेल, तर त्याबाबत तेलंगणातील जनतेचे प्रबोधन आंध्रातील लोकांनी केले पाहिजे; तेलंगणास अंतर्गत वसाहत मानणे योग्य नाही.

केंद्र सरकारने ९ डिसेंबर २००९ रोजी तेलंगणा राज्याची स्थापना करण्याची तेलंगणा प्रजासमितीची मागणी मान्य केल्यानंतर, आंध्र प्रदेशात त्याविरुद्ध मोठी चळवळ सुरू झाली. त्यामुळे पंधरा दिवसांत केंद्र सरकारने माघार घेतली आणि त्याबाबत व्यापक सहमती निर्माण केल्यानंतरच त्याबाबत विचार करण्याची घोषणा केली. त्यामुळे आता तेलंगणात चळवळ सुरू झाली असून ७२ आमदारांनी व १२ मंत्र्यांनी राजीनामे सादर केले आहेत. या अस्मितेच्या राजकारणात आंध्राचे दोन्ही भाग जळत आहेत आणि तेलगु भाषिक लोक आपल्याच मालमत्तेचा नाश करीत आहेत. तेलंगणाच्या राजकारणाचा तिढा आता लवकर सुटण्याची शक्यता नाही.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी**

भारतात तेलगु भाषिक लोकांची संख्या हिंदीनंतर दुसऱ्या क्रमांकाची आहे व हे तेलगु भाषिक रायलसीमा आंध्र व तेलंगणा या भागात राहतात. लाखो तेलगु भाषिक मद्रास, बेंगलोर, ओरिसा व मुंबईतही राहतात. स्वातंत्र्यपूर्व काळात सध्याच्या आंध्रातील बारा जिल्ह्यांचा समावेश जुन्या मद्रास प्रांतात होता, तर तेलंगणाचे नऊ जिल्हे हे निजामाच्या हैद्राबाद प्रांतात होते. या दोन्ही भागात तेलगु भाषिकांच्या साहित्यसभा संघटित झाल्या होत्या. मद्रास प्रांतातील राजाजी व तमिळ भाषिक काँग्रेस नेत्यांचे वर्चस्व तेलगु भाषिकांना मान्य नव्हते. तेलंगणा भागात तेलगु भाषिक तुलनात्मकदृष्ट्या मागासलेले होते व निजामाच्या सरंजामशाही राजवटीत दाबून टाकलेले होते. निजामाची राजवट लवकर संपुष्टात येत नव्हती आणि तेलंगणा भागात कम्युनिस्टांचा प्रभाव वाढत होता. शेवटी सप्टेंबर १९४८ मध्ये भारत सरकारने सैन्य पाठवून निजामाचा पाडाव केला आणि हैद्राबाद संस्थानचे भारतात विलिनीकरण केले. या प्रांतात एकूण १७ जिल्हे होते. त्यांत हैद्राबादसह तेलंगणाचे ९ जिल्हे मराठीभाषिक मराठवाड्याचे ५ जिल्हे व कानडी भाषिक लोकांचे ३ जिल्हे समाविष्ट होते. सुमारे दोनशे वर्षे ते एकत्र होते. हैद्राबाद शहरावर उर्दू भाषिक मुस्लिमांचा वरचष्मा होता आणि उर्दू ही या राज्याची राजभाषा होती.

आंध्र प्रांतात स्वतंत्र राज्याची चळवळ चालू होती; कारण तेलगु भाषिकांना मद्रास प्रांतातून अलग व्हावयाचे होते. प्रथम त्यांना आंध्र प्रांत स्थापन करावयाचा होता व नंतर तेलंगणासह विशाल आंध्राची स्थापना करावयाची होती. स्वातंत्र्यानंतर हैद्राबाद राज्यात स्टेट काँग्रेसमधील मतभेदामुळे आणि तेलंगणातील साम्यवादी चळवळ बळाच्या साहाय्याने चिरडून टाकण्यासाठी केंद्र सरकारने तेथे लष्करी राजवट चालू केली.

१९५२ साली झालेल्या निवडणुकीत या दोन्ही प्रांतांत कम्युनिस्ट पक्षास चांगला पाठिंबा मिळाला. तेलंगणा चळवळीचे नेते कॉ.रविनारायण रेड्डी हे भारतात सर्वांत जास्त मते मिळवून निवडून आले. शेकापशी आघाडी असती तर कदाचित हैद्राबादेत पी.डी.एफ.चे सरकार आले असते! पण काँग्रेसला निसटता विजय मिळाला व बी.रामकृष्णराव यांच्या नेतृत्वाखाली नवे काँग्रेस सरकार स्थापन झाले. पण आंध्र प्रांतात वेगळ्या राज्याची चळवळ सुरू होती. हैद्राबाद राज्याचे विघटन करावयास पं.नेहरू तयार नव्हते, कारण त्या राज्याची सामायिक संस्कृती कायम राहावी व तेथील मुस्लिम लोकसंख्येच्या मनात अलगत्वाची भावना निर्माण होऊ नये असे त्यांना वाटत होते. शेकडो वर्षे एकत्र राहिलेल्या, परस्परांशी त्याबाबत सहमती निर्माण केलेल्या

समाजांना केवळ भाषेच्या अस्मितेच्या आधारावर विभाजित करावयास नेहरूंचा विरोध होता. वेगवेगळ्या भाषिक गटांनी एकत्र रहावे, सहिष्णुता अंगी बाणवावी असे त्यांचे सांगणे होते. पण एकूण भावनिक वातावरणात नेहरूंच्या मताकडे दुर्लक्ष झाले.

**आंध्र प्रांताची स्थापना**

मद्रास प्रांतात तमिळ व तेलगु भाषिक राजकारण्यांत संघर्ष सुरू झाला. स्वातंत्र्यसैनिक पी.श्रीरामुलु यांनी उपोषण सुरू केले. १९५३ साली श्रीरामुलु यांचा उपोषणात मृत्यू झाला व सर्व आंध्रात चळवळ व हिंसाचार सुरू झाला. या हिंसाचारापुढे केंद्र सरकार दबले आणि शेवटी आंध्र प्रांताची स्थापना करण्यात आली. आंध्र केसरी टी. प्रकाशम् या राज्याचे पहिले मुख्यमंत्री झाले. आता विशाल आंध्र स्थापन करण्याचे स्वप्न पूर्ण करावयाचे होते. भाषिक राज्याची स्थापना करण्याची मागणी कम्युनिस्ट पक्षाने केली. दोन्ही भागांत हा पक्ष बलवान होता.

बी.रामकृष्णराव यांच्या सरकारमध्ये वेगवेगळ्या भाषिक गटात भांडणे होती व रामकृष्णराव यांच्या सरकारचे कामकाज पण फारसे उत्साहवर्धक नव्हते. तेलंगणात विशाल आंध्राच्या मागणीस पाठिंबाही वाढत होता. मराठवाड्यातील पाच जिल्ह्यांना संयुक्त महाराष्ट्रात सामील व्हावयाचे होते; तर कानडीभाषिक जिल्ह्यांत पण संयुक्त कर्नाटकाच्या मागणीस लोकांचा पाठिंबा होता.

केंद्र सरकारने न्यायमूर्ती फाजल अली यांच्या अध्यक्षतेखाली राज्यपुनर्रचना आयोगाची स्थापना केली. सरदार पणीक्कर व एच.एन.कुंझरू हे इतर दोन सभासद होते. या आयोगाने हैद्राबाद हे स्वतंत्र राज्य कायम ठेवावे आणि विदर्भ हे पण स्वतंत्र राज्य तयार करावे अशी शिफारस केली, पण या दोन्ही शिफारसी केंद्र सरकारने मान्य केल्या नाहीत. १९५६ साली हैद्राबाद राज्याचे विभाजन करण्यात आले. तेलंगणाचे ९ जिल्हे आंध्रात सामील करण्यात आले. मराठवाड्याचे पाच जिल्हे नव्या मुंबई राज्यात (द्वैभाषिकात) समाविष्ट करण्यात आले आणि गुलबर्गा, बीदर व रायचूर हे तीन कानडी भाषिक जिल्हे संयुक्त कर्नाटकामध्ये सामील करण्यात आले. १९५६ साली भारताची भाषिक आधारावर पुनर्रचना करण्यात आली.

**तेलंगणा प्रजासमितीचा उदय**

नोव्हेंबर १९५६ साली नीलम संजीव रेड्डी आंध्रचे मुख्यमंत्री झाले आणि हैद्राबाद ही राज्याची राजधानी झाली. तेलंगणाचे नऊ जिल्हे मागासलेले होते व त्या मानाने आंध्र प्रदेशाचा भाग जास्त पुढारलेला होता. तेथे शेती व व्यापार मोठ्या प्रमाणात होता. हैद्राबाद राजधानी झाल्यानंतर, आंध्रातील उद्यमी लोकांनी तेथे मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली. तेथे जमिनी घेतल्या. कारखाने काढले, एकूण अर्थकारणात व राजकारणात आंध्रचा दबदबा वाढत होता आणि विकासासाठीचा बराच पैसा आंध्रच्या विकासासाठी वापरला जात होता. या काळात आंध्र सरकारने पाटबंधारे व धरणे बांधण्यात पुढाकार घेतला. आंध्रातील लाखो एकर जमीन पाण्याखाली आली. या काळात आपण सर्वच बाबतीत आंध्रपेक्षा मागासलेले आहोत अशी भावना तेलंगणात निर्माण झाली. १९६३ नंतर आंध्रचे राजकारण के. ब्रह्मानंद रेड्डी या अत्यंत चाणाक्ष नेत्याच्या हातात गेले. तेलंगणा भागात असंतोष वाढत होता. मधल्या काळात कम्युनिस्ट पक्षात फूट पडली; १९६७ साली तेलंगणा भागात नक्षलवादी चळवळीने मूळ धरले व मागास आदिवासी भागात त्यांचा प्रभाव वाढला.

१९६७ साली तेलंगणा भागात वेगळ्या राज्याची मागणी सुरू झाली. १९६८-६९ साली माजी केंद्रीयमंत्री डॉ.चेन्ना रेड्डी यांच्या पुढारीपणाखाली तेलंगणा प्रजासमितीची स्थापना झाली आणि या चळवळीस जनतेचा मोठा पाठिंबा मिळाला; पण आंध्र प्रदेशचे विभाजन करण्याची त्या वेळच्या पंतप्रधानांची तयारी नव्हती. १९७१ च्या लोकसभा निवडणुकीत तेलंगणा प्रजासमितीने ११ पैकी आठ जागा जिंकल्या. इंदिरा गांधींनी ब्रह्मानंद रेड्डी यांना राजीनामा द्यावयास सांगितले. त्यांच्या जागी तेलंगणाचे नेते पी.व्ही.नरसिंहराव आंध्रचे मुख्यमंत्री झाले. तेलंगणा राज्य देण्याऐवजी तेलंगणास सवलती देण्यात आल्या. तेथे केंद्रीय विद्यापीठ स्थापन करण्यात आले. नोकऱ्यांच्या बाबतीत तेलंगणाच्या लोकांना सवलती देणारा मुलकी कायदा १९७५ साली संमत झाला.

त्याविरुद्ध १९७३ साली आंध्रातील लोकांनी मोठी चळवळ करून वेगळ्या राज्याची मागणी केली. या चळवळीची तीव्रता फार होती व त्यामुळे दोन्ही भागातील लोकांची मने दुखावली. नरसिंहराव यांना दोन वर्षांतच मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला. त्यानंतर त्यांनी आंध्रच्या राजकारणाचा त्याग केला व केंद्रातील काँग्रेसचे ते सरचिटणीस झाले.

**तेलंगणाची मागणी पुन्हा सुरू झाली**

१९७८ व १९८९ मध्ये डॉ.चेन्ना रेड्डी पुन्हा काँग्रेसचे मुख्यमंत्री झाले. त्यांनी काँग्रेसला विजय मिळवून दिला. १९८३ पासून आंध्रच्या राजकारणात 'रामाराव पर्व' सुरू झाले. एन.टी.रामाराव यांनी तेलंगणा व आंध्र या दोन भागांत मोठे विजय मिळविले. त्यांचे तेलगु भाषिकांच्या स्वाभिमानाचे राजकारण काही प्रमाणात यशस्वी ठरले. त्यामुळे १९८३-८९ व १९९४-९६ या त्यांच्या कार्यकाळात तेलंगणाचा मुद्दा तेवढ्या आक्रमकपणे पुढे आला नाही. १९९६ साली चंद्राबाबू नायडू यांनी सत्ता आपल्या ताब्यात घेतली व रामाराव यांना पदच्युत केले. १९९९ सालच्या विधानसभा निवडणुकात चंद्राबाबू नायडू यांच्या तेलगु देशम पक्षास मोठे यश मिळाले.

आपल्या साडेआठ वर्षांच्या कारकिर्दीत नायडू यांनी आंध्र प्रदेशात विकासाची नवी प्रक्रिया सुरू केली. हैद्राबादेत भांडवलाची मोठी गुंतवणूक झाली. तेथे बेंगलोरच्या खालोखाल माहिती तंत्रज्ञान व संगणकाचे उद्योग आले आणि हैद्राबादचा प्रचंड विकास झाला. हैदराबादचे तीन भाग पडले. त्यांतील विकसित आधुनिक भागात नवश्रीमंत, मध्यम व उच्च मध्यमवर्गीय राहात होते. या भागात श्रीमंत आंध्रवासीयांचे वर्चस्व होते. दुसरा

बाग निम्न मध्यमवर्गीय व कामगार असणाऱ्या तेलगु लोकांचा, जे तेलंगणातून आले होते व तिसरा भाग मुस्लिम लोकवस्तीचा. आजही हैद्राबादेत मुस्लिम लोकसंख्या ३५ टक्क्यांपेक्षा जास्त आहे आणि त्यांचा पाठिंबा मजलिसे इत्तेहादुल मुसलमीन या जातीयवादी संघटनेस आहे. त्यांचाच खासदार निवडून येतो. परवाच्या पालिका निवडणुकांत संघटनेस ४२ जागा मिळाल्या. हैद्राबाद शहरात अशा प्रकारे विषमता आहे. तेलंगणाचे जे ८ जिल्हे आहेत, ते मागास आहेत व त्या भागात जंगले असून आदिवासी लोकसंख्या मोठ्या प्रमाणात आहे. या भागाचा शेती व औद्योगिक विकास झालेला नाही. चंद्राबाबू नायडू आणि त्यांच्यानंतर डॉ.राजशेखर रेड्डी यांच्या काळात आंध्राचा जो विकास झाला, त्याचा लाभ आंध्र विभागास झाला. पाणी वाचवून पाटबंधारे बांधण्याच्या कामात आंध्र सरकारने उत्तम काम केले, पण त्या पाटबंधाऱ्यांचा फायदा तेलंगणापेक्षा आंध्र विभागास झाला. त्यामुळे तेलंगणात अलगतावाद वाढू लागला.

**छोट्या राज्यांची स्थापना**

भारतीय जनता पक्षाच्या सरकारने छोट्या राज्यांच्या स्थापनेच्या मागणीस पाठिंबा दिला व त्याप्रमाणे मध्यप्रदेश बिहार व उत्तर प्रदेश या मोठ्या राज्यांचे विभाजन करून छत्तीसगड, झारखंड व उत्तरांचल या राज्यांची स्थापना करण्यात आली. या तीन राज्यांपैकी फक्त झारखंड भागातच वेगळ्या राज्याच्या मागणीची चळवळ तीव्र होती. छत्तीसगड व उत्तरांचल या राज्यांचा गेल्या काही वर्षांत चांगल्या प्रकारे विकास झाला आहे. राजकीय अस्थिरता व योग्य नेतृत्वाचा अभाव यामुळे झारखंडचा म्हणावा तसा विकास झाला नाही. तेलगंणात विभाजनवाद्यांनी उठाव केला आणि के.चंद्रशेखरराव यांनी तेलंगणा राष्ट्र समितीची स्थापना केली. २००४ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी काँग्रेसशी आघाडी केली. काँग्रेसने तेलंगणा राज्य स्थापन करण्याचे व नवा राज्य पुनर्रचना आयोग स्थापन करण्याचे मान्य केले. राव केंद्रात मंत्री झाले, पण आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री डॉ.रेड्डी यांच्या विरोधामुळे ही गोष्ट झाली नाही. नवा राज्यपुनर्रचना आयोग स्थापन करण्याचे आश्वासन केंद्र सरकारने पाळले नाही. आंध्रचे मुख्यमंत्री डॉ.राजशेखर रेड्डी यांनी तेलंगण नेते चंद्रशेखर राव यांचे आव्हान स्वीकारले आणि त्यांचा त्यांनी निवडणुकीत पराभव केला. त्यांचे अनेक उमेदवार पराभूत झाले.

२००९ च्या विधानसभा निवडणुकांत राव आणि चंद्राबाबू नायडू यांची आघाडी झाली. पण त्यानंतर नायडू यांनी तेलंगणास असणारा विरोध सोडून दिला आणि वेगळ्या तेलंगणा राज्यास पाठिंबा दिला. 'प्रजाराज्यम्' नावाचा पक्ष चिरंजीवी नावाच्या सिने अभिनेत्याने स्थापन केला. त्यास चांगला पाठिंबा मिळत होता. त्यांनीही स्वतंत्र तेलंगणा राज्यास पाठिंबा दिला, मात्र डॉ.रेड्डी यांचा त्यास विरोध होता.

२००९ च्या विधानसभा व लोकसभा निवडणुकांत काँग्रेसचा विजय झाला. लोकसभेत त्यास ४२ पैकी ३३ जागा मिळाल्या आणि राव व नायडू यांच्या आघाडीचा तेलंगणा भागात पण मोठा पराभव झाला. नायडू यांना राव यांच्या मदतीने रेड्डी यांचा पराभव करावयाचा होता, पण त्यांना त्यात यश मिळाले नाही. रेड्डी यांच्या काळात राव यांना चळवळ सुरू करता आली नाही.

**तेलंगणातील उठाव**

पण ऑगस्ट २००९ मध्ये डॉ.रेड्डी यांचे निधन झाले. त्यांच्या जागी वयोवृद्ध नेते रोसैया यांना मुख्यमंत्री नेमण्यात आले, पण रेड्डी समर्थकांना त्यांच्या जागी रेड्डींचे पुत्र जगमोहन यांना आणावयाचे होते. याच काळात राव यांनी आपल्या समर्थकांची पुन्हा जमवाजमव करावयास सुरुवात केली. उस्मानिया विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी त्यांना पाठिंबा दिला आणि त्यांचे पुत्र रामाराव यांनी त्यात महत्त्वाची भूमिका बजावली. तेलंगणातील उस्मानिया व काकतीय विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी रस्त्यावर येऊन चळवळ सुरू केली. रेड्डी यांनी दाबून टाकलेला हा वेगळ्या राज्याचा प्रश्न पुन्हा धसास लागला.

या बदलत्या वातावरणात राव यांनी उपोषणास सुरुवात केली. लोकांचा व विद्यार्थ्यांचा त्यांना पाठिंबा मिळाला, मात्र 'आता माघार घ्यायची नाही' असे त्यांना बजावण्यात आले. राव यांची प्रकृती बिघडली आणि संपूर्ण तेलंगणात परिस्थिती तंग झाली.

यावेळी केंद्रीय गृहमंत्री पी. चिदंबरम् यांनी घोषणा केली की तेलंगणा राज्य स्थापन करण्याची मागणी केंद्राने मान्य केली आहे आणि राज्यसरकारला विधानसभेत तसा ठराव करण्यास सांगितले आहे. यावेळी चिदंबरम् यांनी असे गृहीत धरले की प्रजाराज्यम् व तेलगु देसम्, काँग्रेस व भाजप या चार पक्षांचा पाठिंबा असल्यामुळे तेलंगणास सर्वपक्षीय मान्यता आहे आणि त्याबाबत कोणतीही अडचण येणार नाही; पण चिदंबरम यांना जुना इतिहास माहीत नसावा. आंध्र प्रदेशात त्याविरुद्ध लोकांनी उठाव केला आणि संयुक्त आंध्रच कायम राहिला पाहिजे; आंध्राचे विभाजन आम्हास मान्य नाही असे म्हणावयास सुरुवात केली. विद्यार्थी विरोधात आहेत, जनमत विरोधात आहे हे पाहताच चिरंजीवी व नायडू यांनी माघार घेतली आणि अलग तेलंगणा राज्यास विरोध सुरू केला. रोसैय्या यांचे आसन डळमळीत करण्यासाठी त्यांच्या विरोधातील सर्व काँग्रेसजन रस्त्यावर आले. डॉ.मनमोहनसिंग, चिदंबरम व सोनिया गांधी यांना खोल राजकीय अनुभव नसल्यामुळे व त्याबाबत त्यांनी मुखर्जी, पवार, अँटोनी या मंत्र्यांचा सल्ला न घेतल्यामुळे आज हा प्रश्न निर्माण झाला.

आंध्रमधील तीव्र विरोधामुळे व आमदारांच्या राजीनाम्यांमुळे दबावात येऊन चिदंबरम यांनी अशी घोषणा केली की 'या विषयावर व्यापक चर्चा घडवून आणल्यानंतर अंतिम निर्णय घेतला जाईल.' यामुळे आंध्र शांत झाला तर तेलंगणात उठाव झाला. ७२ आमदार व १३ मंत्र्यांनी राजीनामे दिले. आता प्रकरण आहे तसेच आहे, सरकाराला काम करणे अवघड झाले आहे.

आंध्रातील लोकांना तेलंगणाबाबत फारसे प्रेम नाही, तेलंगणा आंध्रात राहावा म्हणून त्यांनी फार प्रयत्नही केलेले नाहीत. त्यांचा तेलंगणातील जनतेशी त्याबाबत संवादही नाही. त्यांच्या तीव्र विरोधाची तीन कारणे आहेत.

*(पृष्ठ १८ वर*

# विकासाची दिशा, गती व छोटी राज्ये

**पन्नालाल सुराणा**

**मागास प्रदेशांच्या हिताची ज्यांना तळमळ आहे व समाजाच्या समतोल विकासाचे ज्यांना अगत्य आहे, अशा सर्वच नागरिकांनी छोट्या राज्याच्या मृगजळामागे न धावता आर्थिक धोरणांची दिशा बदलणे व जल, जंगल, जमीन, खनिज आदींच्या विवेकशील वापराबाबत ग्रामसभेने क्रियाशील होणे या दिशेने प्रयत्न केले पाहिजेत.**

तेलंगणामुळे छोटी राज्ये निर्माण व्हावीत असे अनेक ठिकाणाहून मागितले जात आहे. राज्य पुनर्रचना आयोग नव्याने नेमावा असेही सुचवले जात आहे.

सन १९५३ मध्ये आंध्रच्या निर्मितीसाठी सुरू केलेल्या उपोषणात पोट्टी श्रीरामुलू यांचे निधन झाल्याने त्या भागातील जनक्षोभ अनावर झाला. त्यामुळे भारत सरकारला आंध्र राज्य निर्मितीची (म्हणजे त्यावेळच्या मद्रास प्रांतातील तेलगुभाषक प्रदेश तोडून वेगळे राज्य करणे) घोषणा करावी लागली. वेगवेगळ्या भागांत भाषावार राज्य रचना व्हावी, या मागणीसाठी जनआंदोलने चालली होतीच. ते तत्त्व स्वातंत्र्य चळवळीचा एक भाग म्हणून १९२८ साली काँग्रेसने मान्य केले होते. ब्रिटिशांनी भारताचे विविध प्रदेश स्थानिक राज्यकर्त्यांचा पराभव करून स्वत:च्या ताब्यात घेतल्यावर ते मोठमोठ्या प्रांतांत एकत्र केले. बंगालमध्ये आजच्या बिहार, ओरिसा व आसाम सकट सगळा भाग होता. मद्रासेत ओडिशाच्या दक्षिण भागापासून तो तेलगुभाषक व त्याच्या दक्षिणेकडील तमीळभाषक किनारपट्टी व मल्याळीभाषकही होते. थोडा कन्नडभाषक प्रदेशही होता. मुंबईत सिंध, गुजरात, पश्चिम महाराष्ट्र आणि बेळगाव-धारवाड हे कन्नडभाषक जिल्हे होते.

ब्रिटिशांनी स्वत:च्या सोयीसाठी राज्यकारभार इंग्रजी भाषेतून चालवायला सुरुवात केली. त्यामुळे सामान्य जनतेला फारच अवघड झाले. काही थोडे थर भराभर इंग्रजी शिकू लागले. तरी बहुसंख्य शेतकरी व अन्य कष्टकरी वर्गांना शिक्षणच दुष्प्राप्य होते. त्यात इंग्रजीची लिपी व व्याकरण दोन्ही फारच वेगळे असल्याने ती शिकणे मेहनतीचे काम असे.

भारतीय नागरिकांना राज्यकारभारात भाग घ्यायला जास्तीत जास्त अधिकार व वाव मिळाला पाहिजे, यासाठी स्वातंत्र्य चळवळ चालवली जात होती. लोकांनी राज्यकारभारात भाग घ्यायचा तर भाषेचा अडसर दूर होणे आवश्यक होते. प्रांतांचा कारभार तिथल्या लोकभाषेतून चालावा, अशी मागणी पुढे आली. एका प्रांतात दोन, तीन किंवा चार भाषा बोलणारे प्रदेश होते. लोकभाषा हे राज्यकारभाराचे माध्यम करण्यात ती अडचण होती. म्हणून एक भाषा बोलणाऱ्या जवळजवळच्या प्रदेशांचे मिळून एक राज्य व्हावे ही मागणी केली गेली. स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या काँग्रेसच्या राष्ट्रीय अधिवेशनात तो ठराव मंजूर झाला होता. त्या संघटनेने स्वत:च्या सोयीसाठी तशा प्रादेशिक समित्या (उदा. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समिती, गुजरात प्रदेश काँ.क., इ.) नेमायला सुरुवात केली होती. संघटनेचे कामकाज लोकभाषांतून होऊ लागले.

१९४७ साली ब्रिटिशांची सत्ता झुगारून भारत स्वतंत्र झाला. राज्यघटना बनवण्याचे काम चालू झाले. राज्याची भाषेच्या तत्त्वावर फेररचना करावी, अशी मागणी काही जण करत होते. साडेपाचशे संस्थाने भारतीय संघराज्यात सामील झाली होती. हैदराबाद संस्थानात तेलगु, मराठी व कन्नडभाषक प्रदेश होते. तिथल्या लोकांना स्वभाषिक बांधवांबरोबर जोडले जावे असे वाटत होते. सौराष्ट्रात अडीचशे संस्थाने होती. त्या सगळ्यांना एका राज्यात घालण्यात आले होते. दक्षिणेकडे म्हैसूर, कूर्ग तसेच त्रावणकोर-कोची आदी संस्थाने होती. पंजाबातही अनेक संस्थाने होती. त्या परिस्थितीत राज्यांची पुनर्रचना करणे निकडीचे झाले होते; पण आधीच फाळणीमुळे देशात तणाव आणि दंगली होत असताना हे नवे लचांड मागे कशाला लावून घ्यायचे, असे पंतप्रधान नेहरू व अन्य नेत्यांना वाटत होते. आंध्र राज्य स्थापनेची घोषणा करावी लागल्यानंतर इतर ठिकाणच्या तशा चळवळी जोर धरणार हे दिसू लागले. म्हणून न्या. फाजल अली यांच्या अध्यक्षतेखाली राज्य पुनर्रचना आयोग नेमण्यात आला. भाषावार राज्यरचनेची मागणी लोकशाहीकरणाच्या दृष्टीने योग्य असली तरी तो राज्यनिर्मितीचा एकमेव निकष होऊ शकत नाही. प्रशासकीय सोय व वित्तीय पातळीवर टिकून राहण्याची शक्यता हे निकषही महत्त्वाचे आहेत, असे फाजल अली आयोगाने म्हटले. महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, केरळ, तामीळनाडू, आंध्र, पंजाब आदी एकभाषक राज्ये बनवण्याची शिफारस त्यांनी केली. हिंदी भाषेचा प्रदेश फारच मोठा असल्याने त्याचे एक राज्य करणे अव्यवहार्य आहे; म्हणून मध्य प्रदेश, राजस्थान, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश व बिहार ही राज्ये असावीत, काही जवळचे प्रदेश घातले जावेत, असे त्यांनी सुचवले. एकंदरीने राज्यांची संख्या कमी करण्याचे व भाषावार

राज्यरचना साकार करण्याचे काम सन १९५५च्या राज्यपुनर्रचना कायद्याने केले. काही ठिकाणी एकभाषक प्रदेश अन्यभाषक राज्यात राहिला आहे, अशा स्वरूपाचे सीमावाद उभे राहिले. ते ते विशिष्ट प्रश्न सोडवण्यासाठी पाटसकर समिती, महाजन आयोग आदी नेमले गेले. हरियाणा हिंदीभाषक राज्य. पंजाबातील तेवढा प्रदेश तोडून नवे राज्य निर्माण करण्यात आले. एकंदरीने राज्य पुनर्रचना स्थिरावली. राज्याचा कारभार लोकभाषेतून चालवायला गती आली. त्यामुळे लोकशाहीकरणाची प्रक्रिया गतिमान झाली. भाषावार राज्यरचनेमुळे राष्ट्रीय एकात्मतेला कसलाही धोका निर्माण झाला नाही. काही सीमावाद ठसठसत असले, तरी ते फारच सीमित आहेत.

बिहार, उत्तर प्रदेश व मध्य प्रदेश ही फारच मोठी राज्ये होती. त्यांतून अनुक्रमे झारखंड, उत्तरांचल व छत्तीसगड ही तीन राज्ये सात-आठ वर्षांपूर्वी निर्मिली गेली. राज्य कारभार लोकभाषेतून चालू राहिला.

राज्य मोठे असले तर प्रगत प्रदेशाचे वर्चस्व राहते आणि मागास प्रदेशाच्या विकासाकडे दुर्लक्ष होते, असे अनेक ठिकाणी अनुभवाला येऊ लागले. ही समस्या सोडवण्यासाठी विदर्भ, बुंदेलखंड आदी राज्यांची निर्मिती करण्याच्या मागण्या केल्या जात आहेत.

विकासाची दिशा व गती वाढवणे गरजेचे झाले आहे; पण नव्या राज्यांची निर्मिती हा त्यावर उपाय होऊ शकतो का? उत्तरांचल, छत्तीसगड व झारखंड या नव्याने बनवण्यात आलेल्या किंवा १९६१ पासून स्वतंत्र राज्य म्हणून चालणाऱ्या गोव्यातील घडामोडी पाहिल्यास विकासाची गती वाढल्याचे दिसून येत नाही. राजकारणात सरंजामी निष्ठांचा प्रभाव, संधिसाधुपणा यांना मात्र ऊत आल्यासारखे दिसते.

मागास प्रदेशांच्या विकासाची गती वाढवण्यात जी मुख्य अडचण आहे, ती वेगळीच आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेत पुढील उद्दिष्टे नमूद करण्यात आली होती - १) सर्वसामान्य माणसाचे जीवनमान उंचावणे, २) सर्व प्रौढ स्त्री-पुरुषांना अर्थपूर्ण रोजगार मिळवून देणे, व ३) मागास प्रदेशांची विकासाची गती वाढवून प्रादेशिक समतोल साधणे.

पहिल्या चार दशकांत ही उद्दिष्टे साध्य करण्याच्या दिशेने समाधानकारक काम झाले नसले, तरी ती उद्दिष्टे प्रमाण मानून विविध योजना आखल्या जात होत्या. पायाभूत सोयी निर्माण करणे व महत्त्वाचे अवजड उद्योग उभारून चालवणे, या जबाबदाऱ्या सरकारने उचलाव्यात हेही धोरण राबवले जात होते. देशाच्या विकासाची पायाभरणी त्यामुळे चांगली झाली, असे आता अनुभवाला येत आहे.

सन १९९१ मध्ये अंगीकारण्यात आलेल्या नव्या आर्थिक धोरणांमुळे आर्थिक व्यवहारात खुल्या बाजारपेठेला मुक्त वाव ठेवावा; सरकारने त्या क्षेत्रातून बाहेर पडावे; विकासाची गती वाढवण्यासाठी, म्हणजे नवनवे आधुनिक तंत्रज्ञानावर आधारलेले उद्योग उभे करावेत व त्यासाठी परकीय भांडवलास मुक्त वाव द्यावा अशी धोरणे राबवली जात आहेत. परकीय भांडवलाच्या आधारे जे कारखाने उभारले जातात, ते सर्व सोयी असलेल्या प्रगत महानगरीय केंद्राच्या भोवतीच; आणि आर्थिक व्यवहारातून सरकारने बाहेर पडावे या धोरणामुळे रस्ते, शाळा, सिंचन सोयी, वीजनिर्मिती आदींवर होणारा सरकारी खर्च कमी झाला आहे. मागास प्रदेशात विकासयोजना राबवण्यासाठी अनुभवी कंत्राटदारांची अनुपलब्धता यांसारख्या अडचणी आहेतच. 'पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप'चे कार्यक्रमही प्रगत प्रदेशांतच केले जात आहेत.

विकासाची गती न वाढण्याला मागास प्रदेशातील राजकीय नेतृत्वाच्या दोन उणिवा दिसून येत आहेत. संसदेत व विधिमंडळात निवडून गेलेले त्या प्रदेशातले प्रतिनिधी आपल्या भागांच्या विकासाच्या गोष्टींबद्दल पुरेसे जागरूक राहात नाहीत. मग प्रगत प्रदेशांच्या नावाने खडे फोडून काय उपयोग?

दुसरे असे की, ७३व्या व ७४व्या घटनादुरुस्तीमुळे जिल्हा परिषदा आणि ग्रामपंचायती यांना शेती, वाहतूक, शिक्षण आदींबाबत जास्त अधिकार देण्यात आले आहेत; पण त्यांचा उपयोग केला जात नाही. व्हॅटच्या उत्पन्नातील ठराविक हिस्सा जिल्हा परिषदांना द्यावा, अशासारख्या राज्य वित्त आयोगाच्या शिफारसींची अंमलबजावणी राज्याचे सत्ताधारी करत नाहीत आणि मागास प्रदेशातील प्रतिनिधी तसा आग्रह धरत नाहीत. जिल्हा नियोजन आणि विकास मंडळाचे अध्यक्षपद जि.प. अध्यक्षाकडे द्यावे, अशी शिफारस असताना अजूनही पालकमंत्रीच ते पद भूषवित आहेत. मागास प्रदेशातील जि.प.चे सभासद त्याबाबत मूग गिळून बसले आहेत. विकासाची गती वाढवण्यासाठी जे अधिकार घटनादुरुस्ती व इतर कायद्यांनी उपलब्ध करून दिले आहेत, त्यांचा वापर न करणारे राजकीय नेतृत्व छोटे राज्य बनवल्यानंतर तरी काय दिवे लावणार आहे? झारखंड, छत्तीसगड किंवा गोवा यांसारखेच राजकारण तेथे चालू राहण्याची शक्यता जास्त आहे, असे खेदाने म्हणावे लागत आहे.

मागास प्रदेशांच्या विकासाला वेग यावा असे ज्यांना वाटते त्यांनी खुल्या बाजारपेठेवर आधारलेल्या आर्थिक धोरणांतील महत्त्वाच्या बाबींना विरोध केला पाहिजे. नुकतेच अमेरिकेला वित्तीय बुडबुडे फुटून मंदीचे आघात सोसावे लागले. त्यातून बाहेर पडण्यासाठी शासनाने खाजगी उद्योजकांच्या बेधुंद व्यवहारांवर नियंत्रण ठेवावे व सामान्य नागरिकाला बचत रकमेची सुरक्षितता वगैरेंबाबत हमी द्यावी असे विचार काही अर्थशास्त्रज्ञ मांडत असून, सत्ताधाऱ्यांनाही तशी पावले उचलावी लागत आहेत. मागास प्रदेशांच्या हिताची ज्यांना तळमळ आहे व समाजाच्या समतोल विकासाचे ज्यांना अगत्य आहे, अशा सर्वच नागरिकांनी छोट्या राज्याच्या मृगजळामागे न धावता आर्थिक धोरणांची दिशा बदलणे व जल, जंगल, जमीन, खनिज आदींच्या विवेकशील वापराबाबत ग्रामसभेने क्रियाशील होणे या दिशेने प्रयत्न केले पाहिजेत.

**पन्नालाल सुराणा**
मु.पो. आसू, ता. परंडा,
जि. उस्मानाबाद - ४१३५०२.

■

# राज्य पुनर्रचना आयोग पुन्हा नेमावा!

स्वतंत्र तेलंगण राज्याच्या निर्मितीसाठी के. चंद्रशेखर राव यांनी केलेले उपोषण आणि त्यानंतर गृहमंत्री श्री. चिदंबरम् यांनी लोकसभेत स्वतंत्र तेलंगणा राज्य निर्माण करण्याचा निर्णय घेतला असल्याची घोषणा आणि त्यानंतर घडत असलेल्या घटना यांमुळे संपूर्ण राज्य पुनर्रचनेकडे नव्याने आणि गंभीरपणे पाहाण्याची निकड निर्माण झाली आहे.

मला स्वत:ला 'राज्य पुनर्रचना आयोग' नेमणे, हे आवश्यक आणि सयुक्तिक आहे असे वाटते. या संदर्भात माध्यमातून होत असलेली चर्चा फारच उथळ स्वरूपाची आहे. म्हणून मला पुढील मुद्दे मांडावेसे वाटतात –

१) प्रस्तावित तेलंगणा राज्याची लोकसंख्या सुमारे ३ कोटी किंवा त्याहूनही थोडी जास्तच असावी. आज संपूर्ण जगाचा विचार केला, तर ३ कोटींहून जास्त लोकसंख्या असलेले फक्त १९ देश आहेत. (एकूण देश २०० हून अधिक आहेत.) येथे आपण एका राज्याची गोष्ट करत आहोत. असे असताना तेलंगणा, विदर्भ (सुमारे दोन कोटी लोकसंख्येचा विभाग) अशा प्रस्तावित राज्यांना छोटी राज्ये कसे काय म्हणता येईल?

२) अमेरिका (संयुक्त अमेरिकन राज्ये) या राष्ट्राचा विचार केला तर अमेरिकेची आजची लोकसंख्या सुमारे तीस कोटी आहे व अमेरिकेत एकूण ४९ राज्ये आहेत. म्हणजेच प्रत्येक राज्याची सरासरी लोकसंख्या ६० लाखांच्या आसपास आहे. याची तुलना करता तेलंगणा, विदर्भ ही छोटी राज्ये कशी काय ठरतात?

३) भारतात सध्या २९ राज्ये व ६ केंद्रशासित प्रदेश आहेत. त्यांतील दहा राज्यांची लोकसंख्या एक कोटीच्या आत आहे. (सिक्कीम सर्वांत लहान राज्य आहे. त्याची लोकसंख्या सुमारे ५ लाख आहे. उत्तराखंडची लोकसंख्या ८५ लाख आहे.) उत्तर प्रदेशची लोकसंख्या सुमारे १७ कोटी आहे. राज्यांचे आकार आणि लोकसंख्या यात फारच तफावत आहे. वारंवार घेतलेल्या तात्कालिक आणि तात्पुरत्या निर्णयांमुळे हा असमतोल निर्माण झाला आहे. हा असमतोल दूर करणे गरजेचे आहे.

४) राज्य पुनर्रचना किंवा राज्यांचे विभाजन हा विषय संपूर्णपणे केंद्र सरकारचा आणि त्या त्या प्रदेशातील जनतेचा असला पाहिजे. स्वतंत्र तेलंगणा असावे, की असू नये हा निर्णय केंद्र सरकार घेईल किंवा तेलंगणामधील जनता घेईल. आंध्र प्रदेशातील इतर जनतेने याबाबत हुकुमशाही करणे योग्य नाही. आंध्रच्या विभाजनाचा ठराव आंध्र विधानसभेत संमत झाला तर ठीकच आहे; पण तो व्हायलाच हवा असे म्हणणे योग्य नाही. कोणत्याही सत्ताधारी पक्षाला आपली सत्ता, आपल्या सत्तेचे क्षेत्र कमी व्हावे, असे वाटत नाही. म्हणून तेलंगणावर जबरदस्ती करण्याचा अधिकार अन्य आंध्रवासीयांना नाही.

५) जनता जसजशी अधिक शिकेल तसतशी जनतेची प्रत्यक्ष कारभारात सहभागी होण्याची अपेक्षा वाढत राहणार, हे आपण जाणले पाहिजे. यात गैर काहीच नाही. कोणतीही सुधारणा करावयाची असेल आणि हातांत अधिकार असेल तर निश्चितच ते शक्य होते. आपल्याला उपलब्ध असलेल्या मर्यादित स्वातंत्र्यात देखील छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात अनेक गोष्टी करून दाखवल्या. त्यामुळे वेगळ्या राज्यांची मागणी दडपण्यासाठी विशेष पॅकेज देण्याची घोषणा निषेधार्ह आहे.

६) आमच्या लहानपणी म्हणजे पंडित नेहरू पंतप्रधान असताना वार्षिक अंदाजपत्रक असे. त्यानंतर कुठली तरी पॅकेजेस् किंवा १५ ऑगस्ट, २६ जानेवारी आणि अशाच अन्य दिवशी कोणत्या तरी नवीन घोषणा होत नसत. आजकाल या गोष्टी कशा घडत असतात तेच कळत नाही. नियोजन, पंचवार्षिक योजना, अंदाजपत्रक यांना काहीच अर्थ उरलेला नाही का?

७) लहान राज्यांतील सरकारे अस्थिर असतात, असे बोलले जाते. प्रत्यक्षात यात केंद्र सरकारचा किंवा काँग्रेस आणि भारतीय जनता पक्ष अशा बड्या पक्षांचा हात असतो. राज्यपाल आणि सी.बी.आय. या संस्था केंद्र सरकारचे एजंट म्हणून काम करून विरोधी पक्षांची सरकारे पाडण्याच्या प्रयत्नांत असतात. शिबू सोरेन चांगले आहेत, असे मी म्हणणार नाही, पण आता ते झारखंडचे मुख्यमंत्री झाल्यावर केंद्र सरकार त्यांच्या मागे सी.बी.आय.चा ससेमिरा लावील आणि त्यांच्याविरुद्धचे सर्व ज्ञात आणि अज्ञात खटले एकाएकी सुरू होतील. एन.टी. रामाराव यांचे आंध्रमधील सरकार आणि फारूख अब्दुल्ला यांचे काश्मीरमधील सरकार ही अशीच फोडाफोडी करून पाडण्यात आली होती.

८) छोटी राज्ये ही आर्थिक दृष्ट्या सक्षम नसतात असे म्हणण्याची पद्धत आहे. प्रत्यक्षात आज कुठलेच राज्य सक्षम उरलेले नाही. पाचव्या वेतन आयोगानेच राज्यांचे कंबरडे मोडले आहे. सहाव्या वेतन आयोगाने काय होईल ते सांगता येत नाही. आजच महाराष्ट्राचे कर्ज २ लाख कोटींच्या वर आहे. पाच-सहा वर्षांनंतर ते अडीच लाख कोटी झालेले आपल्याला दिसेल. कुठे आली आहे आर्थिक सक्षमता?

वरील सर्व मुद्यांचा विचार करता मला असे वाटते, की सर्वच राज्यांची पुनर्रचना करणे आवश्यक आहे. सुमारे ५० लाख ते दोन कोटी लोकसंख्या, २० लाख ते ५०-६० लाख हेक्टर क्षेत्रफळ आणि भौगोलिक, भाषिक व सांस्कृतिक साधर्म्य असे काही निकष लावून राज्य पुनर्रचना करण्यात यावी. १९५७ साली भाषिक आधारावर राज्ये स्थापन झाली, ती त्या काळाची गरज होती. आज त्याला पन्नास वर्षे झाली. काळ प्रवाही असतो. राज्ये वेगळी झाली तरी ती तिथेच राहणार असतात. त्यामुळे 'महाराष्ट्राचे लचके तोडू देणार नाही, मुंबई आमचीच आहे, १०५ हुतात्मे' अशा गोष्टींवर भावना भडकविण्यात अर्थ नाही. प्रशासकीय दृष्टिकोनातून हे योग्य नाही. जनतेच्या वाढत्या आकांक्षांना बंधने घालणे फार काळ शक्य होणार नाही.

**श्याम रा. केळकर**
३, गुलमोहोर, अप्सरा टॉकीजजवळ, गुलटेकडी, पुणे ४११०३७.
दूरध्वनी : ०२०-२४२६३३८७.



गोविंद तळवलकर



# फॉरिन अफेअर्स

**पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर, आंतरराष्ट्रीय राजकारण निराळ्या पद्धतीने चालवण्याची आवश्यकता वाटू लागलेल्या अमेरिका व इंग्लंडमधील विचारी लोकांनी न्यूयॉर्क येथे स्थापन केलेल्या 'कौन्सिल ऑन फॉरिन रिलेशन्स' या संस्थेच्या वतीने १९२२ पासून 'फॉरिन अफेअर्स' हे द्वैमासिक चालवले जाते. अनेकविध देशांचे अध्यक्ष, पंतप्रधान व परराष्ट्रमंत्री यांचे लेख यातून प्रसिद्ध होतात. अमेरिका व सोव्हिएत युनियन या दोन महासत्तांमध्ये समझोता व्हावा, यासाठी 'फॉरिन अफेअर्स'ने ४५ वर्षांत २४८ लेख प्रसिद्ध केले. आज त्याचा खप दोन लाख असून, रशियन, स्पॅनिश व जपानी भाषेत त्याच्या आवृत्त्या प्रसिद्ध होत आहेत.**




पहिल्या महायुद्धानंतर पॅरिस येथील शांतता परिषदेत इंग्लंड व फ्रान्सच्या राज्यकर्त्यांनी जर्मनीला शासन करण्यासाठी कडक धोरण स्वीकारले होते. नंतर राष्ट्रसंघाची (लीग ऑफ नेशन्सची) स्थापना झाली. त्याचा डळमळता पाया पाहून अमेरिका व इंग्लंडमधल्या अनेक विचारी लोकांना आंतरराष्ट्रीय राजकारण निराळ्या पद्धतीने चालवण्याची आवश्यकता वाटू लागली. यासंबंधी चर्चा, संशोधन इत्यादी होण्यासाठी एखादी संस्था असावी असे वाटून, न्यूयॉर्कमध्ये १९२१ मध्ये 'कौन्सिल ऑन फॉरिन रिलेशन्स' या नावाने संस्था स्थापन करण्यात आली. वर्षभरानंतर, म्हणजे १९२२ मध्ये या संस्थेतर्फे 'फॉरिन अफेअर्स' या नावाचे द्वैमासिक प्रसिद्ध होऊ लागले.

संस्थेचा व द्वैमासिकाचा व्याप वाढत जाऊन वॉशिंग्टनमध्ये कौन्सिलची शाखा स्थापन झाली. 'फॉरिन अफेअर्स'चा खप आता दोन लाख आहे. याखेरीज या द्वैमासिकाच्या रशियन, स्पॅनिश व जपानी भाषांत आवृत्त्या प्रसिद्ध होतात. या आंतरराष्ट्रीय आवृत्त्यांत त्या त्या देशांतल्या तज्ज्ञांचे लिखाण येते आणि मूळ अमेरिकन आवृत्तीतील काही लेख भाषांतरित स्वरूपात दिले जातात. 'फॉरिन अफेअर्स' आणि कौन्सिलच्या स्वतंत्र वेबसाईट आहेत.

'फॉरिन अफेअर्स'ने प्रथमपासून कौन्सिलप्रमाणेच कोणत्याही विषयासंबंधी कोणतीही भूमिका न घेण्याचे धोरण अवलंबले आहे. कौन्सिल अनेक संशोधक, अभ्यासक इत्यादींना त्यांची मते मुक्तपणे व्यक्त करण्याचे व्यासपीठ मिळवून देत असले, तरी ते स्वत: विशिष्ट भूमिका घेत नाही; त्याचप्रमाणे द्वैमासिकही घेत नाही. दोन्हींचे कार्य एकमेकांस पूरक असते. यामुळे कौन्सिल व 'फॉरिन अफेअर्स' यांचा एकत्र विचार करावा लागतो.

कौन्सिलची स्थापना झाली तेव्हा ७५ सभासद होते. आता ही संख्या ४३०० आहे. सभासद विविध विचारांचे असावेत आणि त्यांनी आंतरराष्ट्रीय प्रश्नांचा सर्वांगीण विचार करण्यास प्रोत्साहन द्यावे, असा हेतू बाळगण्यात आला. सरकार व समाज यांच्यात आंतरराष्ट्रीय प्रश्नांसंबंधी जागृती करून आंतरराष्ट्रीय क्षेत्रात पुढे जी पिढी वावरेल तिची बौद्धिक तयारी करण्यास साहाय्य देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. 'फॉरिन अफेअर्स' हे द्वैमासिक याच उद्दिष्टाची पूर्ती करण्याचे एक साधन आहे.

कौन्सिलतर्फे शिष्यवृत्त्या दिल्या जातात आणि काही अभ्यासकांची ठराविक काळासाठी तर काहींची दीर्घ काळासाठी नेमणूक होत असते. अल्पकालासाठी अभ्यासवर्ग तसेच परिसंवाद आयोजित करण्यात येतात. तसेच वर्षातून काही परिषदा घेण्यात येतात. यात होणाऱ्या कामकाजाचे वृत्त वेबसाईटवर मिळू शकते. विविध देशांचे नेते, संशोधक इत्यादी अमेरिकेत येतात, तेव्हा त्यांची व्याख्याने वा मुलाखतीचे कार्यक्रम होतात. कौन्सिलची स्थापना झाल्यानंतर १९२२ साली तेव्हाचे फ्रेंच पंतप्रधान जॉर्ज क्लेमेन्सॉ हे न्यूयॉर्कला आले असता त्यांनी कौन्सिलच्या व्यासपीठाची निवड आपल्या महत्त्वाच्या भाषणासाठी केली होती.

कौन्सिल व 'फॉरिन अफेअर्स' अमेरिकन सरकारशी सहकार्य करीत असले, तरी सरकारची पाठराखण करण्याचे त्याचे धोरण नाही. उलट अनेक वेळा सरकारने 'फॉरिन अफेअर्स'मधील काही लेख वा कौन्सिलने प्रसिद्ध केलेल्या पुस्तिका, यांचा धोरण ठरवताना उपयोग केलेला दिसेल. 'फॉरिन अफेअर्स'चे प्रकाशन १९२२ साली सुरू झाल्यापासून अमेरिकेच्या सर्व परराष्ट्रमंत्र्यांचे लेख दिले आहेत. तसेच अनेकविध देशांचे अध्यक्ष व पंतप्रधानांचे लेखही द्वैमासिकात आले आहेत. भारताचे उदाहरण घेतले तर पंडित जवाहरलाल नेहरू व इंदिरा गांधी यांचे लेख आठवतात.

'फॉरिन अफेअर्स' प्रकाशित करण्याचा निर्णय झाल्यावर हार्वर्ड विद्यापीठातील प्राध्यापक आर्चिबॉल्ड कुलिज यांची निवड करण्यात आली. त्यांनी रशिया व पूर्व युरोपचा तसेच एकंदर आंतरराष्ट्रीय राजकारणाचा खोलात जाऊन अभ्यास केला होता व त्याविषयीचा त्यांचा अभ्यास सर्वमान्य झाला होता. कुलिज यांनी कौन्सिलचे आमंत्रण स्वीकारताना 'आपण हार्वर्डमधील आपले काम बंद करणार नाही' हे स्पष्ट करून द्वैमासिकाचे बाकी सर्व काम करणारा कार्यकारी संपादक शोधण्याची सूचना केली. त्याप्रमाणे हॅमिल्टन फिश आर्मस्ट्रॉंग यांची निवड झाली. ते आंतरराष्ट्रीय राजकारणाचे अभ्यासक होते. आर्मस्ट्रॉंग हे १९२८ साली कुलिज यांच्या निधनानंतर संपादकपदावर आले, ते पद त्यांच्याकडे १९७२ पर्यंत होते. म्हणजे द्वैमासिकाशी ते कार्यकारी व नंतर संपादक या नात्याने पन्नासएक वर्षे निगडित होते. 'फॉरिन अफेअर्स'चा पाया त्यांनी घातला.

कुलिज यांनी पहिल्या महायुद्धाच्या काळात रशियात युद्धाची झळ लागलेल्यांना मदत देण्याचे काम करून अनेक ओळखी करून घेतल्या होत्या. त्यांनी द्वैमासिकाच्या पहिल्या वर्षातील एका अंकात सोव्हिएत युनियनसंबंधी टोपणनावाने लेख लिहिला आणि कार्ल रॅडेक या लेनिनच्या निकटच्या सहकाऱ्यास तो धाडला. रॅडेक याने तो वाचून त्याच्या मोकळ्या जागेत आपली मते नोंदवली. इतकेच नव्हे तर, लेनिननेही लेख वाचताना त्याच्या सवयीप्रमाणे अनेक भागांवर खुणा केल्या आणि आपली मते नोंदवली. ही प्रत कुलिज यांच्याकडे पाठवण्यात आली. कौन्सिलच्या कार्यालयात ती प्रत जपून ठेवलेली आहे. गोर्बाचेव्ह १९८९ मध्ये अमेरिकेत आले तेव्हा त्यांना ही प्रत दाखवली असता, त्यांनी रॅडेकचा अभिप्राय पाहताच 'रॅडेक हा देशद्रोही होता' असा शेरा मारला. म्हणजे इतके सर्व रामायण होऊनही गोर्बाचेव्ह यांच्यावरचा स्टालिनचा संस्कार पूर्णत: पुसला गेलेला नव्हता. रॅडेक हा स्टालिनच्या असंख्य बळींपैकी एक होता.

पुढील काळात अमेरिका व सोव्हिएत युनियन यांच्यात शीतयुद्ध चालू राहिले होते. त्यावेळी दोन महासत्तांत समझोता व्हावा या हेतूने आर्मस्ट्रॉंग यांनी ४५ वर्षांमध्ये २४८ लेख द्वैमासिकात प्रसिद्ध केले. अर्थात यात रशियन राज्यपद्धती व परराष्ट्र धोरण यांची समीक्षा करणारे लेखही येतात. रशियन क्रांतीनंतर स्थापन झालेल्या बोल्शेव्हिक सरकारला अमेरिकेने पहिली काही वर्षे मान्यता दिली नव्हती. कुलिज आणि आर्मस्ट्रॉंग यांच्या मते हे चुकीचे धोरण होते, पण अधिकृतपणे द्वैमासिकाने आपले मत न देण्याची भूमिका घेतल्यामुळे या दोघांनी जाहीर वाद घातला नाही. दोघेही वास्तववादी असल्यामुळे सोव्हिएत सरकारला मान्यता देणे त्यांना आवश्यक वाटत होते, असे मत मॅक्जॉर्ज बंडी यांनी एका भाषणात व्यक्त केले होते. ते नंतरच्या काळात 'फॉरिन अफेअर्स'चे संपादक होते.

'फॉरिन अफेअर्स'मध्ये ग्रंथपरीक्षणास महत्त्वाचे स्थान देण्याचे ठरवून कुलिज यांनी विल्यम लॅन्गर या हार्वर्डच्या प्राध्यापकाची निवड केली. लॅन्गर यांनी दीर्घकाळ एकट्याने परीक्षणाची जबाबदारी पार पाडली आणि तेव्हापासून ग्रंथपरीक्षण हे 'फॉरिन अफेअर्स'चे एक खास वैशिष्ट्य होऊन बसले आहे.

लक्षात घेण्यासारखी गोष्ट ही, की द्वैमासिकाच्या पहिल्या काही वर्षांतच वंशवादाचा प्रश्न हाताळण्यात आला होता. डब्ल्यू.दुबोई या आफ्रिकन-अमेरिकन विचारवंताने लिहिलेले त्यावरील लेख बरेच गाजले. त्या लेखातील काही निष्कर्ष वाचून कुलिज अस्वस्थ झाले होते. या प्रश्नाप्रमाणेच वसाहतवाद आणि महिलामुक्ती हे प्रश्न हाताळणारे लिखाण 'फॉरिन अफेअर्स'ने प्रसिद्ध केले होते.

अमेरिकेने जागतिक प्रश्नांबाबत जागृत राहावे म्हणून हे द्वैमासिक व कौन्सिल प्रयत्नशील असले, तरी पहिल्या महायुद्धापूर्वी व नंतरही तटस्थतेच्या धोरणाचा विलक्षण प्रभाव अमेरिकेतील जनमानसावर व सरकार आणि लोकप्रतिनिधी यांच्यावर होता. जर्मनीत हिटलरचा उदय होत असताना आर्मस्ट्रॉंग यांनी १९३३ साली हिटलरची मुलाखत घेतली. हिटलरची मुलाखत म्हणजे एक लांबलचक व्याख्यान होते. स्वदेशी परतल्यावर आर्मस्ट्रॉंग यांनी एक छोटे पुस्तक लिहिले. त्यात त्यांनी परिस्थितीचे गांभीर्य स्पष्ट केले होते.

हिटलरने आक्रमण केल्यावर ब्रिटन व फ्रान्स यांनी प्रतिकाराचा पवित्रा घेतला. तथापि, फ्रान्स लवकरच शरण गेला. इतके होत असतानाही अमेरिकन लोकप्रतिनिधी तटस्थतेचा आग्रह सोडत नव्हते. रूझवेल्ट यांनी काही मार्ग काढून, ब्रिटनला मर्यादित मदत सुरू केली आणि पर्ल हार्बरवर हल्ला झाल्यानंतर मात्र अमेरिका युद्धात उतरली. रूझवेल्ट यांच्या धोरणास 'फॉरिन अफेअर्स'चा मिळत असलेला पाठिंबा महत्त्वाचा होता.

युद्धानंतर सोव्हिएत युनियनच्या विरोधी धोरण अमेरिकेने स्वीकारले नव्हते, पण स्टालिन बदलण्यास राजी नव्हता. त्याने आक्रमक धोरण स्वीकारले. तेव्हा पश्चिम युरोप वाचवण्यासाठी जी मार्शल मदत योजना अमेरिकेने जाहीर केली तिची वैचारिक पार्श्वभूमी 'फॉरिन अफेअर्स'ने तयार केली होती. स्टालिनच्या दुराग्रही धोरणामुळे बर्लिनची कोंडी करण्यात आली. तिचा बिमोड करण्यात अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स यांनी यश मिळवले. या अनुभवामुळे रशियाच्या परराष्ट्र धोरणाची चिकित्सा करण्याची निकड भासू लागली. त्यासाठी मॉस्कोतील अमेरिकन वकिलास अहवाल देण्याची सूचना करण्यात आली, तेव्हा राजदूत हजर नसल्यामुळे दूतावासातील दुय्यम प्रमुख जॉर्ज केनान यांनी ही जबाबदारी पार पाडली.

केनान हे रशियन भाषा, इतिहास, व समाज यांचे तज्ज्ञ होते. त्यांनी पाच हजार शब्दांचा अहवाल पाठवला. तो अधिक वाढवण्यास त्यांना सांगण्यात आले, तसा वाढवला गेला. याचा प्रसार अमेरिकन परराष्ट्र खात्याच्या अनेक विभागांत करण्यात आला आणि 'फॉरिन अफेअर्स'मध्ये तो संक्षिप्त स्वरूपात देण्यास परराष्ट्रमंत्र्यांनी परवानगी दिली. केनान यांनी तो अहवाल 'एक्स' या टोपण नावाने प्रसिद्धीस दिला. 'फॉरिन अफेअर्स'च्या इतिहासात व नंतर इतकी चर्चा जगभर झालेला दुसरा लेख झाला नाही.

केनान यांनी सोव्हिएत युनियनचे धोरण आक्रमक का आहे, याची मीमांसा करून त्यास पायबंद घालण्याची आवश्यकता प्रतिपादन केली होती. शीतयुद्धाच्या सर्व काळात अमेरिकेच्या धोरणाचा पाया घालण्याचे काम या लेखामुळे झाल्याचे मानले जाते. तथापि, केनान यांनी याच लेखात असेही प्रतिपादन केले होते, की केवळ शस्त्रबळावर रशियास प्रतिकार करण्याचे धोरण यशस्वी होणार नाही. या बळाबरोबरच अमेरिका व दोस्त राष्ट्रे यांनी आपल्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक धोरणातही बदल करायला हवा. या दुसऱ्या भागाकडे दुर्लक्ष झाले. केनान यांच्या भूमिकेस आक्षेप घेणारेही अनेक जण होते.

स्टालिनचे निधन झाल्यानंतर त्याच्या वारसांनी आमूलाग्र बदल केला नाही. अण्वस्त्रांचा प्रश्न या काळात उग्र होऊ लागला असता

त्याविषयी चर्चा करणारे अनेक लेख 'फॉरिन अफेअर्स'मध्ये आले. तसेच पूर्व युरोपवर पकड ठेवण्याच्या भूमिकेमुळे रशियन नेते जे धोरण अमलात आणीत होते, त्यामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीसंबंधात द्वैमासिकाने अनेक लेख प्रसिद्ध केले.

इराणच्या शहाने तेलाच्या किंमती वाढवण्याचा पवित्रा घेऊन पाश्चात्त्य राष्ट्रांना धक्का दिला. त्या काळात 'फॉरिन अफेअर्स'ने या तेलाच्या प्रश्नासंबंधी अनेक तज्ज्ञांचे लेख प्रसिद्ध केले होते. हा प्रश्न नंतर आणि आजही उग्र स्वरूपाचाच आहे. द्वैमासिक वेळोवेळी त्याची दखल घेत आले आहे. अमेरिकेने कम्युनिस्ट चीनवर बहिष्कार टाकला होता. निक्सन अध्यक्ष झाल्यावर त्यांनी चीनशी संबंध प्रस्थापित करण्याचा निर्णय घेतला. त्याआधी त्यांनी 'फॉरिन अफेअर्स'मध्ये लिहिलेल्या लेखांत या दोन देशांतील संबंधात सुधारणा होण्याचा उल्लेख केला होता, हे खरे; पण चीनचा विविध अंगांनी अभ्यास करण्याचा निर्णय कौन्सिलने साठच्या दशकात घेतला होता. त्याप्रमाणे रॉबर्ट ब्लम यांची नेमणूक झाली. ते सरकारी नोकरीच्या निमित्ताने चीनविषयक अभ्यास करीत होते. त्यांनी काही सहायक मदतीला घेतले. त्याआधी कौन्सिलनेच यासंबंधात काही ग्रंथ प्रसिद्ध केले होते आणि अखेरचा ग्रंथ तयार होत असताना ब्लम यांचे निधन झाल्यामुळे बार्नेट यांनी तो पुरा केला. म्हणजे निक्सन यांच्याकडे नव्हे तर कौन्सिलकडे चीनसंबंधीचे धोरण बदलण्याचे श्रेय जाते.

नंतरच्या काळात सोव्हिएत युनियनने अफगाणिस्तानात लष्कर धाडल्यावर प्रथम कार्टर आणि नंतर रेगन यांनी रशियनांविरुद्ध लढणाऱ्या मुजाहिदांना पाकिस्तानतर्फे मदत देण्यास आरंभ केला. या वेळीही 'फॉरिन अफेअर्स'मधील अनेक लेख विवेचक होते आणि सावधगिरीचा इशारा देत होते.

सोव्हिएत युनियनची समाप्ती व नंतरचा काळ हा या द्वैमासिकाची कसोटी पाहणारा होता. या कसोटीला ते चांगल्यापैकी उतरले. याआधी चीनमध्ये नव्या आर्थिक धोरणाचा अवलंब करण्याच्या दिशेने पावले टाकली गेली. त्याचे परिणाम दिसू लागले. या पाठोपाठ काही वर्षांनी भारतानेही अनेक निर्बंध सैल करण्याचे व काही रद्द करण्याचे धोरण स्वीकारले. यामुळे आशियाचा आर्थिक नकाशा बदलत आहे आणि त्याची दखल घेणारे लेख 'फॉरिन अफेअर्स'मध्ये येत असतात.

जॉर्ज बुश यांच्या राजवटीत 'अल कायदा' ही दहशतवादी संघटना पुढे आली आणि तिने न्यूयॉर्क व वॉशिंग्टनवर हवाई हल्ला केला. तेव्हा अफगाणिस्तानातील 'अल कायदा'स पायबंद घालण्यासाठी कारवाई झाली; पण हे कार्य अर्धवट सोडून इराकविरुद्ध चढाई करण्यात आली. तेव्हापासून इस्लामी दहशतवाद हा जागतिक प्रश्न होऊन बसला. 'फॉरिन अफेअर्स'ने या संबंधात अनेक उल्लेखनीय लेख प्रसिद्ध केले आहेत.

या दहशतवादाचा सॅम्युअल हटिंग्टन यांनी वेगळा विचार केला होता. त्यांनी 'फॉरिन अफेअर्स'मध्ये लिहिलेल्या लेखाने – 'क्लॅश ऑफ सिव्हिलायझेशन्स' (सांस्कृतिक संघर्ष) – खळबळ उडाली आणि जगभर त्याची चर्चा होत राहिली. एडवर्ड सईद यांनी हटिंग्टन यांच्या विवेचनाविषयी आक्षेप घेतले. त्यांचे असे म्हणणे होते, की मुस्लिम व ख्रिश्चन या दोन्ही संस्कृती एकसंध नाहीत. देशागणिक या दोन्ही धर्मांचे लोक वेगवेगळ्या रीतीने वागताना व विचार करताना दिसतील.

नुकत्याच संपलेल्या २००९ या वर्षात 'फॉरिन अफेअर्स'ने प्रसिद्ध केलेल्या काही महत्त्वाच्या लेखांची नोंद करणे उचित होईल. दहशतवादी जे अनेक उपाय योजीत असतात, त्यांत संगणकावर हल्ला करून ती यंत्रणाच नष्ट करणे हा एक आहे. याचे गांभीर्य व व्याप्ती विशद करणारा एक लेख सर्वच देशांना विचार करायला लावणारा होता. या वर्षात डॉलर ढासळत गेला. अमेरिका जर आपला अर्थसंकल्प शिलकी करण्याचे आणि परकी कर्जाचा डोंगर कमी करण्याचे व्यापक प्रयत्न करणार नसेल, तर अधिकच कठीण परिस्थिती कशी निर्माण होईल, हे एका लेखात दाखवून दिले होते. आग्नेय आशियाकडे दुर्लक्ष न करण्याचा इशारा देणारा, नव्या वर्षातील पहिल्या दोन महिन्यांचा अंक प्रसिद्ध झाला आहे. त्यात अफगाणिस्तानच्या प्रश्नाची चर्चा करणारा किम बार्कर यांचा लेख उल्लेखनीय आहे. अफगाणिस्तानचा प्रश्न अधिकाधिक बिकट होत असून तसा का होत आहे, याची मीमांसा या लेखात आहे. त्यातील एक अफगाणिस्तानमधील भ्रष्टाचारासंबंधीही आहे. अध्यक्ष कारझाई यासंबंधात काही करू शकत नाहीत, कारण त्यांनी प्रशासनाचे स्वरूपच भ्रष्टाचाराला पोषक करून ठेवले आहे, याचे अनेक पुरावे या लेखात दिले आहेत.

अफगाणिस्तानचा जवळपास ८० टक्के प्रदेश तालिबानच्या ताब्यात असून तिथे वेगळीच राज्यव्यवस्था आहे. अध्यक्ष कारझाई यांची जी काही सत्ता आहे ती मुख्यत: काबूलमध्ये आहे. म्हणजे सर्व देशाचे ते अध्यक्ष नसून काबूलचे महापौर आहेत. त्यांना पाठीशी घातल्याखेरीज अमेरिकेचे चालणार नाही. कारझाई याचा भरपूर फायदा उठवत असून अफगाणिस्तानमधील भ्रष्टाचारात त्यांचे नातेवाईकच सामील आहेत. याची अनेक उदाहरणे पुराव्यानिशी प्रसिद्ध झाली आहेत.

बार्कर यांनी अफगाणिस्तानमधील भ्रष्टाचाराचे तीन वर्ग केले आहेत. एक चिल्लर, दुसरा बराच मोठा आणि तिसरा वर्ग अमेरिका अफगाणिस्तानात कंत्राटी पद्धतीने जी कामे देते, त्यांतून निर्माण होणारा. या तिसऱ्या प्रकारामुळे अमेरिका जी मदत देते त्यामधील अगदीच थोडी लोकांच्या उपयोगी पडते.

अमली पदार्थांच्या व्यवहारात कमाई करणाऱ्यांपैकी काही जणांवर खटला होऊन शिक्षा झाली असता कारझाई यांनी त्यांना माफी दिली आणि अमेरिकनांना हात चोळीत बसावे लागले. अफगाणिस्तानच्या ३४ पैकी ३३ प्रांतात तालिबानने स्वत:ची भ्रष्टाचारविरोधी न्यायालये स्थापन केली असून ती झटपट निकाल देतात. कारझाई यांच्या प्रशासनातच भ्रष्टाचार बोकाळला असल्यामुळे या प्रकारची न्यायालये वा चौकशी समित्या या केवळ नावापुरत्या आहेत.

पहिली भ्रष्टाचारविरोधी यंत्रणा २००८ साली रद्द झाली. तिचा प्रमुखच भ्रष्टाचारी निघाला. प्रमुख सरकारी वकील यात मागे नव्हता. कारझाई यांनी बहुतेक बड्या सामंतांना आश्रय देऊन कारभार चालवला असल्यामुळे परकी मदत आणि अंमली पदार्थांचा व्यापार यांतून कोट्यवधी डॉलर्स मिळवले जातात आणि लोक मात्र कंगाल झाले आहेत.

**गोविंद तळवलकर**
govindtalwalkar@hotmail.com



लक्ष्मीकांत देशमुख

# अमेरिकन एक्स-रे!
# बिग डेमॉक्रसी – बिग ब्यूरोक्रसी

**।। अध्याय एकोणिसावा ।।**

**अमेरिकन राज्यकर्त्यांसाठी नोकरशाही ही टीकेची आवडती बाब आहे. त्यासाठी 'Bashing Bureaucracy : Politicians' pandering' ही अत्यंत समर्पक शब्दयोजना आहे. अमेरिकेच्या बुद्धिजीवी व विचारवंत वर्तुळाचे नोकरशाहीबद्दल काय मत आहे? ती पूर्णत: असंवेदनक्षम व 'अनरिस्पॉन्सिव्ह' आहे. तसेच ती धोकादायक वाटावी इतपत लोकशाहीविरोधी आहे. त्यांच्या मते नोकरशाही ही कायमस्वरूपी व्यवस्था असल्यामुळे मुजोर झाली आहे, ती कुणाची पत्रास बाळगत नाही. ती खूप ताकदवान झाली असून, नियंत्रणाबाहेर गेली आहे. अमेरिकन प्रसारमाध्यमांमध्ये अमेरिकन ब्यूरोक्रसीची काय प्रतिमा आहे? राज्यकर्ते व बुद्धिवंतांची जी मते आहेत, तीच अधिक भडक स्वरूपात प्रसारमाध्यमात प्रतिबिंबित झालेली दिसून येतात.**

हे चित्र पहा –

जॉन एफ. केनेडी हे १९६०च्या दशकात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष होते, तेव्हाचा हा किस्सा – नव्हे खरी कथा आहे. त्यांचे बंधू रॉबर्ट केनेडी, जे ॲटर्नी जनरल होते, त्यांनी तक्रार केली, की सी.आय.ए.च्या हेडक्वार्टरला जाणाऱ्या रस्त्यावर एक दिशादर्शक बोर्ड आहे, तो फेडरल सरकारच्या या एजन्सीच्या गोपनीयतेच्या संकेताला छेद देणारा आहे; त्यामुळे तो हटवावा. राष्ट्राध्यक्ष केनेडींना ते पटले. त्यांनी आपल्या एका सचिवाला तो बोर्ड हटवायची सूचना दिली. त्या सचिवांनी तो आदेश अंतर्गत गृहविभागास पाठवला; पण काही झाले नाही. काही दिवसांनी केनेडींनी पुन्हा तोच आदेश दिला. पुन्हा जैसे थे. ब्युरोक्रसीच्या या थंडपणाने वैतागलेल्या केनेडींनी ज्या विभागाअंतर्गत वरील दिशादर्शक बोर्ड सी.आय.ए.च्या हेडक्वार्टरच्या रस्त्यावर बसवला होता, त्या अधिकाऱ्यास बोलावून तो तात्काळ काढण्यास सांगितले. 'हे पहा, मी राष्ट्राध्यक्ष केनेडी सांगतोय. आज सायंकाळपर्यंत तो बोर्ड काढला गेला पाहिजे. मी तुम्हांला त्याची वैयक्तिक जबाबदारी देतोय!' तो बोर्ड त्या दिवशी तातडीने काढून टाकण्यात आला. यावरून आपण काय धडा शिकलो, हे सांगताना उपरोधिक हसत केनेडी म्हणाले होते,

'I now understand that for a President to get something done in this country, he has to say it three times.'

आता हे चित्र पहा –

दुसऱ्या अमेरिकन राष्ट्राध्यक्षांचा हा ब्युरोक्रसीचा दुसऱ्या टोकाचा अनुभव. राष्ट्राध्यक्ष होते जिमी कार्टर. त्यांची कन्या ॲमी शाळेत होती व ती 'औद्योगिक क्रांती' या अभ्यासासाठी शिक्षकांनी दिलेल्या विषयाचा गृहपाठ करीत होती. तिला तो समजेना, म्हणून तिने आपल्या आईला मदत मागितली. फर्स्ट लेडी ऑफ अमेरिका मिसेस कार्टरने 'व्हाईट हाऊस'चे व्यवस्थापन पाहणाऱ्या अधिकाऱ्याला (ॲमीला) मदत करायला सांगितले. त्या अधिकाऱ्याने लेबर डिपार्टमेंटला ही बाब सांगितली. त्या विभागास आपल्याला राष्ट्राध्यक्षाच्या कन्येस अभ्यासात मदत करायची, म्हणून मोठा आनंद झाला. त्यांनी उत्साहाच्या भरात दुसऱ्या दिवशी औद्योगिक क्रांतीसंबंधीची संगणकावरून डाऊनलोड केलेली एक ट्रकभर माहिती पाठवली. त्याचा खर्च होता अवघा तीन लाख डॉलर्स आणि एवढी माहिती देण्यासाठी ओव्हरटाईम देऊन तज्ज्ञ व्यक्तींची एक टीमही लेबर डिपार्टमेंटने तैनात केली. त्यांना वाटलं, हा राष्ट्राध्यक्षांचा हुकूम (Presidential Order) आहे, तो निष्ठेने व पूर्णपणे पाळला पाहिजे.

या घटनेचा शेवट काय असावा? काही तर्क?

मीच सांगतो. ॲमीला त्या गृहपाठात 'सी' ग्रेड मिळाली!

वाचकहो, या दोन कहाण्या जर मी भारतीय पंतप्रधान वा मुख्यमंत्र्यांची नावे घालून सांगितल्या असत्या, तर आपला त्यावरही नक्कीच विश्वास बसला असता; कारण ब्यूरोक्रसीची सिस्टीम ही जगभर सारखीच असते. कारण ती वृत्ती आहे – सर्वकालिक.

भारताप्रमाणे अमेरिकाही फार मोठा लोकशाहीप्रधान देश आहे. तिथल्या नोकरशाहीचा – ब्यूरोक्रसीचा – विस्तारही मोठा आहे. भारताच्या तुलनेत लोकसंख्येच्या प्रमाणात तो किती तरी पट अधिक आहे. आपण मागील अनेक अध्यायात भारतीय नोकरशाहीच्या मंदगती व अनेक अपप्रवृत्तींवर बोलत आहोत. आज अमेरिकन ब्यूरोक्रसीबद्दल काही माहिती घेणार आहोत. कारण ज्याप्रमाणे साहित्यात तौलनिक अभ्यासशाखा आहे, जी विविध भाषा व देशातील–प्रांतांतील साहित्याचा सम्यक अभ्यास करते; त्याचप्रमाणे पुढील काही अध्यायांत आपण तौलनिक अभ्यास म्हणून इतर काही देशांतील ब्यूरोक्रसीचा अभ्यास करणार आहोत व त्यावरून तुलनेत भारतीय नोकरशाही कुठे आहे, याचा अंदाज घेता येईल. त्यावरून काही निष्कर्ष काढणे शक्य होईल.

पण आज अमेरिकन ब्यूरोक्रसीच्या संदर्भात काही निरीक्षणे नोंदवायची आहेत. मग पुढे इतर काही देशांच्या जोडीने अमेरिकन ब्यूरोक्रसीचा उदय, वाढ आणि आजची स्थिती पाहणार आहोत; पण आज अमेरिकन ब्यूरोक्रसीचं विहंगमावलोकन करायचं आहे, त्यात अनेक विषयांना स्पर्श करायचा आहे व काही बाबींवर 'एक्स–रे'प्रमाणे प्रकाशझोत टाकायचा आहे.

निकोलस हेन्री यांचे 'Public Administration and Public Affairs' हे अमेरिकन प्रशासन व लोकनीतीच्या संदर्भातले एक महत्त्वाचे पुस्तक आहे. ते जसे सैद्धांतिक आहे, तसेच ते मार्मिक निरीक्षणे आणि बोलक्या अमेरिकन संदर्भाने ओतप्रोत आहे. या पुस्तकाच्या आधारे हा अमेरिकन ब्यूरोक्रसीवरचा एक्स–रे पेश करीत आहे.

हेन्री यांनी लोकप्रशासन व लोककार्य 'Public administration' व 'Public Affairs' बद्दल नेमक्या शब्दांत वर्णन केले आहे, ते पहाण्याजोगे आहे. ते असे आहे –

'Public administration. The words conjure nightmares of green eyeshades, faceless, pitiless and powerful Bureaucrats; and a misdirected, perhaps misanthropic, governmental juggernaut crashing all who question it.

Public Affairs. The phrase connotes visions of fearless and free debate; ennobling social missions; and the surging sweep of civil life.'

पण वास्तविकता ही या दोनमध्ये कुठेतरी आहे, असे मत नोंदवत निकोलस हेन्री पुढे म्हणतो, 'Public administration always has been and always will be the grubbing, tedious execution of public policies. And public policies will be the ultimate and finest expression of democracy, but it also always has been and always will be demeaning chore of cutting sleazy deals and micromanaging corrupt and rapacious special interest.'

प्रथम अमेरिकन ब्युरोक्रसीची प्रतिमा व वास्तविकता (Image and Reality) काय आहे ते पाहू या. त्या देशाचे तीन घटक – राज्यकर्ते, बुद्धिजीवी वर्ग आणि प्रसारमाध्यमांना ब्युरोक्रसीबद्दल काय वाटते?

अमेरिकन राज्यकर्त्यांसाठी नोकरशाही ही टीकेची आवडती बाब आहे. त्यासाठी 'Bashing Bureaucracy : Politicians' pandering' ही अत्यंत समर्पक शब्दयोजना आहे. निवडणुकीच्या काळात (भारताप्रमाणेच) अमेरिकन राज्यकर्तेही नोकरशाहीवर सडकून टीका करतात. पॉल सी. लाईट यांनी 'The size of Government' या पुस्तकात म्हटले आहे, 'The (American) election campaign chant of bureaucratic 'fraud, waste and abuse' has been a rhetorical standard of office seekers for more than a generation.' थोडक्यात, विकास प्रक्रियेत राज्यकर्त्यांना नोकरशाही अडसर वाटते.

अमेरिकेच्या बुद्धिजीवी व विचारवंत वर्तुळाचे नोकरशाहीबद्दल काय मत आहे? ती पूर्णत: असंवेदनक्षम व 'अनरिस्पॉन्सिव्ह' आहे. तसेच ती धोकादायक वाटावी इतपत लोकशाहीविरोधी आहे. त्यांच्या मते नोकरशाही ही कायमस्वरूपी व्यवस्था असल्यामुळे मुजोर झाली आहे, ती कुणाची पत्रास बाळगत नाही. ती खूप ताकदवान झाली असून, नियंत्रणाबाहेर गेली आहे. प्रामुख्याने ती जनता व लोकप्रतिनिधी यांच्याप्रती जबाबदेही (Accountable) नाही.

अमेरिकन प्रसारमाध्यमांमध्ये अमेरिकन ब्यूरोक्रसीची काय प्रतिमा आहे? तिथल्या चित्रपटातील नोकरदार पात्रे पाहिली तर एका शब्दात सांगता येईल, की 'Federal administrators were 'the baddest villains' in Hollywood films.' राज्यकर्ते व बुद्धिवंतांची जी मते आहेत, तीच अधिक भडक स्वरूपात प्रसारमाध्यमात प्रतिबिंबित झालेली दिसून येतात.

'Images of Government in T.V. entertainment' हा सेंटर फॉर मीडिया अँड पब्लिक अफेअर्स, वॉशिंग्टन डी.सी. या संस्थेने प्रकाशित केलेला अहवाल लक्षवेधक आहे व तो ब्युरोक्रसीची टी.व्ही.वर काय प्रतिमा आहे, याची माहिती देणारा आहे. १२३४ मालिका व २६६४ नोकरशाहींच्या पात्रांचे अॅनॅलिसिस करून ब्युरोक्रसीची मीडियातील प्रतिमा काय आहे, हे अहवालात सविस्तरपणे आले आहे. एकूणच नोकरशाही ही मंदगतीची व निकृष्ट कार्यक्षमतेची चित्रित केली असली तरी शिक्षक व कायदा व सुव्यवस्था राखणाऱ्या यंत्रणेचे तुलनेने उजळ व सकारात्मक चित्रण आहे; पण सार्वजनिक सेवा पुरविणाऱ्या नोकरदाराबाबत अमेरिकन नागरिक नाखूष असतात, हे टी.व्ही. मालिकेतून प्रकर्षाने जाणवते.

**वास्तविकता**

ब्यूरोक्रसीच्या या गडद झालेल्या प्रतिमेच्या पार्श्वभूमीवर वस्तुस्थिती काय आहे? अमेरिकन नागरिकांना काय वाटते, हे पाहणेही मनोवेधक ठरेल. वस्तुस्थिती अशी आहे, की जवळपास दोनतृतीयांश अमेरिकन नागरिक ब्युरोक्रसीवर संतुष्ट आहेत. त्यांचा 'ओपिनियन पोल' घेताना एक साधा प्रश्न विचारला गेला होता - तुम्ही कधी शासकीय वा स्थानिक संस्थेच्या कार्यालयात साध्या रूटीन कामासाठी गेला असता - उदा. ड्रायव्हिंग लायसन्स मिळवण्यासाठी - काय अनुभव आला? सुमारे सत्तर टक्के लोकांनी शासकीय अनुभव समाधानकारक व मदतीचा होता असे मत नोंदविले. जवळपास याच टक्केवारीत शासकीय कर्मचारी विशेष सेवा तत्परतेने देतात व त्यांच्याकडून योग्य तऱ्हेची वागणूक मिळते, असे म्हटले आहे.

अमेरिकेत १९४०च्या दशकात तीन विस्तृत सर्वेक्षणे झाली व त्यांचे अहवालही प्रसिद्ध झाले आहेत, ते असे आहेत.

१) 'Citizen rating of public and private service quality : A comparative perspective.' (थोडोर एच. पॉईस्टर व गॅरी टी. हेन्री - १९९४)

२) 'Standard of Excellence : U.S. Residents Evaluation of Local Government Services.' (थॉमस एल. मिलर व मिशेल ए. मिलर - १९९१)

३) 'Source of Citizen's Bureaucratic contacts : A Multivariate Analysis.' (स्टीफन ए. पीटरसन - १९८८)

या सर्व सर्वेक्षणाची गोळाबेरीज हे दर्शविते, की नागरिक शासकीय सेवेबाबत मोठ्या प्रमाणात समाधानी आहेत. मुख्य म्हणजे यातील एक अहवाल हा दोन लाख नागरिकांचा २६१ सर्वेक्षणामधल्या अहवालाचा गोषवारा आहे. त्यामुळे निकोलस हेन्री शेवटी निष्कर्ष काढताना म्हणतो, 'The American public does not appear as disdainful of bureaucrats as the projected media image would indicate.'

आज भारतातले लाखो लोक अमेरिकेत शिक्षण, नोकरी व व्यवसायासाठी स्थायिक झाले आहेत. हे सारे भारतात सुट्टी वा कौटुंबिक कार्यक्रम-लग्न इत्यादीसाठी जेव्हा येतात तेव्हा हेच सांगतात, की अमेरिकेची ब्युरोक्रसी - मग ती स्थानिक स्वराज्य संस्थेची असेल वा राज्य सरकारची - कार्यक्षमतेने, तत्परतेने आणि भ्रष्टाचार न करता सेवा देते. आरोग्य, ड्रायव्हिंग लायसेन्स आदी सेवांचा स्तर समाधानकारक आहे. याच्या विपरीत अनुभव त्यांना भारतात येतो, तेव्हा ते त्यांना जास्त तीव्रतेने खुपते.

इथे पुन्हा मला मॅनेजमेंट तज्ज्ञ गुरुचरण दास यांचा संदर्भ देण्याचा मोह आवरत नाही. 'आर्थिक विकास; नैतिक ऱ्हास' या नावाचा त्यांचा एक लेख अलीकडेच प्रसिद्ध झाला आहे. (दै.सकाळ, ३१ डिसेंबर २००९) त्यात त्यांनी परखडपणे असे म्हटले आहे, की आपल्या भारतीयांची रोजची वर्तणूक नैतिक निकषावर टिकणारी नाही. एक उदाहरण देत ते म्हणतात, 'मला माझ्या वाहन चालवायच्या परवान्याचे येत्या काही दिवसांत नूतनीकरण करून घ्यायचे आहे; पण हे काम करण्यासाठी मला कोणाला लाच द्यावी लागणार नाही ना, या चिंतेने मी सध्या अस्वस्थ आहे. कदाचित माझी अस्वस्थता किरकोळ असेल; पण दररोज सार्वजनिक सेवांवर अवलंबून असणाऱ्या गरीबांचे काय? त्यांनी त्यांची कामे होण्यासाठी काय करायचे?'

गुरुचरण दास यांनी ब्यूरोक्रसीच्या भ्रष्टाचारावर प्रकाशझोत टाकताना म्हटले आहे, की 'ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनल' या संस्थेने २००५ साली केलेल्या अकरा सार्वजनिक सेवांच्या सर्वेक्षणात, भारतातील पोलिस दल सर्वांत भ्रष्ट असल्याचे आढळून आले. सुमारे ऐंशी टक्के नागरिकांना आपले काम होण्यासाठी पोलिसांना केव्हा ना केव्हा लाच द्यावी लागल्याचे म्हटले आहे. कायदेशीर कामे करून घेण्यासाठीही चाळीस टक्के लोकांना लाच द्यावी लागली होती. सरकारी शाळा किंवा प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये कामे करून घेण्यासाठी दर तीन नागरिकांपैकी एकाला लाच द्यावी लागली होती. हीच बाब तलाठी किंवा पटवाऱ्याची आहे.' गुरुचरण दास असेही म्हणतात, की मोठ्या हिंसाचारापेक्षाही जर आपण रोजच्या कर्तव्यात कमी पडलो, तर जास्त वाईट परिणाम होतात. उदा. एखादा शिक्षक त्याच्या कामावर गैरहजर राहिला, वा त्याने योग्य शिकवले नाही तर समाजधर्मास बाधा येते.

येथे व्यापक अर्थाने भारतीय ब्यूरोक्रसी समाजधर्माचे पालन करीत नाही, हा गुरुचरण दास यांचा आक्षेप कोण सुजाण भारतीय नागरिक अमान्य करेल? ज्या करदात्यांच्या पैशातून नोकरशहाला पगार मिळतो व त्याचा प्रपंच भागतो, त्यांना तत्परतेने सार्वजनिक सेवा चोख देणे हा समाजधर्म आहे. त्याचे पालन भारतात होत नाही; पण अमेरिकन ब्यूरोक्रसी बहुतांश वेळा त्याचे पालन करते, हे वरील सर्वेक्षणावरून सिद्ध होते!

अर्थात, अमेरिकेतही सर्व काही आलबेल आहे असे नाही. 'वॉटरगेट'सारखी प्रकरणे नोकरशाहीच्या सर्वकालिक व सार्वत्रिक अकार्यक्षमतेवरच प्रकाशझोत टाकत नाहीत का? तेथेही लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांची भ्रष्ट युती आहेच. तेथेही 'घालीन लोटांगण' ही वृत्ती आहेच. (लेखाच्या सुरुवातीला दिलेले जिमी कार्टरच्या मुलीच्या गृहपाठास मदत करण्यासाठी लेबर डिपार्टमेंटने काय उपद्व्याप केले हे आठवा.) तेथेही रेडटेपिझम आहे. तरीही आम नागरिकांना दैनंदिन शासकीय व सार्वजनिक कामांत ज्याचा अल्प त्रास होतो, त्या स्तरावरचा भ्रष्टाचार जवळपास नाही. भारतात या स्तरावर गरीब नागरिकांना साध्या साध्या कामासाठी त्रास होतो, विलंब होतो, हे खेदजनक आहे. त्यासाठी ब्यूरोक्रसीची वृत्ती व निर्लज्जपणा कारणीभूत आहे, असे गुरुचरण दास मानतात.

**नोकरशहाच्या शक्तीची कारणे**

जगात सर्वत्र ब्यूरोक्रसीचे प्रस्थ एकविसाव्या शतकातही वाढताना दिसते. त्यामुळे ब्यूरोक्रसीची शक्ती (पॉवर) वाढताना दिसते. अमेरिकेत तर तिची वाढ प्रचंड आहे. तिच्या या वाढत्या शक्तीबद्दल हेन्री निकोलस यांनी मार्मिक निरीक्षण नोंदवले आहे.

'Because powerful political, social, economic and technological forces are underlining

bureaucracy, it follows that a bureaucracy has power. But the power of Bureaucracy comes clothed in clouds, curtained in fog and cloaked in mist.'

या नोकरशाहीच्या शक्तीची नेमकी कारणे काय आहेत? ती प्रामुख्याने चार आहेत. एक त्यांची टिकून राहण्याची शक्ती – Staying power. एखादा विभाग किंवा खाते निर्माण झाले की ते कधीच बंद होत नाही. महाराष्ट्रात माधव गोडबोले अर्थसचिव असताना त्यांनी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाणांच्या नेतृत्वाखाली 'झिरो बेस बजेटिंग' संकल्पना राबवली. त्याला कडाडून विरोध झाला व ती मग शासनास सोडून द्यावी लागली. कारण त्यामध्ये अनेक बिनकामाचे विभाग बंद झाले असते. हीच आहे नोकरशाहीची टिकून राहण्याची शक्ती. अमेरिकन 'इंटरनॅशनल स्क्रूथ्रेड कमिशन'बाबत असे म्हटले जाते, की 'this commission will never die.' अमेरिकेत १७५ यंत्रणांपैकी पन्नास वर्षांत केवळ २१ एजन्सी बंद करण्यात आल्या. भारतात तर अनेक सार्वजनिक उपक्रम (public undertaking) आज बंद अवस्थेत आहेत, पण ते कर्मचाऱ्यांसाठी जिवंत आहेत. 'पगार चालू पण काम बंद' अशी त्यांची अवस्था आहे.

अमेरिकन अभ्यासाद्वारे हे पण सिद्ध झाले आहे, की नोकरशाहीच्या महत्त्वाचे दुसरे कारण आहे राजकीय शक्ती. त्याबाबत हेन्री निकोलस म्हणतात, ते त्यांच्या शब्दात टीकेविना नमूद करतो,

'It is increasingly obvious that bureaucracy is now a major policy making arm of government-perhaps the major policy maker. One careful analysis of American states found that the state's public 'Managerial Capacity' itself should be placed 'alongside other more commonly studied state characteristics as an important influence, on public policy formulation. In other words, the ability and professionalism of public administrators and bureaucracy rank with such powerful political forces as interest groups and ideology in the making of state policies.'

ब्यूरोक्रसीच्या शक्तीचे तिसरे कारण आहे तिची 'पॉलिसी मेकिंग'ला योगदान देण्याची क्षमता. तिच्या उच्चतम शिक्षण, प्रशिक्षण व प्रत्यक्ष धोरण राबविताना आलेल्या अनुभव समृद्धीमुळे राज्यकर्त्यांना धोरणे आखताना तिची मदत होते. नव्हे, अनेकदा अधिकारीच नवी धोरणे तयार करून राज्यकर्त्यांना पटवून देतात, अशी अनेक उदाहरणे अमेरिकेत आहेत. सार्वजनिक नीती आखण्याचे तिचे सामर्थ्य व क्षमता हे ब्यूरोक्रसीच्या शक्तीचे एक कारण आहे.

चौथे कारण सर्वांत महत्त्वाचे आहे, ते म्हणजे कामात खोडा घालण्याची – थांबवण्याची शक्ती. Stopping power. प्रशासकांना कामे करण्याची जशी शक्ती व अधिकार असतात, तसेच ती थांबण्याची, लांबवण्याची वा त्यात खोडा घालण्याचीही अमर्याद शक्ती असते. याद्वारे ते आपले महत्त्व तसेच समोरच्यांना उपकृत करण्याची आपली उपद्रवक्षमता दाखवून देत असतात.

**नोकरशाही व नेतृत्व**

संसदीय लोकशाहीत जरी देश, राज्य व स्थानिक सरकारचे नेतृत्व लोकप्रतिनिधी करीत असले तरी धोरणांची अंमलबजावणी करणे तेवढेच महत्त्वाचे असल्यामुळे ब्युरोक्रसीला पण नेतृत्वगुणांची आवश्यकता असते. उत्तम यशस्वी प्रशासक हे उत्तम नेतृत्वगुणांनी संपन्न असतात. अमेरिकन ब्यूरोक्रसीच्या नेतृत्वगुणाची चर्चा करताना अभ्यासक त्याचे तीन गमक मानतात – एक दूरदृष्टी (vision), संवाद व communication आणि कठोर परिश्रम. या तीन गुणांतूनच नेतृत्व गुण व क्षमता सिद्ध होतात. धोरणांची व निर्णयांची अंमलबजावणी करताना अनेक अडचणी येत असतात; तसेच जेथे मानवी जीवनाचा संबंध असतो, तेथे मानवी स्पर्श (human touch) द्यावा लागतो. त्यासाठी असाधारण संवाद कौशल्याची गरज असते.

**दूरदृष्टी (vision)**

अब्राहम यांनी 'The Leadership Factor' या ग्रंथात दूरदृष्टीची अशी व्याख्या केली आहे. 'Vision is the presentation of an alternative future of the status quo.' ही व्याख्या त्यांनी प्रशासनाच्या संदर्भात केली आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. अनेक प्रशासकांजवळ अशी व्हिजन असते; पण लोकशाहीमध्ये प्रशासक हे 'दोन नंबरचे' असतात, म्हणजेच ते लोकप्रतिनिधींच्या समोर दुय्यम असतात. याबाबत त्यांनी तक्रार करू नये. यामुळे त्यांची दूरदृष्टी प्रशासनासाठी उपयोगी पडत नाही, हे मात्र खरे आहे. तरीही अंमलबजावणीच्या क्षेत्रात आणि त्यांना जे अधिकार दिले आहेत त्या चौकटीतही प्रशासकांना खूप दूरदृष्टीने काम करण्याची मुभा असते. जे त्याचा वापर करतात ते एका अर्थाने 'व्हिजनरी' ठरतात. (येथे व्ही. पी. राजा व अनिलकुमार लखिना या दोन महाराष्ट्रातील कर्तबगार आय.ए.एस. अधिकाऱ्यांचे उदाहरण देता येईल. शंभर वर्षांपासूनचा पण दुर्लक्षित 'अँडरसन मॅन्युअल' त्यांनी प्रभावीपणे राबवून अभिलेख कक्ष आधुनिक केला व लोकांना हवी ती कागदपत्रे त्वरित मिळण्याचा मार्ग प्रशस्त झाला.)

**संवादकौशल्य**

दूरदृष्टी (vision) सर्वदूर आम माणसापर्यंत पोचवण्यासाठी संवाद हवा. कम्युनिकेशन कौशल्य हवे. येथे प्रशासक बऱ्याच प्रमाणात कमी पडतात. कारण त्यांच्यासाठी तटस्थता (Neutrality) आणि प्रसिद्धीपराङ्मुखता (Anonymity) महत्त्वाची असते, असे जुने प्रशासनशास्त्र सांगते. पण प्रभावी कामकाजासाठी वाजवी 'फेसव्हॅल्यू' व प्रसिद्धी वाईट नाही. उलट चांगल्या कामामागे त्यामुळे जनशक्ती उभी राहू शकते. जेम्स डोईंग यांनी संपादित केलेल्या 'Leadership and Innovation : A Biographical perspective on Enterpreneurs in

Government' या पुस्तकात चौदा अमेरिकन प्रशासकांच्या चरित्रांतून हे दाखवून दिले आहे, की या सर्व यशस्वी प्रशासकांकडे प्रभावी संवाद कौशल्य होते व त्याद्वारे आपली व्हिजन व मिशन ते परिणामकारक रीतीने जनतेपर्यंत पोचवत त्यांचा पाठिंबा मिळवू शकले.

**कठोर परिश्रम**

नेतृत्वाचे तिसरे गमक हे कठोर परिश्रम व अथक काम आहे. प्रशासन हे असे क्षेत्र आहे, की तेथे कठोर परिश्रमास पर्याय नाही. त्यामुळे प्रशासकात हा गुण मोठ्या प्रमाणात आढळून येतो. अमेरिकेचे संरक्षण सचिव एकदा एक महत्त्वाचे काम करताना पूर्ण आठवडा रात्रंदिवस काम करीत होते. त्यांचा हा आठवडा सोमवारी सुरू झाला व रविवारी रात्री साडेदहा वाजता संपला. तेव्हा कर्मचाऱ्यांचा निरोप घेताना ते म्हणाले, 'हॅव ए नाईस वीकएंड.' लक्षात ठेवा - त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी ९ वाजता नवा आठवडा सुरू होणार होता. त्यांनी स्वत: व कर्मचाऱ्यांनी दोन दिवसांचा वीकएंड न घेता केवळ झोपेपुरता आठदहा तासांचा वीकएंड घेतला.

अशी ही अमेरिका या 'बिग डेमोक्रसी'ची 'बिग ब्यूरोक्रसी.' तिच्यातही भारतीय नोकरशाहीचे गुण-अवगुण आहेतच. पण जवाबदेही आणि सुधारणा यांमुळे सर्वसामान्य नागरिकांना शासकीय कामासाठी त्रास होत नाही, विलंब लागत नाही किंवा तेथे भ्रष्टाचार 'नाही'च्या स्वरूपात आहे. हे फार महत्त्वाचे आहे. त्यापासून भारतीय नोकरशाहीला बरेच शिकण्यासारखे आहे. खास करून त्यांची काम अडवण्याची शक्ती (stopping power) कमी झाली, तरच नागरिकांना दिलासा मिळणार आहे. अमेरिकेने यात बरेच यश मिळवले आहे. त्यामुळे देशाच्या प्रगतीत येथील ब्युरोक्रसी भरीव प्रमाणात योगदान देते. भारतालाही ते शक्य आहे. त्यासाठी गरज आहे प्रशासकीय सुधारणेची. त्याबाबत आपण पुढील अध्यायात चर्चा करूया!

**(लेखक गेली २५ वर्षे प्रशासकीय सेवेत असून, सध्या कोल्हापूरचे जिल्हाधिकारी आहेत.)**

**- लक्ष्मीकांत देशमुख**
डी/१-२, श्रीनिवास गार्डन, केदारनाथ मंदिराजवळ,
मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे.
Mob. 9325297509.
E-mail - laxmikant05@yahoo.co.in

■

---

*पृष्ठ ७ वरून)*

## तेलंगणाचा तिढा

१. आंध्रातील उद्योगपती व व्यापाऱ्यांनी हैद्राबादेत मोठी आर्थिक गुंतवणूक केली आहे. आजचे हैद्राबाद त्यांनी बनवले आहे असे त्यांचे मत आहे. त्यामुळे हैद्राबादवरचा ताबा सोडायची त्यांची तयारी नाही.

२. राष्ट्रीय राजकारणात आंध्रातील ४२ जागांमुळे त्यास प्रतिष्ठा आहे व तेलगु मंत्र्यांचे वजन आहे. चंद्राबाबू व राजशेखर रेड्डी यांनी त्या प्रतिष्ठेचा वापर करून मोठ्या रकमा राज्यासाठी आणल्या; त्यामुळे राज्याचे विभाजन नको.

३. आंध्रला तेलंगणाचा भाग हवा आहे, कारण या भागात व्यापार व उद्योगधंदे करावयास वाव आहे आणि कदाचित त्या भागात खनिज संपत्तीही असणार आहे.

त्या भागावरचा ताबा सोडायची आंध्रातील अभिजनांची तयारी नाही, त्यामुळे चिदंबरम् यांना हा प्रश्न बासनात टाकावा लागला. 'आंध्रचे लोक आम्हांस कोणतीही गोष्ट मिळू देणार नाहीत', या भावनेने तेलंगणात द्वेषाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**प्रश्न कसा सोडवावा?**

चिदंबरम् यांच्यापुढे हा मोठाच प्रश्न आहे. आज सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे तेलंगणा व आंध्र भागातील नेत्यांची गोलमेज परिषद भरवणे आवश्यक आहे. तेलंगणा स्थापन करणे सरकार फार दिवस लांबवू शकत नाही व नवा राज्य पुनर्रचना आयोग हे त्यास उत्तर नाही; कारण त्यातून अनेक नवे प्रश्न निर्माण होतील. तेलंगणातील लोकांच्या मनाविरुद्ध त्यांना आंध्रात ठेवता येणार नाही, ही गोष्ट आंध्रातील लोकांना समजावून सांगितली पाहिजे. आंध्र एकात्म ठेवायचा असेल, तर त्याबाबत तेलंगणातील जनतेचे प्रबोधन आंध्रातील लोकांनी केले पाहिजे; तेलंगणास अंतर्गत वसाहत मानणे योग्य नाही. खरे पाहिले असता तेलंगणाचे नऊ मागास जिल्हे गेल्यानंतर आंध्रचा मोठ्या प्रमाणात विकास होईल. पाटबंधारे, शेती, वीज, उद्योगधंदे, पेट्रोलचे साठे, लोकांची उद्यमशीलता व कौशल्य आणि किनारपट्टीवरील विकसित बंदरे, कृष्णा-गोदावरीचा त्रिभुज प्रदेश यामुळे ते राज्य भारतातील विकसित राज्य होईल, पण आंध्रातील अभिजनांना हैद्राबादचा गोड घास सोडायचा नाही. हैद्राबादला केंद्रशासित करण्याची वा विभाजित करण्याची मागणी चुकीची आहे, पण सध्या विचारांपेक्षा भावनेवर जोर आहे. याबाबत व्यापक चर्चा करून हा प्रश्न सोडवावा लागणार आहे. आंध्रातील लोकांनी तेलंगणातील लोकांचे मन वळवले पाहिजे वा तेलंगण राज्यास मान्यता दिली पाहिजे.

*(लेखक शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)*

**अशोक चौसाळकर**
४१६ आर. के. नगर, हौसिंग सोसायटी नं. ६, पाचगाव,
कोल्हापूर ६१६०१३.
Mob.: 9923071421

नरेंद्र चपळगावकर

विशेष लेख

# न्यायाचे शास्त्र आणि न्यायाचा व्यवहार

पूर्वार्ध

“

**आजच्या आपल्या मूल्यदृष्टीला ज्या गोष्टी धडधडीत अन्याय्य आहेत असे वाटते, अशा अनेक गोष्टी पूर्वी कायदेशीर समजल्या गेल्या आणि अशाच काही गोष्टी आजही काही देशांच्या व्यवस्थेत कायदेशीर समजल्या जातात; कारण त्या देशांची अगर त्या देशांच्या शासकांची मूल्यदृष्टी निराळी आहे. लोकशाही व्यवस्था मानणारे सर्व लोक लोकशाहीचा प्रारंभिक आविष्कार म्हणून ग्रीक शहर राज्यातील लोकशाहीचा गौरवाने उल्लेख करतो, पण या लोकशाहीत गुलामगिरी कायद्याने मान्य होती आणि गुलामांना मताधिकार नव्हता. शूद्र वर्णात ढकलेल्या काही जातींना आणि एकूणच स्त्रियांना भारतात समान अधिकार तर नव्हतेच; पण त्यांना माणुसकीचे अधिकारही नाकारण्यात आले होते आणि हे सर्व तत्कालीन कायद्याच्या (धर्माच्या) दृष्टीने योग्य आहे, असा त्याचा अर्थ लावला जात होता.**

”

प्राचीन भारतीय ज्ञान परंपरेतील विधिशास्त्र विचाराकडे आपण दुर्लक्षच केले आहे. ज्ञान- परंपरेचा भूतकाळ पुसून टाकणे निर्दोष अभ्यास पद्धतीत अमान्य आहे. आमच्या विधिशास्त्राच्या अभ्यासक्रमाची पुनर्मांडणी करून भारतीय विधिशास्त्राचा आधुनिक विधिशास्त्राशी सांधा जोडण्याची गरज आहे.

**न्यायदर्शन आणि विधिशास्त्र**

आपल्या व्यवहारात आज ‘न्याय’ शब्द आपण ज्या अर्थाने वापरतो, त्या अर्थाने ‘न्याय’ शब्द प्राचीन भारतीय ज्ञानपरंपरेत वापरला गेलेला नाही. ‘न्यायशास्त्र’ किंवा ‘न्यायदर्शन’ या संज्ञेने भारतीय परंपरेत ज्या शास्त्राचा बोध होतो, ते शास्त्र व्यक्ती-व्यक्तीतील किंवा गटागटातील अगर राज्य आणि व्यक्ती यांतील तंट्याचा निकाल करणाऱ्या व्यवस्थेसंबंधीचे शास्त्र नाही. प्राचीन भारतीय दर्शनापैकी ‘न्यायदर्शन’ हे एक दर्शन आहे. ज्याला आपण तर्कशास्त्र किंवा अनुमानशास्त्र (लॉजिक) म्हणून ओळखतो, त्याबद्दलचे न्यायदर्शन हे दर्शन आहे. ज्ञानाची यथार्थता पटवून घेण्यासाठीची प्रमाणे कोणती, हे न्यायदर्शन सांगते. प्रत्यक्ष, अनुमान, उपमान आणि शब्द या मार्गांनी म्हणजे प्रमाणांनी यथार्थ ज्ञान उपलब्ध होते, त्यासंबंधीची चर्चा न्यायदर्शनात आहे. आज ‘न्याय’ शब्द आपण वेगळ्या अर्थाने वापरतो. ज्याला जे मिळणे योग्य आहे, ते त्याला मिळणे याचा अर्थ न्याय. हे मिळवून देणारी व ते मिळण्याचा अधिकार नाकारणाऱ्या शक्तीला प्रतिबंध करणारी यंत्रणा म्हणजे न्यायव्यवस्था, अशी ढोबळमानाने आज आपण व्याख्या करू शकतो. ज्याच्या आधाराने न्याय दिला जातो, तो कायदा आणि ज्या व्यवस्थेतून तो मिळतो किंवा मिळावा अशी अपेक्षा असते, ती न्यायव्यवस्था यांची चर्चा येथे प्रस्तुत आहे. म्हणून ‘न्यायदर्शन’ या नावाने सूचित होणारे प्राचीन अनुमानशास्त्र किंवा आजचे न्यायशास्त्र यांची गल्लत होऊ नये म्हणून ‘विधिशास्त्र’ असा पर्यायी शब्द मी वापरला आहे. ज्यूरिस्प्रूडन्स हा इंग्रजी शब्द आपल्या जास्त परिचयाचा आहे. मराठीत त्यासाठी ‘विधिशास्त्र’ असा प्रतिशब्द वापरता येईल. या विधिशास्त्राबद्दल आणि भारतात प्रत्यक्ष होणाऱ्या आपल्या न्यायव्यवहाराबद्दल काही विचार या लेखात मांडण्याचा मानस आहे.

ज्यूरिस्प्रूडन्स किंवा विधिशास्त्राशी भारतीय न्यायदर्शनाचा काहीच संबंध नाही, असे मात्र नव्हे. ज्याला आपण आज ‘एव्हिडन्स ॲक्ट’ किंवा पुराव्याचा कायदा म्हणतो, त्यातील काही तत्त्वे आणि न्यायदर्शनातील तत्त्वे काही बाबतीत समान आहेत. पुरावा कशाला म्हणावे, पुराव्याची आवश्यकता काय, कोणता पुरावा ग्राह्य मानावा, हे भारतीय न्यायदर्शनातसुद्धा सापडेल. कायदा तर्कशास्त्राला सुसंगत असतो, असे मानले जाते; म्हणून तर्कशास्त्र सांगणाऱ्या न्यायदर्शनाचा आजच्या विधिदर्शनाशी संबंध असणे स्वाभाविकच आहे. सत्यशोधन हे ज्ञानप्रक्रियेचे अंतिम उद्दिष्ट; तेच उद्दिष्ट न्यायप्रक्रियेचेही असते. प्रमाणांनी जसे ज्ञानाचे खरेपण कळते तसेच न्यायालयासमोरच्या, निर्णयविषयाबद्दल सत्यशोधन करण्यास प्रमाणांचे साहाय्य होते.

विधिशास्त्र म्हणजे कायद्याचे शास्त्र. कायदे कशासाठी हवेत, त्यांच्या अंमलबजावणीची व्यवस्था कशी हवी, कायद्याच्या साहाय्याने दिल्या जाणाऱ्या न्यायाचे स्वरूप कसे असावे, न्यायाला पायाभूत असलेली मूल्ये कोणती,

जीवनव्यवहारातील कोणत्या बाबींचे नियंत्रण कायद्याने करावे किंवा व्यक्ती-व्यक्तींच्या अधिकारांचे आणि व्यक्ती आणि शासन यांच्या अधिकारांचे संतुलन कसे करावे, अशा अनेक प्रश्नांसंबंधीची चर्चा विधिशास्त्रात केली जाते.

**नैतिक आणि कायदेशीर**

आधुनिक विधिशास्त्राचा प्रारंभ इ.स. पूर्वी पाच शतके ग्रीक तत्त्ववेत्त्यांच्या विचारांनी झाला, असे मानले जाते. एखाद्या कृत्याचे रास्तपण अगर चांगलेपण हा त्याचा अंगभूत गुण असतो, की लोकरूढीच्या किंवा कायद्याच्या मान्यतेमुळे ते रास्त, योग्य समजले जाते, हा प्रश्न उपस्थित करून नैसर्गिक नीतिनियम आणि कायदा यांच्या संबंधाच्या विचाराला त्या काळात प्रारंभ झाला. राज्यसंस्थेने घालून दिलेल्या नियमापूर्वीपासूनच मनुष्याने कसे वागावे, याचे नैसर्गिक नियम अस्तित्वात होतेच; कायदे त्यात भर घालतात किंवा त्यात बदल करतात असे प्रतिपादन करण्यात आले. पुढच्या काळात न्यायाची संकल्पना, कायदे करण्याचा अधिकार, कायद्यांचे स्वरूप व त्यांची वर्गवारी यांबद्दल आणखी विचार होत गेला. विश्लेषणवादी, उपयुक्ततावादी अशा विविध मतांच्या अभ्यासकांनी आपापल्या दृष्टिकोनाने आणि पद्धतीने मांडणी केली आणि क्रमाक्रमाने विधिशास्त्र विकसित होत गेले.

न्याय, कायदा आणि विधिशास्त्र यांच्या व्याख्या करण्याचे प्रयत्न स्वाभाविकपणेच यांतील काही तत्त्वचिंतकांनी केले. 'ज्याच्या आज्ञा पाळल्या जातात अशा सार्वभौम शक्तीने दिलेले व ज्यांच्या भंगासाठी शिक्षा होण्याची भीती आहे असे आदेश' अशी जॉन ऑस्टिनने कायद्याची व्याख्या केली आहे. 'न्याय म्हणजे रास्तपणा' असे जॉन रॉल्सने सांगितले. हॉलंडने विधिशास्त्राची व्याख्या 'फॉर्मल सायन्स ऑफ पॉझिटिव्ह लॉ' अशी केली. 'पॉझिटिव्ह' म्हणजे दंडशक्तीच्या अधिकाराने जो नियम पाळण्याला भाग पाडले जाऊ शकते असा. जे कायदे पाळणे भाग पाडले जाऊ शकते, अशा कायद्यांचे आकारिक शास्त्र म्हणजे विधिशास्त्र (ज्यूरिस्प्रूडन्स). जे नियम केवळ नैतिक आहेत, ज्यांच्या अमलबजावणीसाठी शासनाची मदत घेता येत नाही, त्यांचा विचार या शास्त्रात होत नाही. 'ज्यूरिस्प्रूडन्स इज अ सायन्स ऑफ जस्ट अँड अनजस्ट' अशी नैतिकतेला आधार मानणारी एक व्याख्या करण्यात आली. योग्य किंवा न्याय्य काय आहे आणि चुकीचे किंवा अन्याय्य काय आहे, याचा विचार करणारे शास्त्र म्हणजे विधिशास्त्र.

जे प्रस्थापित नीतिमूल्यांना धरून असेल व जे कायद्याला संमत असेल ते योग्य आणि न्याय्य समजायचे. जे त्याविरुद्ध असेल, ज्याला कायद्याने प्रतिबंध केला असेल ते चुकीचे अगर अन्याय्य असे सामान्यत: म्हणता येईल. समाजात प्रस्थापित असलेली नीतिव्यवस्था जशी बदलते, तसतशा न्याय-अन्यायाच्या कल्पनाही बदलतात. प्राचीन भारतीय वाङ्मयात योग्य किंवा न्याय्य आचरणाला 'सदाचार' अशी संज्ञा वापरली आहे. 'सदाचार' म्हणजे सामाजिक नीतितत्त्वांच्या चौकटीत बसणारे व कायद्यालाही मान्य असणारे वर्तन.

**भारतीय शास्त्रपरंपरेतील विधिशास्त्र विचार**

प्राचीन भारतीय शास्त्रपरंपरेत आजच्या अर्थाने वेगळे विधिशास्त्र स्वतंत्ररीत्या मांडलेले दिसत नाही; परंतु एकूणच समाजजीवनाचा तात्त्विक विचार करताना न्याय म्हणजे काय, न्यायव्यवस्थेची गरज काय, तिचे स्वरूप, कामकाज पद्धती आणि नियम यांची चर्चा अनेक ठिकाणी आलेली आहे. 'कायदा' म्हणजे शासनाची दंडशक्ती ज्याच्या परिपालनाला भाग पाडते असा शासनातील कायदे करण्याचा अधिकार असणाऱ्या विभागाने केलेला नियम. कायदा शब्दाचा हा जो अर्थ आज आपल्या मनात असतो त्या मर्यादित अर्थाने प्राचीन भारतीय वाङ्मयात एखादा वेगळा शब्द वापरण्यात आलेला नाही; परंतु त्याऐवजी कायदा शब्दाच्या अर्थापेक्षा कितीतरी व्यापक अर्थ व्यक्त करणारा 'धर्म' हा शब्द उपयोजिलेला दिसतो.

ईश्वराच्या उपासनेच्या विशिष्ट रीतीशी, कर्मकांडाशी संबंधित असा जो धर्म शब्दाचा अर्थ आज आपल्या व्यवहारात प्रथम मनात येतो, त्या अर्थाने 'धर्म' शब्द प्राचीन संस्कृत ज्ञानग्रंथांत अगर वाङ्मयात वापरलेला नाही. धर्म म्हणजे वागण्याची रीती, धर्म म्हणजे सदाचार, धर्म म्हणजे कर्तव्याचे परिपालन. अशा वेगवेगळ्या व्याख्यांनी धर्म शब्द समजावून सांगण्याचा प्रयत्न करता येतो; परंतु या संज्ञेचा आवाका एवढा मोठा आहे, की त्याची निश्चित व सर्वव्यापी व्याख्या अवघड आहे. महाभारतामध्ये युधिष्ठिराने धर्म म्हणजे काय, अशी पृच्छा भीष्माचार्यांना केली असताना त्यांनीसुद्धा धर्माची व्याख्या करणे अवघड आहे, असे प्रारंभीच सांगितले आहे. धर्माचे महत्त्व आणि मोठेपण विविध प्रकारे भीष्माचार्यांनी आणि इतरांनीही सांगितले. उत्तर काळामध्ये माधवाचार्यांनी पराशर स्मृतीवरील आपल्या टीकेत धर्म हा प्रगतीचा आणि कल्याणाचा आधार आहे आणि तो आज्ञांच्या रूपात सांगितलेला आहे, असे म्हटले. तत्कालीन नीतिमूल्यांच्या आधारे जे सामाजिक नियम धर्मसंस्थांनी घालून दिले, त्यांचे पालन करा; सामाजिक संस्थांच्या रक्षणार्थ केलेल्या नियमांचे पालन करा असे धर्म सांगतो.

इ.स.पूर्वी सुमारे चारशे ते दोनशे वर्षे या काळात केव्हा तरी होऊन गेलेल्या जैमिनीने पूर्वमीमांसेची जी सूत्रे रचिली, त्यांचा प्रारंभच 'अथातो धर्मजिज्ञासा' या विधानाने झाला आहे. धर्म म्हणजे काय; त्याचे स्वरूप काय; त्याचे स्रोत कोणते; त्याचा संबंध काय, अशा प्रश्नांची उत्तरे ज्यात मिळतील अशी धर्माची एक व्यापक व्याख्या जैमिनीने सांगितली आहे. 'चोदनालक्षणोऽर्थो धर्म:' अशी ती व्याख्या आहे. एखादी गोष्ट कर, असा आदेश देणारा, एखादी गोष्ट करण्यास प्रतिबंध करणारा आदेश म्हणजे धर्म. जी गोष्ट करावयाची किंवा करावयाची नाही तिला 'अर्थ' या संज्ञेने संबोधिले आहे. अर्थ म्हणजे कर्म किंवा क्रिया. ज्याचा परिणाम कल्याणात होतो ते कर्म करावे; ज्याचा दुष्परिणाम होतो ते करू नये, अशी धर्माची म्हणजे कायद्याची आज्ञा आहे.

ज्याचे पालन करणे दंडशक्तीने भाग पाडले जाते अशाच आज्ञांचा समावेश 'धर्म' या संज्ञेत होतो असे नाही. परंपरेने

आलेले नियम किंवा रूढी, धर्मतज्ज्ञ, पंडित किंवा सल्लागारांच्या परिषदेने केलेले नियम या सर्वांचा समावेश ‘धर्म’ या संज्ञेत होतो. धर्मनियमांच्या भंगाबद्दल आजच्याप्रमाणे राज्यशक्तीने दिलेला तुरुंगवास किंवा ठोठाविलेला दंड अशीच शिक्षा होत असे, असे नाही. काही नियम किंवा रूढींच्या भंगाबद्दल समाजाच्या रोषाला सामोरे जावे लागे. काहींबद्दल प्रायश्चित्त घेतल्यानंतर बहिष्कार समाप्त होई. हॉलंडच्या व्याख्येप्रमाणे विधिशास्त्रात ‘पॉझिटिव्ह लॉ’चाच विचार करावयाचा तर ज्यांच्या भंगाबद्दल राजा शिक्षा करील, अगर समाज बहिष्कारासारखी शिक्षा करील अशा दोन्ही नियमांचा विचार भारतीय विधिशास्त्रात केला पाहिजे. वडिलांना आदर दाखवावा अशा केवळ व्यक्तिगत नीतिमूल्य असलेल्या आज्ञांच्या भंगाचा विचार कायदा करू शकणार नाही.

याज्ञवल्क्य स्मृतीत कायद्याचे स्रोत कोणते, हे सांगितलेले आहे.

श्रुतिः स्मृतिः सदाचारः
स्वस्य च प्रियमात्मनः ।
सम्यक्सङ्कल्पज :
कामो धर्ममूलमिदे स्मृतम् ।।

(वेद, स्मृति, सदाचार आणि मान्यताप्राप्त रूढी, सद्हेतूने प्रेरित झालेल्या विवेकाला पटणाऱ्या गोष्टी हे कायद्याचे मूलस्रोत आहेत.

श्रुती म्हणजे वेद; गौतम, बौद्धायन, आपस्तंब, हरित, वशिष्ठ, विष्णू अशी अनेक धर्मसूत्रे आणि पराशर, याज्ञवल्क्य, नारद, बृहस्पती, कात्यायन यांचे स्मृतीग्रंथ, मीमांसाग्रंथ आणि निबंध तसेच कौटिल्याच्या अर्थशास्त्रासारखे व्यवहारनियम सांगणारे शास्त्रीय ग्रंथ हे तर बोलूनचालून मानवी जीवनव्यवहाराबाबत मार्गदर्शन करण्यासाठीच लिहिले गेले आहेत. त्यांत विधिशास्त्राची मूलतत्त्वे आणि कायद्याचे नियम विखुरलेले सापडतातच; परंतु रामायण व महाभारत यांसारख्या महाकाव्यांतही समाजजीवनाच्या विविध अंगांचे नीतिशास्त्र आणि विधिशास्त्रीय प्रश्नांचे तत्त्वविवेचन आले आहे.




विवाह, वारसा, वाटणी, स्त्रीधन, कर्जफेडीची जबाबदारी, पोटगी, दत्तक, करार, नियमातून सूट देण्याचे अधिकार अशा विविध गोष्टींसंबंधी स्मृतींनी मार्गदर्शन केले आहे. हिंदू धर्मशास्त्राचा एक विशेष असा, की ते सतत विकसित होत गेलेले शास्त्र आहे व मतभेदसुद्धा व्यक्त करण्याची आणि त्यांचा आग्रह धरण्याची मुभा या शास्त्राने दिली आहे. म्हणून काही स्मृतींमध्ये परस्पर विरोध दिसतो. विधवांना विवाह करण्याला प्रतिबंध करणाऱ्या स्मृतिवचनाप्रमाणे त्याला परवानगी देणारी स्मृतिवचनेही आढळतात. अशी वेगवेगळी मते व्यक्त करण्याची मुभा भारतीय परंपरेत असल्यामुळेच वादविवाद होत. २८ मार्च ते ५ एप्रिल १८७० असे नऊ दिवस पुण्यात विधवा विवाह सशास्त्र आहे काय, याबद्दल झालेला वादविवाद प्रसिद्ध आहे. भारताच्या अनेक भागांत वेगवेगळ्या स्मृतींना मान्यता मिळत गेल्याचेही दिसते. धर्मसूत्रांनी आणि स्मृतींनी कायदा जसा सांगितला, तसेच राजाची आणि न्यायाधीशाची कर्तव्येही सांगितली.

वादी-प्रतिवादी यांतील खरेपणा पडताळून पाहण्यासाठी साक्षीदाराचा उपयोग करावा, असे गौतमाच्या धर्मसूत्रांत आणि गुन्हेगाराने गुन्हा केला की नाही, याबद्दल संशय निर्माण होत असल्यास त्याला शिक्षा करू नये, हे आधुनिक न्यायपद्धतीतही मान्य असलेले संशयाचा फायदा देण्याचे तत्त्व आपस्तंब धर्मसूत्रात सांगितलेले आहे. आज दिल्या जाणाऱ्या शिक्षेपेक्षा ‘प्रायश्चित’ या शिक्षेचे वेगळेपण मनुस्मृती आणि याज्ञवल्क्य स्मृतीने सांगितले आहे. कर्ज फेडण्याच्या जबाबदारीबद्दल याज्ञवल्क्याने काही नियम सांगितले आहेत. आपली पत्नी किंवा आपला मुलगा यांना मालकीची संपत्ती मानता येत नाही व म्हणून त्यांना विकता येणार नाही, असे कात्यायनाने पूर्वप्रतिपादनाचा प्रतिवाद करून सांगितले आहे. कशासाठी कोणत्या शिक्षा द्याव्यात याबद्दलचे नियम आपल्याला विविध ठिकाणी सापडतात. न्यायदर्शनाने सत्य हुडकण्यासाठी पुराव्याची मदत केव्हा आणि कशी घ्यायची, हे सांगितले आणि पूर्वमीमांसेत जैमिनीने कायद्याचा अर्थ लावण्याचे शास्त्र (लॉ ऑफ इंटरप्रिटेशन) विस्ताराने सांगितले.

आपल्या विधि महाविद्यालयांत आणि विद्यापीठांत जे विधिशास्त्र (ज्यूरिस्प्रूडन्स) शिकवले जाते, त्याचा प्रारंभच मुळी पाश्चात्य तत्त्ववेत्त्यांपासून होतो. आम्ही ॲरिस्टॉटल शिकवतो, ऑस्टिन शिकवतो, हॉलंड शिकवतो, सालमंडही सांगतो. आपल्या ज्ञानपरंपरेतसुद्धा विधिशास्त्राचा काही विचार झाला होता, हेच आम्ही विसरून गेलो आहोत. आपल्या प्राचीन वारशालाच कुरवाळत बसावे, असे माझे म्हणणे नाही. काळाबरोबर शास्त्र प्रगत होत राहते. नव्या विचारांची त्यात भर

घालावी लागते, सुधारणा करावी लागते हे सर्व खरे; पण ज्ञान परंपरेचा भूतकाळ पुसून टाकणे, हे निर्दोष अभ्यासपद्धतीला अमान्य आहे. संस्कृत येत नसले, तरी घाबरण्याचे कारण नाही. भारताची संस्कृतमधील ज्ञानपरंपरा इंग्रजीतही उपलब्ध आहे. ती आपण आपल्या लोकभाषेत अगदी मराठीतसुद्धा आणू शकतो. आमच्या विधिशास्त्राच्या अभ्यासक्रमाची पुनर्मांडणी करून भारतीय विधिशास्त्राचा आधुनिक विधिशास्त्राशी सांधा जोडण्याची गरज आहे.

**राजापेक्षा कायदा श्रेष्ठ**

पाश्चात्त्य विधिशास्त्रात न्यायसंस्था कार्यपालिकेपासून स्वतंत्र हवी, असे सांगणारा व कार्यपालिकेपेक्षा न्यायपालिका श्रेष्ठ असल्याचे प्रतिपादन करणारा सिद्धांत तेराव्या शतकात 'दी लॉ अँड कस्टम ऑफ इंग्लंड' हा महत्त्वाचा ग्रंथ लिहिणाऱ्या एका न्यायाधीशाने– ब्रॅक्टनने मांडला. राजाची व्यक्तिगत इच्छा आणि त्याची सार्वजनिक इच्छा यांत ब्रॅक्टनने भेद केला. रोमन साम्राज्याच्या उत्तर काळात जस्टीनियन कोड अस्तित्वात आले तेव्हा राजाची इच्छा हाच कायदा हे तत्त्व अमलात होते; परंतु राजाची इच्छा म्हणजे त्याची व्यक्तिगत इच्छा नव्हे, तर विशिष्ट प्रकरणात कोणता निर्णय द्यावा याबाबत राजाच्या सल्लागारांनी अभ्यासपूर्वक दिलेले मत म्हणजेच राजाचे मत असे त्याने सांगितले. राजाची व्यक्तिगत इच्छा आणि त्याची सार्वजनिक इच्छा यात ब्रॅक्टनने भेद केला. पुढच्या काळात राजाची इच्छा म्हणजे लोकप्रतिनिधींच्या मंडळाने– विधिमंडळाने– व्यक्त केलेली इच्छा हे लोकशाही व्यवस्थेत मान्य झाले. ब्रॅक्टनने केलेले प्रतिपादन उदारमतवादी व्यवस्थेचे आणि कायद्याच्या अधिराज्याचे मूलतत्त्व आहे. ''दि किंग हॅज नो अदर पॉवर... एक्सेप्ट दॅट अलोन विच ही डिराइव्हज् फ्रॉम द लॉ. दि लॉ मेक्स दि किंग... देअर इज नो किंग व्हेअर अर्बिट्ररी डॉमिनेटस् अँड नॉट लॉ. – राजाला कायद्याने जी सत्ता दिली आहे, त्याखेरीज दुसरी सत्ता त्याच्याकडे नाही. आणि ज्या ठिकाणी कायद्याऐवजी मनमानी पणाचा दबाव सत्तेवर आहे, त्या ठिकाणी राजा असू शकत नाही.'' कायदा हा राजापेक्षा श्रेष्ठ आहे, असा सिद्धांत १३ व्या शतकाच्या मध्यास ब्रॅक्टन मांडत होता. ही गोष्ट फारच महत्त्वाची होती; कारण त्याच काळात राजा हा ख्रिस्त आहे, म्हणून तो सर्वश्रेष्ठ आहे असे प्रतिपादणारे लोक होते. राजाच्या मुखात आणि त्याच्या छातीत कायदा अस्तित्वात असतो, असे रोमन वकील मानत होते. या पार्श्वभूमीवर ब्रॅक्टनचा सिद्धांत हा फार मूलगामी होता. अर्वाचीन काळातील न्यायव्यवस्थेच्या स्वातंत्र्याची ती सुरुवात होती.

राजापेक्षा कायदा श्रेष्ठ आहे आणि राजाला कायदे करण्याचा अधिकार नाही, ही तत्त्वे प्राचीन भारतीय विधिशास्त्रालाही मान्य होती. बृहदारण्योपनिषदात धर्माची व्याख्या करतानाच हे तत्त्व प्रतिपादिले आहे.

तदेतत् – क्षत्रस्य क्षत्रं यद्धर्म:।
तस्माद्धधर्मात्परं नास्ति ।

(धर्म– कायदा– राजांचा राजा आहे; कायद्यापेक्षा श्रेष्ठ काहीही नाही.)

कायदा करण्याचा किंवा धर्म सांगण्याचा अधिकार राजाला नाही; तो धर्मतज्ज्ञांनी, पंडितांनी व परिषदेने सांगावा, राजाने त्याप्रमाणे निवाडा द्यावा. उपस्थित झालेल्या एखाद्या प्रश्नाबाबत कायदा किंवा धर्मनियम नसेल तर ते तेथे रूढीप्रमाणे निकाल द्यावा आणि जेथे रूढीही नसेल तेथेच राजाने आपली विवेकबुद्धी वापरावी व न्याय द्यावा, असे धर्मशास्त्र सांगते.

राजाची सत्ता कायद्याचे परिपालन भाग पाडण्यासाठी आहे; त्यावर कुरघोडी करण्यासाठी नाही. राजा आणि धर्म हे परस्परपूरक आहेत. राजाने स्वत:च्या (स्वैर) इच्छेनुसार निर्णय देऊ नयेत. त्याने आपल्यासमोरील प्रकरणाचे निकाल शास्त्राप्रमाणे द्यावेत. जेथे एखाद्या बाबतीत शास्त्रात तरतूद नसेल, तेथे राजाने रूढी पाळावी. रूढीप्रमाणेच निकाल द्यावेत, असे कात्यायन स्मृतीने बजावले आहे. जेथे श्रुती आणि स्मृतीत काही तरतूद नाही व निर्णयाविषयाबद्दल काही रूढीही नाही, तेथेच राजाने आपल्या सदसद्विवेकबुद्धीप्रमाणे न्याय करावा, असा दंडक आहे.

ब्रॅक्टननंतर सुमारे तीनशे वर्षांनी म्हणजे इ.स.च्या सोळाव्या शतकात सर एडवर्ड कुक यांनी न्यायसंस्थेला एक महत्त्वाचा अधिकार आपल्या प्रतिपादनाने मिळवून दिला. तो म्हणजे पुनर्विलोकनाचा अधिकार. आज तो सर्वमान्य झाला आहे. मूलभूत न्यायतत्त्वांविरुद्ध जर एखादा कायदा असेल, नागरिकांच्या मान्य अधिकारांचा भंग करीत असेल, अगर असा कायदा करण्याचा करणाराला (व्यक्ती किंवा मंडळ) अधिकारच नसेल तर तो कायदा किंवा हुकूम रद्द करण्याचा न्यायालयांना अधिकार आहे, हा सिद्धांत प्रथम एडवर्ड कुक यांनी जोरकसपणे मांडला. हे न्यायव्यवस्थेला आणखी सामर्थ्यवान करणारे एक महत्त्वाचे पाऊल होते. ज्या देशात लिखित राज्यघटना आहे, त्या देशात राज्यघटनेतील तरतुदींचा भंग करणारा कायदा विधिमंडळाने संमत केला, तरी न्यायालय आपला पुनर्विलोकनाचा अधिकार वापरून तो रद्द करू शकते. त्याचप्रमाणे प्रशासकीय अधिकाऱ्यांनी दिलेला कोणताही हुकूम जर नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचा भंग करणार असेल, किंवा घटनेतील एखाद्या तरतुदीचा भंग करणारा असेल अगर नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वाविरुद्ध असेल, तर तो रद्द करण्याचाही अधिकार न्यायालये वापरू शकतात. इंग्लंडसारख्या देशात लिखित राज्यघटना नसली तरी परंपरांनी काही तत्त्वे मान्य केलेली आहेत; शिवाय नागरिकांच्या मूलभूत अधिकारांना त्याही देशाने मान्यता दिली आहे. अशा देशातील न्यायालयेही पुनर्विलोकनाचा अधिकार वापरू शकतात.

**न्यायव्यवस्था आणि कायदे कशासाठी?**

न्यायशास्त्राच्या आणि न्यायव्यवस्थेच्या अगदी मुळाशीच जाणारा एक प्रश्न अगदी पूर्वीपासून उपस्थित केला गेला आहे, आणि तो म्हणजे ही न्यायव्यवस्था हवीच कशाला? हे कायदे पाहिजेतच कशाला? लोकांना त्यांच्या इच्छेप्रमाणे का वागू देऊ

नये? राजा किंवा लोकनियुक्त सरकार, कायदे आणि त्यांची अंमलबजावणी करणारी यंत्रणा हा सारा उद्योग करायचाच कशासाठी? महाभारतातील शांतिपर्वाच्या २५९ व्या अध्यायात 'धर्म' म्हणजे काय असा प्रश्न या युधिष्ठिराने विचारला; तेव्हा त्याच्या जिज्ञासेची पूर्ती करण्यासाठी भीष्माचार्यांनी एक उदाहरण दिले आहे. चोर दुसऱ्याचे धन हरण करून आणतो आणि ज्या ठिकाणी राजा नाही (किंवा असलाच तर नामधारी, ज्याच्याकडून शिक्षेचे भय नाही असा असेल) अशा ठिकाणी त्या संपत्तीचा उपभोग घेतो. राजा किंवा राज्यव्यवस्था नसल्याचा त्याला आनंद असतो; परंतु जेव्हा त्याला कोणी सव्वाशेर भेटतो आणि त्याचेच धन हरण करतो, तेव्हा मग त्याला आपल्यापेक्षा अधिक बलवान असलेल्या चोरास शिक्षा करण्यासाठी राजा हवा, व्यवस्था हवी असे वाटू लागते. शांतता आणि सुव्यवस्था सर्वांच्याच हितासाठी असते. फक्त ती दुबळ्यांनाच लागते असे समजण्याचे कारण नाही. दुर्बळांनीच स्वसंरक्षणार्थ धर्म स्थापन केला (आणि लोकांना नियंत्रित करण्याचा प्रयत्न केला) हे खरे नाही. प्रबलांचीही अवस्था दुर्बल होऊ शकते म्हणून प्रबल असताना, समृद्ध असतानासुद्धा धर्मरत राहणे, नीतीने वागणे, कायद्याने वागणे हेच समाजासाठी हितकर असते. धर्मनियम (म्हणजे व्यवस्थेचे नियम, कर्मकांडाचे नियम नव्हे) हे समाजाच्या रक्षणासाठी आवश्यक असतात. 'लोकयात्रार्थमेवेह धर्मस्य नियम:कृत:' असे भीष्माचार्यांनी म्हणूनच सांगितले आहे.

न्यायसंस्था आणि कायदा यांची आवश्यकता का असते? दोन उद्देश त्यांच्यापासून साध्य करावयाचे असतात. व्यक्तींच्या मन:पूत आचरणाने अनवस्था निर्माण होईल. समाजात शांतता व व्यवस्था कायम असणे त्याच्या स्थैर्यासाठी आवश्यक आहे, त्यासाठी कायदा आवश्यक असतो, हा त्यातला पहिला उद्देश आहे. शांतता, व्यवस्था आणि स्थैर्य यांत समाजाचे हित गुंतलेले असते. त्यासाठी कायदा व न्यायव्यवस्था आवश्यक ठरतात. कायदाच जर नसेल, नियम जर नसतील तर बळी तो कानपिळी हेच सूत्र सर्वत्र अमलात असेल. माणसे हातांत तलवारी घेऊन हवे ते मिळविण्याचा प्रयत्न करतील. टोळ्या आपापसांत युद्ध करून आपल्या श्रेष्ठत्वाचा निकाल करून घेतील. सर्व माणसे सदाचारीच असतील; दुसऱ्याच्या अधिकाराचा आदर करणारी असतील असे गृहीत धरता येत नाही. काही माणसे वाईटही असणार आणि काही चांगली माणसेही काही वेळा वाईट वागणार. माणसाची स्वार्थी प्रवृत्ती ही त्याला कित्येकवेळा दुसऱ्याच्या अधिकारावर अतिक्रमण करण्यास, जे आपले नाही, दुसऱ्याचे आहे, तेही लुबाडून घेण्यास प्रवृत्त करू शकते. अशा वेळी व्यक्ती-व्यक्तीतील संबंधाचे नियमन करणारी शक्ती अस्तित्वात असावी लागते. पूर्वी राजा ही अशी नियंत्रक शक्ती होती. हल्ली हे काम आपण शासनाच्या दंडशक्तीचे पाठबळ असलेल्या न्यायव्यवस्थेला सांगितलेले आहे.

कायद्याचा दुसरा उद्देश म्हणजे समाजाच्या भावी वाटचालीला विशिष्ट दिशा देणे. देशाची, समाजाची वाटचाल अनियंत्रित राहू दिली, तर वेगवेगळ्या शक्ती परस्पर विरोधी मार्गाने समाजाला ओढू पाहतील. व्यक्तीव्यक्तींच्या निरनिराळ्या हितसंबंधांनी आणि दृष्टिकोनांनी समाज भरकटत जाईल. असे होऊ नये म्हणून उद्याचा समाज कसा हवा, याचे सुस्पष्ट चित्र शासकांच्या डोळ्यांसमोर हवे. त्याची वाटचाल न्याय्य दिशेकडेच व्हावी असा त्यांचा आग्रह हवा. समाजाचे हे भविष्यातील मार्गक्रमण निश्चित करण्याचे, समाजाच्या वाटचालीला नियंत्रित करण्याचे काम कायदा करतो; हा कायद्याचा दुसरा उद्देश आहे. समाजाच्या उद्याच्या वाटचालीची दिशा कायदा ठरवतो. आपल्या राज्यघटनेमध्ये घटनेचे प्रास्ताविक आणि राज्याची मार्गदर्शक तत्त्वे ही कायद्याच्या या उद्दिष्टपूर्तीसाठीच समाविष्ट झाली आहेत. भारतातील जनतेला राज्यघटनेने दिलेले स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेचे आणि न्यायाचे आश्वासन समाजाच्या वाटचालीला दिशा दर्शवण्यासाठी कायद्याच्या उपयोगाचे उत्तम उदाहरण आहे.

समाजाच्या गरजा जशाजशा बदलतात तसतसे नियंत्रणांचे विषय आणि त्यांचा परिघही बदलावा लागतो. काळ बदलतो तसतसे नवे प्रश्न निर्माण होत जातात. त्यांच्या सोडवणुकीसाठी नवनवे कायदे करावे लागतात. काही वेळा आपल्या स्वप्नातले नवसमाजाचे चित्रच बदलते; आपल्या राजकीय तत्त्वज्ञानातच बदल होतो. मग कायद्यांत मूलभूत परिवर्तन करावे लागते. कायद्याशिवाय, त्याच्या अमलबजावणीची यंत्रणा असल्याशिवाय हे इष्ट वाटणारे परिवर्तन अशक्य असते. अशा दोन उद्दिष्टांनी कायदा आणि त्याच्या अंमलबजावणीची व्यवस्था आवश्यक असते.

**मूल्यव्यवस्था आणि कायद्याचे तत्त्वज्ञान**

विधिशास्त्राची तत्त्वे आणि सर्वसाधारण कायद्याचे दंडक यांबद्दल आज आपल्याला अधिक परिचित असलेले पाश्चात्त्य विधिशास्त्र आणि भारतीय धर्मशास्त्र यांत पुष्कळ साम्य स्थळे असली तरी कायद्याचा नैतिक आधार काय असावा, याबद्दल धर्मशास्त्रकालीन कायदा आणि आजचा कायदा यांत खूपच फरक आहे. धर्मशास्त्राने 'सदाचार' शब्दाची व्याख्या करताना हरितसूत्रात सत् म्हणजे चांगले आणि जे आचरणाने शुद्ध आहेत त्यांच्या आचरणाला 'सदाचार' म्हणावे, असे सांगितले आहे. 'सदाचार' कशाला म्हणावे, हा नीतीशी संबंधित प्रश्न आहे; त्या त्या काळातील समाजाने मान्य केलेल्या आचरणमूल्यांच्या प्रकाशात निर्णय करावयाचा प्रश्न आहे. प्रस्थापित नीतितत्त्वांच्या मार्गाने जाणे म्हणजे सदाचार. समाजातील नीतीची व्याख्या बदलली म्हणजे सदाचाराचीही व्याख्या बदलते. काल जे योग्य होते, ते आज योग्य वाटणार नाही. दोन हजार वर्षांपूर्वी चातुवर्ण्य आपण स्वीकारला. चातुवर्ण्याची कल्पना ही काही समतेवर आधारलेली कल्पना नव्हे. विविध वर्णांत नुसती कामाचीच वाटणी झाली असे नव्हे; तर कामाच्या स्वरूपामुळे मुळात अपेक्षित नसलेले उच्चनीचतेचे गंडही निर्माण झाले; अहंता निर्माण झाल्या. समाजाच्या धारणेसाठी चातुवर्ण्य आवश्यक आहे असे म्हणता म्हणता समाजातल्या विषमतेचेसुद्धा समर्थन सुरू

झाले. आज विषमतेवर आधारलेली कोणतीही व्यवस्था आपण मान्य करणार नाही. दोन हजार वर्षांपूर्वी स्त्रीला सन्मानाचे स्थान देणाऱ्या व जीवनाच्या सर्व क्षेत्रांत समान अधिकार देणाऱ्या भारतीय समाजाला त्यानंतर हजार वर्षांने स्त्री ही आपली भोगदासी आहे व तिचे स्थान दुय्यम आहे असे वाटू लागले. प्रत्येक काळात समाजाने स्वीकारलेल्या मूल्यव्यवस्थेच्या आधाराने चांगले किंवा वाईट ठरते. जशी समाजात मान्य असलेली मूल्ये बदलतात, तसे चांगले किंवा वाईट याबद्दलचे मूल्यमापनही बदलते.

आजच्या आपल्या मूल्यदृष्टीला ज्या गोष्टी धडधडीत अन्याय्य आहेत असे वाटते, अशा अनेक गोष्टी पूर्वी कायदेशीर समजल्या गेल्या आणि अशाच काही गोष्टी आजही काही देशांच्या व्यवस्थेत कायदेशीर समजल्या जातात; कारण त्या देशांची अगर त्या देशांच्या शासकांची मूल्यदृष्टी निराळी आहे. लोकशाही व्यवस्था मानणारे सर्व लोक लोकशाहीचा प्रारंभिक आविष्कार म्हणून ग्रीक शहर राज्यातील लोकशाहीचा गौरवाने उल्लेख करतो, पण या लोकशाहीत गुलामगिरी कायद्याने मान्य होती आणि गुलामांना मताधिकार नव्हता. शूद्र वर्णात ढकलेल्या काही जातींना आणि एकूणच स्त्रियांना भारतात समान अधिकार तर नव्हतेच; पण त्यांना माणुसकीचे अधिकारही नाकारण्यात आले होते आणि हे सर्व तत्कालीन कायद्याच्या (धर्माच्या) दृष्टीने योग्य आहे, असा त्याचा अर्थ लावला जात होता. धार्मिक स्वातंत्र्य, विश्वासाचे स्वातंत्र्य हा माणसाचा एक मूलभूत अधिकार आहे असे आपण मानतो. सौदी अरेबियामध्ये इस्लाम सोडून इतर कोणत्याही धर्माचे पूजास्थान किंवा प्रार्थनामंदिर उभारण्यास अजिबात परवानगी नाही. मात्र धार्मिक अधिकाराबाबतचा असा भेदभाव उदारमतवादी लोकशाही मानणाऱ्या इतर सर्व राष्ट्रांना अमान्य आहे.

जेव्हा प्रस्थापित मूल्यव्यवस्थेलाच नव्या विचारांचे हादरे बसतात, नवीन मूल्ये समाजात स्थान मिळवतात तेव्हा साहजिकच कायद्याचे तत्त्वज्ञानही बदलते. अर्थात हे अचानक घडत नाही. मूल्यपरिवर्तनाची ही प्रक्रिया दीर्घकाळ चालू असते. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांना आज जगभर मान्यता मिळाली आहे. काही राजकीय घडामोडींनी या मूल्यत्रयीला ती मिळवून दिली. इ.स.च्या तेराव्या शतकापासून- मॅग्नाकार्टापासून- या परिवर्तनाला प्रारंभ झाला असे म्हणता येईल. जगातल्या अनेक राज्यव्यवस्थांची उदारमतवादाकडे वाटचाल सुरू झाली. तिला वेग आला तो अठराव्या शतकात. युरोपातील विविध देशांतून विशेषत: इंग्लंडमधून अमेरिकेत येऊन वस्त्या केलेल्या संस्थानांनी इंग्लंडच्या साम्राज्यातून बाहेर पडून आपले स्वत:चे स्वातंत्र्य घोषित करणारा जाहीरनामा ४ जुलै १७७६ रोजी प्रसिद्ध केला. त्यानंतर तेराच वर्षांनी २७ ऑगस्ट १७८९ रोजी फ्रेंच राज्यक्रांतीचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला. माणसे स्वतंत्र आणि समान म्हणूनच जन्माला येतात व ती तशीच राहावी लागतात; राजकीय संस्थांचा उद्देश नागरिकांचा स्वातंत्र्य आणि संपत्ती यांचा अधिकार अबाधित ठेवणे आणि पिळवणुकीपासून त्यांना संरक्षण मिळवून देणे हाच असतो; नागरिकांचे अधिकार सर्वोच्च असतात; शासन ही त्यांच्या उपयोगासाठी निर्माण केलेली एक संस्था आहे, हे या दोन्ही जाहीरनाम्यांनी जगभर मान्य झाले. या जाहीरनाम्यांतील तत्त्वे अमलात आणायची असतील, तर स्वतंत्र न्यायव्यवस्था लागते. शासन आणि सत्ता नेहमीच नागरिकांवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करतात म्हणून जागरूकपणे त्यांच्या अधिकारांचे रक्षण करावे लागते. समाजातील बलदंड शक्तीच्या विरोधात दुबळ्यांचे रक्षणसुद्धा न्यायसंस्थेला करावे लागते. इ.स.च्या १३ व्या शतकापासून १८ व्या शतकाच्या अखेरपर्यंत घडणाऱ्या राजकीय घडामोडींनी शासनसंस्थेची उदारमतवादाकडे वाटचाल सुरू झाली. ती होत असताना शासनसंस्थेचा एक महत्त्वाचा घटक म्हणून न्यायसंस्थेचा आणि तिच्या कार्यकक्षेचाही विकास झाला. भारतीय राज्यघटनेवरसुद्धा उदारमतवादी विचारांची छाप स्पष्ट आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या नेत्यांना लोकशाही आणि उदारमतवादी राज्यव्यवस्थेचे आकर्षण होतेच. दीर्घकाळच्या ब्रिटिश सान्निध्यामुळे आणि इंग्रजी शिक्षणामुळे झालेला तो स्वाभाविक परिणाम होता. साहजिकच आपल्या घटनेच्या प्रास्ताविकात आपण स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांच्यावर आधारित समाजव्यवस्थेचे तसेच सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायाचे आश्वासन दिले आहे. आपल्या घटनेचे प्रास्ताविक, मूलभूत हक्कांचे प्रकरण आणि घटनेत सांगितलेली मार्गदर्शक तत्त्वे हे आपले घटनात्मक तत्त्वज्ञान आहे. कायदे घटनेशी सुसंगत असावेच लागतात; म्हणून आपल्या कायद्यांचेसुद्धा तेच आधारभूत तत्त्वज्ञान आहे.

कायदा समाजाला स्थैर्य देतो, त्याचबरोबर तो त्याच्या पुढील वाटचालीची दिशा निश्चित करतो हे वर सांगितलेच आहे. भारतीय घटनेचे प्रास्ताविक आणि चौथ्या प्रकरणात सांगितलेली राज्याची मार्गदर्शक तत्त्वे यात भारतीय संघराज्याने कोणत्या दिशेने मार्गक्रमण करावे, याचा स्पष्ट निर्देश केलेलाच आहे. याशिवाय घटनेतील इतर काही तरतुदी आणि आपण केलेले कायदे यांवरून ही दिशा स्पष्ट होते. कसणारांना जमिनीची मालकी देणारे कुळकायदे, जमीनदारी नष्ट करणारे कायदे, भाडेकरूंना संरक्षण देणारे कायदे, मागासवर्गीयांना विविध शासकीय नोकऱ्यांत राखीव जागा आणि इतर सवलती देणाऱ्या तरतुदी, आदिवासींची जमीन त्यांच्या अज्ञानाचा व गरिबीचा फायदा इतरांनी घेऊ नये म्हणून करण्यात आलेले भूहस्तांतरण प्रतिबंधक कायदे, अशी अनेक उदाहरणे आपल्या संघराज्याच्या विशिष्ट दिशेने होत असलेल्या वाटचालीची उदाहरणे म्हणून सांगता येतील. आपल्या कायदाव्यवस्थेमागील तत्त्वज्ञान या उदाहरणांनी स्पष्ट होईल.

(उत्तरार्ध पुढील अंकात)

**न्या. नरेन्द्र चपळगावकर**
१३ जयनगर, दशमेशनगरजवळ,
औरंगाबाद - ४३१ ००५.
दूरध्वनी ०२४०-२३३११६६



गौतम कांबळे



# शेवंताला न्याय मिळेल?

हळदपूर.

तालुक्याच्या वीसेक मैलांच्या अंतरावर असलेलं गाव. डांबरी सडकेपासून गावात पोचायला एकुलती एक पायवाट. भोवतीने रान-झुडपांची घनघोर तटबंदी. आलेल्या प्रसंगात पायाखालची वाट तुडवता-तुडवता आम्ही हैराण झालो होतो. चिखल-दगडाची पायवाट चालण्याची माझी सवय गेल्या कित्येक वर्षांत मोडून पडलेली. कशीतरी कसरत करत-करत आम्ही हळदपूर गाठलं. ईळभर शेता-रानात राबणारी माणसं झांजर वेळी आपापल्या घराकडे लगबगीने येत होती. काल-परवा वर्तमानपत्रात छापून आलेल्या, त्यांच्याच गावातल्या बातमीचा मात्र या माणसांना जरादेखील थांगपत्ता लागलेला नव्हता; असेच एकूण वातावरण. जो-तो आपापल्या कामाधंद्यात विरघळून गेलेला. 'आपलं काम भलं आणि आपण' हेच इथल्या कष्टकऱ्यांच्या जगण्याचं साधं सूत्र; त्यांना वर्तमानपत्रात छापून आलेल्या बातमीशी काहीही देणं-घेणं नव्हतं.



शेवंता बेलसरेवरती केलेला अन्याय, गावच्या सरपंचाने केलेली जबर मारहाण, घालवलेली अब्रू असं बरंच काहीतरी ऐकायला मिळालं होतं. वस्तुस्थिती समजून घ्यावी म्हणून माझ्या चळवळीतील काही कार्यकर्त्या मित्रांना घेऊन बेलसरेंच्या घरी आलो होतो. ती दारातच बसून होती. आम्हांला ओळखून तिने 'आत या' म्हणत, बसायला सांगितलं. थोड्या वेळानं चहा आला. चहा घेता-घेता आम्ही मूळ विषयाला सुरुवात केली. आमच्या समोर बोलताना शेवंताचा चेहरा उदास वाटत होता. तिच्या डोळ्यांत, आपल्यावर झालेल्या अन्यायाची टोकदार सल धगधगताना मला स्पष्ट जाणवत होती. मघापासून अनावर झालेला हुंदका गळ्यातच दाबून तिनं सांगायला सुरुवात केली : ''मंगळवारचा दिवस. गावातल्या संघाच्या दुकानात रॉकेल (घासलेट), राशन आलं होतं. म्हणून मी आईला पाठवलं. संघाचं दुकान सरपंचाच्या मालकीचं. सकाळी गेलेली आई दुपारपर्यंत घरी आली नव्हती. तिला बघण्यासाठी म्हणून मी थेट संघाच्या दुकानाकडं गेले. गोळा झालेल्या माणसांची पांगापांग होताना बघून मनात भलत्याच विचाराची कळ उठली. धीरानं पुढं जाऊन बघितलं, तर आईबरोबर सरपंच आणि त्याची मालकीण हुज्जत घालत होते. मोठ्यानं, 'हितनं चालती हो थेरडे' असं बरंच काही बोलत होते. मी मध्ये गेले. 'म्हातारीनं काय केलं? तिला कशापायी शिव्या देता?' एवढं विचारल्यानंतर त्या दोघांनी मला मारायला सुरुवात केली. माराच्या असह्य वेदनेनं मी किंचाळत होते. ओरडत होते. माझी सोडवणूक करण्यासाठी मात्र पुढं कुणीही येत नव्हतं. माझा मार वाचावा म्हणून आई पुढं आली. भाड्यानी तिलाही मारलं...'' सांगता-सांगता तिचा श्वास गुदमरत होता. बोलायची इच्छा असूनही तिला बोलवत नव्हतं. आम्ही तिला मध्येच थांबवून शांत व्हायला सांगितलं.

थोडा वेळ तसाच गेला. कुणीही कुणाशी बोलत नव्हतं. कर्त्या-सवरत्या लेकीचं ऐकून सोप्यात बसलेल्या म्हातारीच्या जिवाची घालमेल सुरू झाली. तिला किती सांगू आणि किती नको असं झालेलं. अखेर तिच्या मनाचा बांध फुटला, ''पोरांनू, तुम्ही काय आम्हांला परकी न्हाईसा. एवढ्या घोरानं आम्हासाठी तुम्ही तालुक्यास्नं हितवर आल्यासा. तुम्हांला ह्यातली काय गोम हाय ते सांगितल्याबिगार कळायची न्हाई...''

आमची उत्सुकता आता शिगेला पोचलेली. कुठल्या कारणासाठी एवढं सगळं रामायण घडलं? मार खावा लागला? त्याचा आता उलगडा होणार होता. एवढ्यात बाहेर दारासमोरून कुणीतरी खाकरा काढत निघून गेले. दचकलेली शेवंता बाहेर डोकावून आली. विषयाला पुन्हा सुरुवात, 'भाड्या, गावचा सरपंच झाला, गाव सुदरायचं सोडून आम्हा गरीबास्नी माराय बसलाय. घिरण्यानं कोळ साधला आमचा. गावच्या नावानं आमची जागा लाटाय बसलाय...' म्हातारीच्या बोलण्याचा थेट अर्थ मला कळाला नाही म्हणून मी विचारलं, 'तुमच्या जागेचा आणि भांडणाचा संबंध काय?' तशी म्हातारी उसळून म्हणाली, 'आरं लेका, माझ्या दारामागल्या जाग्यावर त्यो गावासाठी पाण्याची टाकी बांधणार हाय म्हणं, सरकारच्या हुकमानं. किती वर्सं झाली, त्या जाग्याचा कज्जा चालू हाय कोर्टात. मालक व्हता तवर आम्हांला कायएक घोर नव्हता. आता तो बी मरून सर्गाला गेला. माझ्या पोरीच्या डोक्याला ताप झालाय सगळा. नुसत्या काळजीनं पोर पालीसारखी झालीया. आणि आमची जागा मागाय बसलाय मुडदा. मला सांग पोरा, सगळा गाव सोडून त्येला माझीच जागा मोकळी दिसली? चीड ईल का न्हाई माणसाला?'

म्हातारीच्या बोलण्यावर मी निरुत्तर झालो होतो. घडल्या प्रकाराचा अंदाज येत होता. सरपंचानं 'त्याच' जागेसाठी हटून बसावं याचंही आश्चर्य वाटत होतं. गुंता अधिकच वाढत होता. आमच्याशी सुरू असलेलं बोलणं मध्येच टाकून म्हातारी आतल्या सोप्यात उठून गेली. तिने चुलीतला जाळ मागे ओढला. कढ आलेल्या आमटीच्या भांड्याला पदराने उचलून वायलावर ठेवले. म्हणाली, 'लेकानू जेवाण केलंय. हाडकं भेड्यांची आमटी हाय. दोन घास खाऊन जावा.' अशा बिकट प्रसंगातही म्हातारीच्या बोलण्यातला जिव्हाळा मात्र मला श्रीमंत वाटला! बराच वेळ प्रयत्न करून तिची समजूत घातली आणि जेवायला नकार देऊन मोकळा झालो. शेवंताला दिवा लावायची आठवण झाली. देवळीत ठेवलेल्या दिव्याच्या वातीला तिनं आगपेटीतली काडी पेटवली.

'दोन महिने झाले. पैसे भरून देखील अजून वीज आलेली नाही. भाऊबंदांनी आमच्या विरोधात अर्ज केला. आधी घराची वाटणी नंतर वीज. रोजच्या मढ्याला रडायचं तरी किती? मी शाळा मास्तरीन. घरातलं बघू का शाळेत लक्ष घालू? हिकडं आड आणि तिकडं विहीर...'

शेवंता हे सगळे सांगत असताना मात्र माझं मन कशाचा तरी आदमास घेत होते. तिचे वडील अपघातात जाऊन बरीच वर्षं झाली. त्यानंतर घरी तिचा नवरा, एखादा भाऊ यांपैकी कोणीतरी घर सांभाळत असावं, हा माझा सुरुवातीचा अंदाज होता. पण मघापासून इथे एकही पुरुष व्यक्ती माझ्या नजरेत आलेली नव्हती. थोडा वेळ गेल्यानंतर माझ्या मनात चालू असलेलं शंकेचं वारूळ तिने सपशेल उद्ध्वस्त केलं!

'बाप होता तोपर्यंत आमच्या घराकडं कुणी वाकड्या नजरेनं बघायची हिंमत करत नव्हतं. बाप जाऊन आता पंधरा वर्षं झालीत. मी घरात एकुलती एक असल्याने लाडात वाढलेली. बाप अडाणी शेतकरी होता; तरीही त्याने माझा हट्ट पुरवलाच. आता कुठे बरे दिवस आले होते, आणि तो मात्र निघून गेला. त्यानंतर माझं लग्न झालं, नोकरी मिळवली. मागे कुणाचंच पाठबळ नव्हतं, कौतुक तरी कोण करणार? एखादा भाऊ, एखादी बहीण जरी असती, तरी मी डममगले नसते. आईच्या जिवाचा घोर तरी मिटला असता. देवाच्या दारालाच शिरं मारलं त्याला कोण काय करणार?' घराच्या आढ्याकडं एकटक बघत कुठंतरी हरवल्यासारखी शेवंता थोडा वेळ शांत बसली.

'तुमचे मालक घरी लक्ष देत नाहीत?' चळवळीत काम करणारा माझा मित्र कॉ.शिवाजी गुरव याचा नेमका प्रश्न. त्याच्या टोकदार प्रश्नानं काहीसं भानावर येऊन पुन्हा एकवार आठवल्यागत ती बोलाय लागली, 'दादा, कशाचं लक्ष आणि कसलं काय! माझं लग्न झाल्यावर कसातरी दोन महिन्यांचा संसार झाला असेल माझा. पंचमीच्या सणाला गावी आले ती कायमचीच. गावाकडे पंचांच्या बैठकी झाल्या, मध्यस्ती झाली. शेवटी कशाचाच उपयोग झाला नाही. माझ्यावरच आळ घेऊन, 'मी तिला नांदवणार न्हाई' असं भरल्या बैठकीत सगळ्याम्होरं जे सांगून गेला, त्याला आज दहा वर्षं पूर्ण झाली, त्याचा पत्ता नाही. माझं कुणी विचारणारं असतं, तर माझ्या आयुष्याचा असा खेळखंडोबा झाला नसता!'' ती आमच्यासमोर हमसून-हमसून रडायला लागली. दाराला पाठ करून बसलेल्या म्हातारीच्या डोळ्यांत आता वळवाचा घनघोर पाऊस उतरला होता.

भोवतालचा सगळा अंधार जडभार झाला. वेळही बराच झालेला. आम्ही उठलो. म्हातारीचा, तिच्या लेकीचा पुन्हा पुन्हा तोच आग्रह, 'दादा, जेवणवेळ झालीया, दोन घास खाऊन मगच जावा.' मघापासून सगळं ऐकून आमची अन्नावरची वासनाच मरून गेली होती. 'मावशी, पुन्हा येतो कधीतरी', असं म्हणत आम्ही परतीच्या मार्गाला लागलो. चालताना वाटेत हजार विचारांचे दंश मनाला भोवळ आणू लागलेले...

गावातून आम्हांला कळलेली माहिती धक्कादायक होती. सरपंचाच्या बाजूने कुणीही चांगलं बोलत नव्हतं. जो तो खाजगीत त्याच्या पिढ्यांचा उद्धार करत होता. घडल्या प्रकाराबद्दल सरपंचावरती 'ॲट्रॉसिटी ॲक्ट'चा गुन्हा नोंद होऊनही तो मात्र खुलेआम, उजळमाथ्याने गावातून फिरत होता. त्याच्या दहशतीपुढे गावात कुणीच विरोधात बोलायला तयार नव्हतं. एका बाजूला गावातली कळती-सवरती, शहाणी माणसं शेवंताच्या न्यायनिवाड्यात पुढे येताना दिसत नव्हती. दुसऱ्या बाजूला इतकं सगळं घडूनही तालुक्यातील नेते मंडळी, पुढारी या प्रकरणाकडे दुर्लक्ष करून बसले आहेत.

शाळेत शिक्षिका असणारी शेवंता बेलसरे, तिच्यावर केला गेलेला अन्याय, गावासमोर तिला झालेली मारहाण, तिनं न्यायव्यवस्थेकडे मागितलीय दाद. तिला न्याय मिळेल?

**प्रा. गौतम कांबळे**
प्रज्ञाभवन, आयडीयल कॉलनी, गांधीनगर, आजरा.
Mob. : 9423824887

चर्चा-मंथन

भाग्यश्री भागवत

# ‘कवितेचा रस्ता’ या बीजभाषणाविषयी

**‘कविता’ या वाङ्मयप्रकाराला केंद्र मानून, पणजी (गोवा) येथे झालेल्या साधना साहित्य संमेलनाच्या उद्घाटनाच्या सत्रात, वसंत आबाजी डहाके यांनी ‘बीजभाषण’ केले. बीजभाषणावर चर्चा करणारे एक सत्रही त्या संमेलनात झाले. पुणे विद्यापीठात मराठी विभागात एम.फिल. करीत असलेल्या विद्यार्थिनीची त्या भाषणावरील ही एक प्रतिक्रिया...**

१९ डिसेंबर २००९च्या ‘साधना’ अंकातील वसंत आबाजी डहाके यांचे साधना साहित्य संमेलनातील ‘बीजभाषण’ (कवितेचा रस्ता) वाचले. या संपूर्ण भाषणाचा समग्रपणे विचार करता असे लक्षात येते, की जरी याची सुरुवात कवितेच्या आतल्या वाटेच्या विशदीकरणाने झालेली असली, तरी या सूत्राची आवर्तने संपूर्ण भाषणभर पसरत नाहीत. उलट पहिल्या एक-दोन परिच्छेदांनंतर भाषण अधिकाधिक अवयवनिष्ठ होऊन अखेरीस घोषवाक्याकडे वाटचाल करते. त्यामुळे यातून कवितेबाबत नवे काही हाती लागत नाही व संपूर्ण लेखाचे स्वरूप उत्तरोत्तर अधिकाधिक माहितीपर बनत जाते. खरे पाहता, लेखातील कवितेबाबतची अवयवनिष्ठता गृहीत धरूनही ‘आतली वाट’ या सूत्रापर्यंत पोहोचणे शक्य झाले असते; मात्र तसे होत नाही. आतल्या वाटेचे सूत्र मध्येच बाजूला पडते. त्यामुळे जेथे कवितेचे बीज/चैतन्य/आत्मा सामावलेला असतो, त्याबाबत सुरुवातीला निर्माण झालेली उत्सुकता अखेरपर्यंत तरंगतच राहते. त्यामुळे संपूर्ण वर्णन कृत्रिम होते व त्याला विधानात्मकता येत नाही.

आतल्या वाटेची जगण्याशी जी उलथापालथ घडते, तेथे कविता अस्तित्वात येते आणि त्या अस्तित्वाच्या अविभाज्य फांद्यांमधून लय, नाद, मिती इत्यादी घटक उत्पन्न होतात. त्यामुळे आतली वाट आणि जगणे यांची एकमेकांशी भिडतानाची प्रक्रिया सांगणे, म्हणजे कवितेच्या रस्त्याविषयी काही सांगणे अथवा विधान करणे ठरले असते; परंतु मुळात जेथे जगण्यातील प्रत्यक्ष क्षणातून पिंजून निघणेच येत नाही. त्यामुळे एकूण कवितेचे घडणे, अर्थात तिच्या जन्माच्या शक्यताच प्रस्थापित होत नाहीत. त्यामुळे काळ, त्यातील कवी, त्यांची कविता, लय, नाद, वास्तव, मिती या सर्वांचे वितरण हा कवितेच्या अवयवांकित अंगाबद्दल घेतलेला आढावा ठरतो. मुळात, या सर्व घटकांमधून ‘कवितापणा’बद्दल काहीच पुढे न आल्याने हा आढावा ‘सार्थ’ ठरत नाही. वेगवेगळ्या प्रवाहांच्या खाली वाहणारे ‘कवितापण’ न पकडल्याने या घटकांच्या नोंदी विस्कळीत ठरतात.

मुळात, प्रश्नांना भिडणाऱ्या प्रवृत्ती या भाषणात असल्या, तरी प्रश्नांना भिडण्याच्या कोणत्या सामाईक प्रवृत्तीतून कविता सिद्ध होते, याबाबत काहीच विशद केले जात नाही. थोडक्यात, प्रश्नांना भिडण्याच्या ‘कविता’ या प्रवृत्तीबाबतचे उर्ध्वपतन या लेखात नाही. प्रातिनिधिक स्वरूपात तटस्थ आणि सहृदयतेने संपूर्ण कवितेचा/कवितेच्या रस्त्याचा घेतलेला हा शोध नाही; तर अनेक ठिकाणी कवितेचा कैवार घेऊन केलेले हे लेखन आहे, असे आढळते. त्यामुळे दिलेल्या नोंदी जरी ‘कविता’ या वाङ्मयप्रकाराचा विचार करता समर्पक असल्या, तरी त्यातून कवितेचा स्थायी भाव आणि तिची म्हणून असणारी स्वतंत्र क्षमता सिद्ध होत नाही. त्यामुळे कवितेबाबत एक प्रकारची गोंजारलेपणाची भावना भाषणातून प्रतीत होत राहते. परिणामी, संवेदनशीलता व हळुवारपणा यांतून तिला प्राप्त झालेली बारीक धार बोथट होते.

मुळात, जगणे केंद्रस्थानी ठेवून त्याला शोधता-शोधता सापडलेला एक मार्ग म्हणून कवितेचे निश्चित आकलन समोर येत नाही; तर बऱ्याच ठिकाणी कविता हा एक निश्चित आकार, निश्चित प्रवृत्ती मानून केलेले आकलन पुढे येते. त्यामुळे कविता या प्रवृत्तीचा शोध अखंड राहत नाही. मानण्याने त्यातील गतिमानता व ओघ संपुष्टात येतो. अनेक ठिकाणी कविता गृहीत धरून जगणे सिद्ध होते. जगण्याच्या विच्छेदनातून कवितेचे कवितापण, तिचा आकार सिद्ध होत नाही. परिणामत: तिचे जिवंत असलेले ऊर्जारूप समोर न येता, ती केवळ ‘ऐतिहासिक सांगाडा’ म्हणून पुढे येते. खरे पाहता, जगण्याच्या बिघडणाऱ्या चयापचयातून स्वत:ला मोडून निरनिराळ्या ऊर्जास्वरूपात कविता सिद्ध होत राहते. मात्र प्रस्तुत लेखात जगण्याचे बिघडलेपणच ‘अधोरेखित’ न झाल्याने कविता अधिकाधिक पार्थिव रूप धारण करते. उदाहरणार्थ, विभाग तीनमधील एकसलग दिलेल्या कवितांची उदाहरणे ही भाषणाच्या संपूर्ण रचनेमुळे निव्वळ आकृतिबंधातील विविधतेची उदाहरणे म्हणून प्रस्थापित होतात. मात्र एकूण जगण्याशी, त्यातील बदललेल्या आकृतिबंधाशी, गतीशी, मितीशी त्यांचा संबंध जोडून घेता आलेला

नाही. परिणामी, हे विश्लेषण कवितेच्या आतल्या वाटांपर्यंत पोहोचतच नाही. तर ते निव्वळ कवितानिष्ठ अर्थाचे विश्लेषण करत राहते. जीवननिष्ठ कवितेची सिद्धता त्यातून होत नाही. त्यामुळे कवितेच्या वैविध्यपूर्ण उदाहरणांतूनही कविता हे एक सामाईक, संपृक्त तत्त्व म्हणून पुढे येत नाही. त्यामुळे ही संपूर्ण रचना प्रकारनिष्ठ व अधिकाधिक उर्जाविभाजित ठरते. मात्र उर्जेच्या मूळ स्रोतांबाबत, या प्रकारनिष्ठतेच्या खाली वाहणाऱ्या सामाईक, सर्वसमावेशक आणि कवितेच्या बीजतत्त्वाबद्दल हे विश्लेषण कोणतेही विधान करत नाही. त्यामुळे कवितेचे सर्वसाधारण स्वरूप लक्षात येऊनही तिच्या निर्मितीच्या शक्यतांच्या जागा अनुत्तरित राहतात.

या संपूर्ण भाषणाचा विचार करता, सतत कवितेच्या असामान्यत्वाचा सूर केंद्रभागी असल्याचे जाणवते. हे असामान्यत्व संपूर्ण लेखावर सतत प्रभाव टाकत राहते. मग असा प्रश्न उपस्थित होतो, की कवितेची वाट ही रूढ पठडीतीलच वाट आहे का? तिच्यातील असामान्यत्व नाकारल्यास रूढ पद्धतीने ती कविता म्हणून उभी राहील का? याचे उत्तर 'नाही' असेच असेल; परंतु असामान्यत्व अधोरेखित करताना ती अधिकाधिक नैसर्गिक होत सामान्यत्व कवेत घेते, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. सामान्यत्वाचा स्वच्छ आणि सामाईक उद्गार तिच्यात एकवटलेला असतो. सर्वसामान्य माणसाच्या रोजच्या जगण्याच्या पातळीवरून स्वत:ला सोलत ती अधिकाधिक टोकदार (असामान्य) बनत जाते. सामान्य माणसाची शक्ती, त्याच्या पापभीरूतेमागच्या इच्छा आणि त्याची अगतिकता यांच्या करुणेचा टोकदार, अचूक आणि सामाईक उच्चार म्हणून झालेला कवितेचा विचार या भाषणात आढळत नाही, तर संवेदनशीलतेच्या कवचाखाली ती अधिकाधिक कमकुवत स्वरूपात नजरेस येते; जे खरे पाहता असामान्यत्वापेक्षा सामान्यपणाचेच लक्षण अधिक आहे. कारण यातून कवितेची प्रतिमा हळवेपणापेक्षा रडवेपणाकडे अधिक झुकते व तीव्र वेदनेतून येणाऱ्या बदलाच्या शक्यतांपासून कविता दूर पळू लागते, जे खरे पाहता तिचे प्राणतत्त्व आहे. जेव्हा ती या प्राणतत्त्वांसकट येते, तेव्हाच ती आतल्या नव्या वाटा व त्यामागची कारणे वेदनेसकट शोधू धजते. त्यामुळे सामान्यत्वाच्या धर्तीवरच तिचे असामान्यत्व सिद्ध होते; किंबहुना या धर्तीवर सिद्ध होण्यातच तिचे कवितापण सामावलेले आहे. स्वत:च्या असामान्यत्वाला परखडपणे भिडून, त्यात सोलवटून निघण्यातच कविता शक्य पावते. उलट स्वत:चे असामान्यत्व मान्य केल्याने स्वत:ची घुसमट होण्याच्या, वास्तव आत घेऊन पिळवटून निघण्याच्या आणि त्यामुळे घडण्याबद्दल सतत अद्ययावत राहण्याच्या तिच्या शक्यता निकालात निघतात व यामध्ये तिचे कवितापण खलास होते. ती एक स्पष्ट, कृत्रिम आणि अधिकाधिक सहानुभूती अनुकूल रचना होऊन बसते. स्वत:ला प्रतिनिधी मानून दुसऱ्याच्या ठिकाणी ठेवण्यातून उत्पन्न होणारी संवेदनशीलता हरवून ती कोती होते; शोधापासून परावृत्त होते. या अर्थी सामान्यपण मान्य करून घेतलेला आतल्या वाटेचा शोध म्हणून कवितेचे विश्लेषण न येता एक 'मानलेली मानसिकता' म्हणून येणारा तिचा स्वर सतत जाणवत राहतो. त्यामुळे काळ, लय, नाद, शब्द, प्रतिमा यांचाही संबंध तिच्या चैतन्यनिष्ठेशी प्रस्थापित न होता, हे दुवेही घटकनिष्ठता दर्शवितात. त्यामुळे तिचे विश्लेषण विज्ञाननिष्ठ न होता अधिकाधिक तंत्रनिष्ठ होते, जे कवितेच्या स्वभावास/कवितापणास बाधक ठरते.

तसेच संपूर्ण लेखभर येणाऱ्या कवितेसंदर्भातील 'मी'चा स्वर अखेरपर्यंत परखड, स्पष्ट आणि खणखणीत येत नाही. उलट सर्वसमावेशकतेच्या धोरणाखाली तो अधिकाधिक तडजोडनिष्ठ आणि संहितानिष्ठ होताना दिसतो. सर्वसमावेशकतेत अनुस्यूत असणाऱ्या तटस्थ नकारात कवितेचे निरागसपण लख्ख होते. मात्र या निरागसतेत वास्तवाच्या स्पष्ट आणि सहानुभावी आकलनाचा समावेश होतो. मात्र लेखात जेथे जेथे नकाराची नोंद आढळते, तेथे तेथे सांगण्याचा सूर सहानुभूतीयुक्त व कौतुकमिश्रित जाणवतो. त्यामुळे त्या नोंदींना एक प्रकारचा कनवाळूपणा प्राप्त होऊन त्यातील निरपेक्ष भूमिकानिष्ठता हरपते. त्यामुळे कविता या थेट आणि पातळ स्वराला एक प्रकारचा फुगवटा व पोकळ स्वरूप प्राप्त होऊन तिच्यातील बोचरेपणा हरवतो व ती बद्द होते. संपूर्ण कवितेसंदर्भातील 'मी'चा स्वर भाषणासोबत चढत जाणारी गतिमानता हरवून बसतो, ही या नोंदीची महत्त्वाची मर्यादा मानावी लागेल.

भाषणाच्या अखेरच्या भागात दिलेली कवितेची उपयुक्तता सांगणे, हे एक प्रकारे कवितेला ओढून-ताणून जगवण्यासाठी तिचे केलेले 'मार्केटिंग' वाटते. जेथे गुंतागुंत असेल, तेथे माती आहे, तोवर कविता खदखदेलच. ती प्रचारावर जगणारी मानसिकता नाही. उलटपक्षी अशा पद्धतीने केलेली नोंद म्हणजे स्वत:चे जगणे दुभंगत जाण्याने कवितेची झालेली दिशाभूल आहे. 'कविता लिहिण्याची हीच खरी वेळ आहे' असे सांगणे, हे कवितेला राबवणे तर आहेच; पण कविता हा स्वभाव हरपत गेल्याचे ते एक महत्त्वाचे लक्षणही आहे. तिचे 'माध्यम' स्वरूप हरवत जाऊन तिला साधनत्व प्राप्त होत असल्याच्या या महत्त्वाच्या खुणा आहेत. त्यामुळेच भाषणाच्या अखेरी ती घट्ट संवेदनशीलतेपेक्षा 'मेलोड्रॅमॅटिक प्रोलॉग' म्हणून अधिक प्रस्थापित होताना दिसते.

थोडक्यात, कविता या मानसिकतेचा घेतलेला हा शोध नसून एक व्यवस्था म्हणून केलेल्या आकलनाच्या स्वरूपात ती आपल्यासमोर येते; त्यामुळे एकूण शीर्षकाच्या आणि सांगण्याच्या मूळ उद्देशापर्यंत ती पोहोचू शकत नाही.

**भाग्यश्री भागवत**
'देवांकुर', प्लॉट नं. सी/१२, स्वानंद सोसायटी,
रस्ता क्र. १, सहकारनगर नं. २, पुणे ४११००९.
Mob. : 9561093202.

■



साईनाथ पाचारणे

पुस्तक परिचय

# मुलांचा चित्रमय महाराष्ट्र

लहान मुलांना महाराष्ट्राची ओळख करून द्यायचीय? मग त्यांच्या हाती 'मुलांचा चित्रमय महाराष्ट्र' हे पुस्तक द्या. आणि तोंड बंद करून गप्प बसा. मुलांनी पुस्तक पाहून झाल्यावर महाराष्ट्राच्या प्राकृतिक आणि भौगोलिक भागावर हवे तेवढे प्रश्न विचारा. हवी तेवढी प्रात्यक्षिके करून घ्या. मुले तुम्हाला महाराष्ट्राबद्दल इत्यंभूत माहिती देतात की नाही बघा...

अगदी मुखपृष्ठापासूनच मुले पुस्तकाकडे आकर्षित होतील. पुस्तकाच्या मुखपृष्ठावर फळांनी लदबदलेला महाराष्ट्र दिसेल. फळे पण कोणती? मुलांना हवीहवीशी, कल्पक चित्रकाराने काढलेले रंगीत मुखपृष्ठच मुलांना पुस्तकाकडे खेचून घेईल. सुमारे ५० पृष्ठांतून मुलांना अख्खा महाराष्ट्र आपलासा वाटू लागेल.




या पुस्तकात काय नाही? मुखपृष्ठाच्या आतल्या पानावर गोविंदाग्रजांचे महाराष्ट्रगीत आहे. लखोट्यात छापलेल्या या गीताच्या दोन्ही बाजूला दोन तुतारी वादक आहेत. खाली मंदपणे तेवणारी पाच ज्योतीची समई आहे. महाराष्ट्राच्या संस्कृतीशी नाते सांगणारी ही सजावट मुलांना महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीबरोबर सांस्कृतिक परंपरेचीही ओळख करून देते.

पुढील पन्नास पानांमध्ये पन्नास विषय महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागांची माहिती देतात. सुरुवातीला महाराष्ट्राचे स्थान दर्शविणारे आकर्षक रंगीत पृष्ठ आहे. जगाच्या पांढऱ्या नकाशात आशिया खंड पिवळ्या रंगाने दाखवले आहे. त्यात गुलाबी रंगात भारत दाखविला आहे आणि लाल-केशरी रंगात महाराष्ट्र... अगदी अक्षांश-रेखांशासह आहे की नाही आकर्षक मांडणी?

पुस्तकातील प्रत्येक पान गुळगुळीत आर्ट पेपरचे आहे. दीड फूट लांब आणि एक फूट रुंद अशा विस्तीर्ण आकाराचे हे पान मुलांसाठी बिलकुल ओझे वाटत नाही. व्यापक आशयसमृद्धीसाठी आणि मांडणीसाठी पानाचा असला आकार गरजेचा आहे. पानाच्या एका बाजूला महाराष्ट्राचा नकाशा आहे, तर शेजारीच नकाशातील चित्रांची मुद्देसूद माहिती आहे. प्रत्येक माहितीच्या सुरुवातीला विषयाला अनुसरून प्रसिद्ध कवींच्या काव्यपंक्ती आहेत, तर तळाला त्या माहितीत भर घालणारे तीन-चार रंगीत फोटो आहेत. एकाच पानात त्या विषयाची परिपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना होईल अशी सुबक मांडणी केली आहे.

'मुलांचा चित्रमय महाराष्ट्र' या पुस्तकातील विषयसुद्धा किती छान आहेत? आणि किती माहितीपूर्ण? प्रत्येक पान म्हणजे महाराष्ट्राच्या विविध माहितीचा खजिनाच.

राजकीय महाराष्ट्र, प्रशासकीय महाराष्ट्र, छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र, मोगलकालीन महाराष्ट्र, मराठ्यांच्या विस्तीर्ण साम्राज्याचा आणि ब्रिटिश अंमलाचा महाराष्ट्र, मुंबई इलाखा, मुंबई प्रांत, मुंबई राज्य, द्विभाषिक विशाल राज्य आणि सध्याचा महाराष्ट्र अशा विविध नकाशांतून थोडक्यात पण सचित्र आढावा घेतला आहे.

महाराष्ट्राचा उंच-सखलपणा, नद्या, पर्वत, पर्जन्य, वनस्पती, खडक, खनिजे, खाणी, मुद्रा, जलसिंचन, ऊर्जानिर्मिती, भाताचे क्षेत्र, तांदूळ, ज्वारी, बाजरी, गहू, ऊस, कापूस, साखर कारखाने, औद्योगिक वसाहती, लहानमोठे उद्योग या सगळ्यांसाठी प्रत्येकी एकेक रंगीत नकाशा वापरला आहे. त्यात स्थळांची चित्रे, त्या त्या विभागांची चित्रे आणि सोबत मोजक्या शब्दांतून माहिती दिली आहे. सोबतीला समर्पक फोटो आहेतच.

उदा. महाराष्ट्रातील रस्त्यांचा नकाशा दाखवताना चौपदरी रस्त्यांचा फोटो, नव्या बोगद्यांचा फोटो, फुलांचे फोटो किंवा प्रत्येक विभागाची माहिती देताना त्या त्या विभागातील ऐतिहासिक वास्तू प्रकल्प यांचे फोटो दिले आहेत. (त्यासाठी एवढे मोठे विस्तीर्ण पान हवेच नाही का?)

पुस्तकात रस्ते, लोहमार्ग, पर्यटन, धार्मिक स्थळे, सांस्कृतिक महाराष्ट्र, आदिवासी जीवन यांचे स्वतंत्र चित्रमय नकाशे आहेतच, पण भटक्यांचे जीवनही नकाशातून दाखवले आहे. लहान-मोठी शहरे, फळांची गावे, नदीकाठची गावे यांचे रंगीत नकाशे आहेतच. शिवाय मुंबई, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा, कोकण आणि कोकण रेल्वे या विभागांची स्वतंत्रपणे मुलांना ओळख करून दिली आहे.

रंगीत नकाशे आणि परिपूर्ण माहिती वाचल्यावर मुलांना स्वतंत्रपणे माहिती लक्षात ठेवावी लागत नाही, पण गुळगुळीत पाने रंगीत नकाशे आणि आकर्षक फोटो यामुळेच हे पुस्तक मला आवडले नाही. मला हे पुस्तक आवडण्याचे मुख कारण म्हणजे या महाराष्ट्राच्या पुस्तकात मुलांच्या कृतीवर आणि व्यवसायावर दिलेला भर. हे पुस्तक मुलांना माहितीरंजनाबरोबर विचार करायला आणि कृतीला प्राधान्य देते, त्यातून ज्ञानात भर घालते. मनोरंजन करता करता मुलांच्या हाताला कृती करायला लावण्याची लेखकाची कल्पना खूपच छान आहे.

उदाहरण द्यायचे झाले तर पुस्तकाच्या शेवटी महाराष्ट्राच्या नकाशात एक भौगोलिक शब्दकोडे दिले आहे. संपूर्ण पुस्तक अभ्यासल्यावर मुले सहजतेने हे शब्दकोडे सोडवू शकतात. शिवाय काही पानांवर मुलांना सोडवण्यासाठी प्रश्न दिले आहेत. ठिपके जोडून शहरे एकमेकांना जोडायला सांगितली आहेत. शहरांची नावे लिहायला सांगितली आहेत. नकाशात नद्या दिल्या आहेत, त्या नद्याकाठच्या गावांची नावे लिहायला सांगितली आहेत, आकृती वाचनही दिले आहे.

आपण हे पुस्तक मुलांसाठी तयार करतोय याचे लेखकाने सतत भान ठेवले आहे. म्हणूनच पुस्तक अधिकाधिक रंजक करण्याकडे लेखकाचा कल आहे. लेखकाबरोबर रचनाकाराने, मांडणीकाराने, फोटोग्राफरने एकूण सगळ्याच टीमने मन:पूर्वक कष्ट घेतले आहेत. विषयाला अनुसरून थोर व्यक्तींची वचने जागोजागी दिली आहेत. प्रसिद्ध कवींच्या काव्यपंक्ती वापरल्या आहेत. जोगाजागी थोडक्यात पण महत्त्वाचे उतारे दिले आहेत, प्रत्येक पानाच्या पार्श्वभागी सुंदर समुद्रकिनारा, किल्ले, धार्मिक स्थळांची चित्रे दिली आहेत. राष्ट्रगीत दिले आहे, तसेच पसायदानही आहे. शिवाजी महाराजांची राजमुद्रा दिली आहे. पंढरीच्या वारीचे चित्रही आहेच. प्रभात सिनेमाची मुद्रा छापली आहे, तशीच वारली चित्रकलाही घेतली आहे.

एकूण संपूर्ण महाराष्ट्राची भौगोलिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक, औद्योगिक अशी माहिती अवघ्या पन्नास पानांतून मुलांपुढे मांडली आहे. इतके दर्जेदार पुस्तक तयार करणारी व्यक्ती अर्थातच साधीसुधी नसणार हे वाचकांनी ओळखले असणारच. लहान मुलांची जडणघडण व्हावी या विचाराने प्रेरित झालेल्या व्यक्तीनेच हे पुस्तक तयार केले आहे. ती व्यक्ती म्हणजे कोसबाडच्या टेकडीवरून प्रकाशित होणाऱ्या आणि ७७ वर्षांची परंपरा लाभलेल्या शिक्षणपत्रिकेचे संपादक प्रा.विद्याधर अमृते.

पुस्तक तयार करताना त्यांनी खरोखरच खूप विचार आणि कष्ट घेतले असणार, हे पुस्तक लहान मुलांसाठी आहे याची जाणीव मनात ठेवूनच पुस्तक तयार केले असणार. दर्जात कोठेही तडजोड नाही, माहितीत अपूर्णता नाही, चित्र आणि फोटोच्या मांडणीतील नीटनेटकेपणा, समर्पकपणा, बोलकेपणा यात घेतलेली दक्षता या सगळ्याच बाजूने पुस्तक परिपूर्ण झाले आहे.

प्रत्येक विचारशील पालकाने आपल्या लहान मुलांना माहिती देण्यासाठी विचारप्रवृत्त आणि कार्यप्रवण करण्यासाठी, हे पुस्तक घरी आणावेच असे लेखकाचे आवाहन आहे.

**प्रा. साईनाथ पाचारणे**

**मुलांचा चित्रमय महाराष्ट्र**
**लेखक : प्रा. विद्याधर अमृते**
मनन प्रकाशन, विलेपार्ले (पू.), मुंबई ५७.
फोन : ०२२-२६१७०९०८

## ‘व्हाय नॉट आय?’ पुस्तकावर राज्यव्यापी परीक्षण स्पर्धा

सुस्मिता देसाई आणि सिद्धी देसाई या मायलेकीच्या संघर्षाची कहाणी शब्दबद्ध करणाऱ्या वृंदा भार्गवे यांच्या ‘व्हॉय नॉट आय?’ (प्रकाशक : अमेय प्रकाशन, पुणे) या पुस्तकाची वाचकप्रियता गेल्या काही महिन्यांत समोर आली. महाराष्ट्रातील वृत्तपत्रांच्या पुरवण्या आणि बऱ्याच नियतकालिकांत या पुस्तकावर भरभरून लिहिण्यात आल्यानंतर महाराष्ट्रातील लेखक-वाचकांसाठी ‘व्हॉय नॉट आय?’ वर एक पुस्तक परीक्षण स्पर्धा घेण्यात येत आहे.

अभंग पुस्तकालय, नांदेडच्या वतीने ही स्पर्धा घेण्यात येत असून, स्पर्धेतील पहिल्या तीन परीक्षणात्मक लेखांना अनुक्रमे रु.२५००/-, रु.२०००/- व १५००/- ची रोख पारितोषिके देण्यात येतील. त्याशिवाय निवडसमितीच्या शिफारशीनुसार काही उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात येतील.

ही स्पर्धा सर्वांसाठी खुली आहे. परीक्षणात्मक लेखाची शब्दमर्यादा १००० ते १२०० इतकी आहे. मात्र लेखकाने स्वहस्ताक्षरातच आपला लेख पाठविणे बंधनकारक आहे. परीक्षणासोबतच्या पत्रावर लेखकाने आपला संपूर्ण पत्ता, दूरध्वनी क्रमांक कळवावा. या स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्यांनी आपल्या प्रवेशिका संजीव कुळकर्णी, अभंग पुस्तकालय, १७ गोदावरील हॉटेल कॉम्प्लेक्स, व्ही.आय.पी.रोड, नांदेड ४३१६०२ या पत्त्यावर ३० जानेवारी २०१० पर्यंत पाठवाव्यात.

ज्या लेखक/वाचकांचे या पुस्तकावरील परीक्षण प्रसिद्ध झाले आहे, तेही स्पर्धेसाठी ग्राह्य धरले जाईल. मात्र अशा स्पर्धकांना आपला लेख स्वहस्ताक्षरात पाठवावा लागेल. या स्पर्धेसाठी कोणतेही शुल्क नाही. अधिक माहितीसाठी संपर्क : ९८२३१२५३४३.

## ३० जानेवारी – हुतात्मा दिनाच्या निमित्ताने

# 'सलाम बळिराजा' : एक कृतज्ञ संध्याकाळ

आपणा सर्वांना जगविणारा, आपल्यासाठी भर उन्हात आणि विजेच्या लोडशेडिंगमुळे ऐन मध्यरात्रीही शेतात राबणारा समस्त शेतकरी वर्ग आज संकटात आहे. केवळ म्हणायलाच तो शेतकरी-राजा राहिला आहे. देशाला अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्ण बनविणाऱ्या व त्याद्वारे देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात भर घालणाऱ्या शेतकरी-राजावर अस्मानी आणि सुलतानी दोन्ही बाजूंनी सातत्याने हल्ले होत आहेत. सरकारी अनास्थेमुळे मागील काही वर्षांत दोन लाखांहून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. या आत्महत्या नसून शासनाच्या भांडवलदार व उद्योगपती धार्जिण्या धोरणामुळे झालेले ते हुतात्मे आहेत. त्यांचे हे बलिदानही व्यसनामुळे झाले असे सांगून सरकार त्यांना अपमानित करीत आहे.

राहुल गांधी कलावतीच्या झोपडीत जाऊन तर शरद पवार हे क्रिकेटचे सामने भरवून प्रसिद्धी मिळवत आहेत. महागाईबद्दलच्या निवेदनातून व्यापाऱ्यांना साठेबाजीसाठी प्रवृत्त करीत आहेत. शेतकरी मात्र विजेचे लोडशेडींग, खत-बियाणे-कीटकनाशकांच्या वाढत्या किमती, सहकारी संस्थांची कर्जासाठीची टाळाटाळ, खासगी सावकारीचा पाश, पिकांवर पडणारे नवे नवे रोग, कधी दुष्काळ, कधी अतिवृष्टी तर कधी फयानसारख्या चक्रीवादळाने होणारे नुकसान, कमी होत चाललेली जमिनीची उत्पादकता, उन्मत्त आणि संवेदनाहीन नोकरशाहीची बेपर्वाई, कारखानदार लॉबी आणि शहरी मध्यमवर्गीयांचे स्वयंपाकघर यांना अनुकूल असे शेतमाल आयात-निर्यात धोरण आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे उत्पादनखर्चही भरून न निघणारे असे शेतमालाचे अपुरे भाव या सर्वांशी लढतो आहे. अन्नधान्य, भाजीपाला यांची महागाई प्रचंड वाढली आहे. त्यामुळे अंगमेहनती कष्टकरी वर्ग संकटात आहे; आणि या वाढलेल्या भाववाढीतून शेतकऱ्यांच्या पदरात मात्र फारसे काही पडत नाही; मधले दलाल फक्त पोसले जात आहेत.

परिस्थिती प्रतिकूल असतानाही शेतकरी लढतो आहे; कष्ट करतो आहे. देशाच्या विकासात बिर्ला-अंबानी-टाटा यांच्यापेक्षाही शेतकऱ्यांचा वाटा अधिक आहे. आर्थिक टंचाई, बेरोजगारी, पर्यावरण प्रदूषण, ऊर्जा संकट अशा अनेक संकटांतून या देशाला बाहेर काढण्याची शक्यता शेती क्षेत्रात आणि शेतकऱ्यांच्या हिमतीतच आहे, पण त्यासाठी गरज आहे योग्य सरकारी धोरणांची.

अशा जिगरबाज शेतकरीराजाला मानाचा मुजरा करून अभिवादन करण्यासाठी, त्यांच्याच तोंडून त्यांची कैफियत ऐकण्यासाठी आणि 'शेतकऱ्यांनी आसूड ओढला तर नाठाळ जनावरेसुद्धा सरळ होतात', हे महात्मा फुले वाड्यावरूनच ठणकावून सांगण्यासाठी जरूर या.

शेतकरी बंधू-भगिनींनो व शहरातील त्यांच्या लेकरांनो, तसेच त्यांच्या कष्टामुळे ज्यांचे जगणे सुसह्य झाले आहे अशा शहरी नागरिकांनो, चला सगळे जमूयात आणि एक सामूहिक बलशाली कृती करूयात.

**कार्यक्रमाचे स्वरूप :** शनिवार दि. ३० जानेवारी २०१०

दुपारी ०२.०० ते ०४.०० : **शेतकरी अभिवादन रॅली** (साने गुरुजी स्मारक, सिंहगड रस्ता, पुणे ३० ते महात्मा फुले वाडा).

दुपारी ०४.०० ते ०५.०० : **शाहिरी जलसा.**

सायं. ०५.०० ते ०६.०० : **शेतकऱ्यांची कैफियत** (पोस्टर प्रदर्शनाद्वारे आणि शेतकऱ्यांच्या मनोगतातून).

सायं. ०६.०० ते ०६.३० : **शेतकऱ्यांचा आसूड** (अर्थात निर्धार वाचन).

आपले,

**सोशलिस्ट फ्रंट, राष्ट्र सेवा दल (शेतकरी पंचायत), जनता दल (धर्मनिरपेक्ष), समाजवादी जनपरिषद, लोक राजनीती मंच, लोक संघर्ष मोर्चा, छात्रभारती, समाजवादी अध्यापक सभा, समाजवादी महिला सभा, आरोग्य सेना, जनआंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय, मुस्लिम सत्यशोधक मंडळ, महाराष्ट्र दगडखाण कामगार परिषद, नागरी हक्क सुरक्षा समिती, अंगमेहनती कष्टकरी संघर्ष समिती आणि लोकशाही उत्सव समिती (पुणे).**

साधना साप्ताहिक
१६ जानेवारी २०१०

एन.डी.नं. आर.एन.आय.१६०१/५७
रजि.क्र.एल–२/आर.एन.पी./पी.एन.सी.डब्ल्यू./डब्ल्यू–१७८/२००९–२०११
तिकिटाशिवाय पाठवण्याचा परवाना नं.७
पोस्टींग दर गुरुवारी मार्केट यार्ड पी.एस.ओ.सॉर्टिंग ऑफिसमधून

## पहिला नोबेल पुरस्कार मिळविणाऱ्या ब्रिटिश लेखकाची कादंबरी




द कंप्लीट वर्क्स, जंगलबुक वगैरे रचना लिहिणाऱ्या रुडयार्ड किप्लिंग या ब्रिटिश लेखकाची किम ही एक कादंबरी. ब्रिटिश जीवनशैली आणि विचारांचा पगडा नसलेली, भारतीय जीवनशैलीपासून किंचितही न ढळणारी अस्सल भारतीय कादंबरी.

किंमत १२०/- रुडयार्ड किप्लिंग ।अनु.। वसु भारद्वाज

## नोबेल पुरस्कारप्राप्त चिनी लेखकाचा कथासंग्रह




आशय-विषय, रूप-भावाशैलीच्या अंगाने भिन्न असलेल्या गाओ यांच्या कथात्मसाहित्याचा व्यापक विस्तार दाखविणाऱ्या श्रेष्ठ कथा.

किंमत १२०/- गाओ जिंगजियान ।अनु.। चित्रा माया

## साकेत प्रकाशन प्रा.लि.

११५, म. गांधीनगर, फायरब्रिगेडमागे, स्टेशन रोड, औरंगाबाद.
दूरध्वनी : (०२४०) २३३२६९२/९५, ९८२२४७८८९५.
Email : info@saketpublication.com

**पुणे कार्यालय** (वेळ : स.९.३० ते ६.३०) (रविवार बंद)
ऑफिस नं. ०२ 'ए' विंग, पहिला मजला, धनलक्ष्मी कॉम्प्लेक्स्, ३७३ शनिवार पेठ, ठाकरसी कन्या शाळेजवळ, पाटे हाईटस्‌समोर पुणे - ३० मो. ९४२२२२५४०७

## साकेत ग्रंथवार्ता

(वार्षिक वर्गणी १००, द्विवार्षिक २०० पंचवार्षिक ३०० रु.)
वर्गणीच्या किमतीचे पुस्तक मोफत मिळवा.
साकेतच्या पुस्तकांवर वर्षभर २५% सूटही मिळवा.
(ट. ख. वेगळा)*

१०० रु.चे पुस्तक मोफत मिळवा

टीप- योजना ३१मार्च.१०पर्यंत. साकेतच्या दालनात.
वर्गणी म.ऑ. / डीडीने साकेत प्रकाशन नावाने औरंगाबादच्या पत्त्यावर पाठवावी.
*अटी लागू

आपले नाव व पत्ता ९८८१७४५६०५ वर SMS करून नवीन पुस्तकांची माहिती मोफत घरपोच मिळवा.